
२५ नोव्हेंबर १९६७ । चाळीस पैसे

# माणूस

साप्ताहिक

## दोन ध्रुव, एक ध्येय



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : सव्विसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
साहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. ऑक्टो. २५

आपला 'माणूस' दिवाळी अंक वाचला. वाचून अत्यानंद झाला. मुखपृष्ठावर केशवसुतांची कविता पाहून चित्र योग्य वाटले. 'भारतीय बुद्धिवंतांची निर्यात' हा वि. म. दांडेकरांचा प्रदीर्घ लेख अतिउत्तम वाटला. त्याचबरोबर नट सूर्यकांतांची 'वाघाशी झुंज' हा अनुभव वाचून त्यांच्या धैर्याची कल्पना आली. डॉ. राम मनोहर लोहिया यांच्यावरील चंद्रशेखर मराठे यांचा चरित्रात्मक लेख उत्तम वाटला. मो. ग. तपस्वी व सुलोचना घाटीकरांच्या कवितांनी अंकात चार चाँद लावलेत. व. मो. पुरंदरे यांचा 'सरकार वाडा' नांदेडला बसून पाहिला, 'आण नाही पण कथा' साधारण व 'सगळासवयीचा प्रश्न' लिहिल्या-बद्दल जयवंत दळवींचे आणि 'माझ्यात फसू नका'बद्दल सौ. इंद्रायणी सावकार यांची जितकी तारीफ करावी तेवढी कमी. 'व्होलगा जेव्हा लाल होते' हा लेख इतर अंकां पेक्षा अधिक चांगला वाटला. शेवटी पुन्हा एकदा वि. म. दांडेकरांचे अभिनंदन. त्यांनी अजून असले लेख निदान वाचकांसाठी तरी लिहावेत.

हा १९६७ चा दिवाळी अंक संग्राह्यआहे. 'दिल्ली दरबार,' 'विचार वारे' आणि 'ग्यानबा'चे सदर न पाहून बरेच दु:ख झाले परंतु ग्यानबाच्या विनोदाने ती उणीव भरून काढली. पुन्हा एकदा चांगला अंक काढल्या-बद्दल अभिनंदन.

बालाजी गुंडावार,
बालाजी पावडे, नांदेड

मूल्य ४० पसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

दिल्ली दरबार

# काँग्रेसच्या गादीसाठी वादंग

सदाशिव पेठकर

काँग्रेसच्या गादीचा वाद या वर्षी खूपच विकोपाला गेल्याचे दिसत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेल्या वीस वर्षांत काँग्रेस-अध्यक्ष कोणी व्हावे यासंबंधी वरिष्ठ नेत्यांत अहमहमिका निर्माण झाल्याचे दृश्य दिसले नव्हते. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसच्या अध्यक्ष-पदाला एक विशिष्ट प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती. परतंत्र भारत काँग्रेस-अध्यक्षाला राष्ट्रपती म्हणूनच संबोधत असे. १९२६ मध्ये या पदावर पं. जवाहरलाल नेहरू यांची निवड झाली आणि तेव्हापासून हे अध्यक्षपद कोणा-कडे जावे यासंबंधांचे अधिकार अनौप-चारिक रीतीने महात्माजींकडे गेले. त्या काळात अध्यक्षपदासाठी सुभाषबाबू की पट्टाभी सीतारामय्या हा वाद गाजला होता. महात्माजींनी पट्टाभींच्या उमेद-वारीचा पुरस्कार केला असतानाही सुभाषबाबूंनी एकाकी अवस्थेतही निवडणूक लढविली व महात्माजींच्या विरोधाला यशस्वी टक्कर देऊन ते निवडूनही आले. ही निवडणूक लढ-विण्यामागे सुभाषबाबूंचा उद्देश स्पष्ट होता. त्यांना काही त्या पदाची वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी लालसा नव्हती. स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या या संघट-नेला क्रांतिकारक स्वरूप देण्यासाठी सुभाषबाबूंची धडपड होती. परंतु सुभाषबाबूंना अध्यक्षपदावर निवडून येऊनही, महात्माजींच्या विरोधामुळे काँग्रेसला पाहिजे तसे स्वरूप देणे जमेना आणि शेवटी तर ते इतके वैतागले की त्यांनी अध्यक्षपदाचा राजी-

नामा दिला आणि स्वतःचा पुरोगामी गट स्थापन केला.

१९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर काँग्रेसने सत्तास्वीकार केला आणि राज्यकर्ता पक्ष म्हणून त्याच्यावर नवीनच जबाबदारी पडली. या वेळी शासकीय प्रभुत्वाने म्हणजे प्रधानमंत्र्याने पक्षाध्यक्षाच्या आदेशानुसार कार्य केले पाहिजे अशी त्या वेळचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यांनी मागणी केली. या मागणीत वावगे असे काहीच नव्हते. परंतु प्रधानमंत्रीपदी विराजमान झालेल्या पंडितजींची लोकप्रियता एवढी अनन्यसाधारण होती आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व इतके उत्तुंग होते की, कृपलानींच्या या रास्त मागणीकडे सर्वांनीच सोयीस्कर रीतीने दुर्लक्ष केले आणि अखेर कृपलानींनाही राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले.

स्वातंत्र्यपूर्व काळात ज्याप्रमाणे अध्यक्षीय उमेदवाराची निवड करण्याचा अधिकार महात्माजींकडे चालून आला होता तसाच अधिकार स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रधानमंत्री नेहरूंकडे आला. पक्षातील अन्य कोणताही कार्यकर्ता आपल्या बरोबरीचा आहे, असे पंडितजी कधीच मानीत नसत आणि त्यामुळे अध्यक्षपदी विराजमान झालेल्या नेत्याचा प्रशासनात हस्तक्षेप सहन करणे पंडितजींच्या स्वभावाला बिलकुल मानवण्यासारखे नव्हते. त्यामुळ जो आपले निमूटपणे ऐकेल अशा व्यक्तीचीच अधिकारपदावर नियुक्ती व्हावी असाच त्यांचा प्रयत्न असे. स्वातंत्र्यकाळात काँग्रेस–अध्यक्षाच्या प्रतिष्ठेचा लोप व्हायला हीच घटना प्रामुख्याने कारणीभूत होते. याला अपवाद फक्त बाबू पुरुषोत्तमदास टंडन यांचा. टंडनजींची लोकप्रियताही काही कमी नव्हती. एक निस्पृह आणि निरलस कार्यकर्ता म्हणून त्यांच्यासंबंधी आदर होता. परंतु टंडनजींचा विरोध धारदार होत चालल्याचे दिसताच पंडितजींनी प्रधानमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचा धाक दाखवून टंडनबाबूंना राजीनामा देण्यास भाग पाडले.

त्यानंतर काही काळ अध्यक्षपद पंडितजींनी स्वतःकडे घेतले. परंतु त्यानंतर या पदावर नियुक्त झालेले नेते इतके सामान्य होते की पंडितजींच्या तुलनेने ते कमालीचे निष्प्रभ दिसत. पंडितजींचे १९६४ मध्ये निधन झाले त्या वेळी अध्यक्षपदाची धुरा कामराजांसारख्या चाणाक्ष नेत्याकडे आलेली होती. काही जुन्या मंत्र्यांनी आपल्या अधिकारपदांचा त्याग करून पक्ष–संघटनेच्या कार्याला वाहून घ्यावे असे स्वतः मद्रासचे मुख्यमंत्री असताना कामराजांनी सुचविले. कामराजयोजना म्हणून या प्रस्तावाला नेहरूंनी उचलून धरले आणि तेव्हापासून प्रसिद्धीच्या झोतात कामराज वावरू लागले. कामराजांनी मुख्यमंत्रीपद सोडण्याची तयारी दर्शवून आपल्याला या योजनेसंबंधी किती आस्था आहे हे दाखवून दिले व त्यामुळे अध्यक्षपद त्यांच्याकडे चालत आले.

पंडितजी गेल्यानंतर त्यांच्या जागी प्रधानमंत्री म्हणून कोणाची निवड करावी हा प्रश्न निर्माण झाला असताना कामराजांनी पुढाकार घेऊन कै. लालबहादूर शास्त्री यांच्या बाजूने कौल दिला. शास्त्रीजींची कारकीर्द अल्पायुषी ठरली. परंतु या काळात

काँग्रेस अध्यक्षाला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले. शास्त्रीजी कोणताही निर्णय घेताना कामराजांचा सल्ला घेत असत व त्यामुळे पक्षाची संघटनात्मक यंत्रणा आणि संसदीय यंत्रणा यांच्यामध्ये एक प्रकारचा समभाव निर्माण झाला.

## वडिलांचेच धोरण

शास्त्रीजींच्या आकस्मिक निधनानंतर प्रधानमंत्र्याची पुन्हा एकदा निवड करण्याचा प्रसंग निर्माण झाला. शास्त्रीजींच्या निवडीच्या वेळी स्वस्थ बसलेले मोरारजी देसाई या वेळी प्रधानमंत्रीपदासाठी विशेष खटपट करू लागले. त्या वेळी कामराजांनी मोरारजीभाईंना एकाकी पाडून इंदिरा गांधी यांच्या निवडीचा मार्ग सुकर करून घतला. इंदिरा गांधी प्रधानमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर मात्र त्यांनी आपल्या पिताजींप्रमाणे अध्यक्षांची उपेक्षा करावयास प्रारंभ केला. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तर केंद्रीय मंत्रिमंडळ बनविताना इंदिराजींनी कामराजांचा साधा सल्लाही घेतला नाही. त्या वेळी कामराजही विद्दुगर मतदारसंघातील अनपेक्षित पराभवामुळे निस्तेज झालेले होते.

या परिस्थितीचा इंदिराजींनी विशेष फायदा घेऊन कामराजांना किंचितही महत्त्व न देण्याचे धोरण अधिक कसोशीने चालू ठेवले. कामराजांप्रमाणेच मोरारजी देसाई यांच्यासारख्या वृद्ध नेत्याचीही ते उपप्रधानमंत्रीपदी आरूढ झाल्यानंतरही इंदिराजींकडून उपेक्षा होत असते असे जाणकार सांगतात. अतुल्य घोष आणि स. का. पाटील यांच्या अपयशाची संधी साधून इंदिराजींनी त्यांनाही दूरच ठेवले आहे.

आता अध्यक्षांची निवड जवळ आलेली असताना कामराज, मोरारजी देसाई, स. का. पाटील आणि अतुल्य घोष ही परस्परविरोधी मंडळी इंदिराजींना विरोध करण्यासाठी एक झालेली असून स. का. पाटील यांनाच अध्यक्ष केले पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला आहे. पाटलांना अध्यक्षपद दिल्याने आपण आपल्यामागे कायमचा भुंगा लावून घेणार आहोत हे जाणण्याइतक्या इंदिरा गांधी चाणाक्ष असल्यामुळे त्यांनी गुलझारीलाल नंदा यांच्या उमेदवारीचा पाठपुरावा सुरू केला. परंतु कार्यकारिणीचा इंदिरा गांधींव्यतिरिक्त नंदाजींना कोणाचाच पाठिंबा मिळत नाही ही वस्तुस्थिती कामराजांना माहीत असल्यामुळे पाटलांना मंत्रिपद द्या नाही तर त्यांना नंदांविरुद्ध उभे करून आम्ही त्यांना विजयी करू असे कामराजांनी आव्हान दिलेले आहे.

ज्यांच्या मदतीने आपण प्रधानमंत्रिपदावर आरूढ झालो त्या साहाय्यकर्त्यांची उपेक्षा करण्याच्या वृत्तीपायीच इंदिराजींनी हा पेचप्रसंग ओढवून घेतला असून पाटलांच्या रूपाने कामराजांनी त्यांना चांगलाच शह निर्माण केला आहे. आपल्या धोरणाशी विसंवादी असणारा नेता अध्यक्षपदी विराजमान झाल्यावर तो पदोपदी आपली अडवणूक करील त्या ओळखून आहेत. म्हणूनच आता इंदिरा गांधी विरुद्ध कामराज असा सामना सुरू झाला असून त्याच्या निर्णयावर काँग्रेस पक्षाच्या पुढील वाटचालीची दिशा अवलंबून राहणार आहे. ○

## ☐ साहित्याचे "सुसंबद्ध स्वरूप"

विसाव्या शतकातील अमेरिकन साहित्याचे सर्वांत ठळक वैशिष्टच कोणते? विषयाशी सुसंबद्ध अशा बाह्य स्वरूपाचा शोध. हिंदुस्थानात वर्षभर साहित्यावर भाषणे देण्यासाठी नुकतेच आलेले अमेरिकन प्राध्यापक डॉ. पीटर कार यांनी परवा दिल्लीत बोलताना आधुनिक अमेरिकन साहित्याचा हा स्थायीभाव असल्याचे सांगितले. अमेरिका हे 'नवे जग' आहे आणि तेथले जीवन सतत संघर्षमय असल्याने सुमारे शंभर वर्षांपूर्वी 'सुसंबद्ध' अथवा 'ऑर्गॅनिक फॉर्म'ची ही कल्पना निघाली. आणि आता ती अमेरिकन साहित्याचा आधारस्तंभ झाली आहे. अमेरिकन साहित्यांतल्या या चळवळीने दोन गोष्टी सिद्ध होतात–एक म्हणजे अमेरिकन साहित्याने इंग्लिश (ब्रिटिश) साहित्यिक परंपरेची शृंखला तोडली आहे व दुसरे म्हणजे सामान्य माणसाच्या 'आजच्या घटके'च्या जीवनावर आधारलेले हे नवीन वाङमय आता 'वयात' आले आहे.

या चळवळीमागचा विचारवंत राल्फ वाल्डो इमर्सन होता. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमाराच्या या श्रेष्ठ साहित्यिकाला प्रथम जाणीव झाली, की इंग्लिश (म्हणजे इंग्लंडच्या) परंपरेच्या बाहेरही साहित्य–निर्मिती करणे शक्य आहे. याच सुमारास अमेरिकेने इंग्लंडचे सांस्कृतिक जोखड झुगारून द्यायला प्रारंभ केला होता. वॉल्ट व्हिट्मनने "लिव्हज् ऑफ ग्रास" लिहून एका नवीन साहित्यिक परंपरेचा ओनामाही केला होता. डॉ. कार यांच्या मते वर्डस्वर्थ आणि कोलरिज् यांना जे काव्यात घालायचे होते ते वॉल्ट व्हिट्मनने घातले–ते म्हणजे ज्या सामान्य माणसांनी स्वत:करिता एक नवे जीवन व नवे राष्ट्र निर्माण करण्यासाठी घाम गाळला त्यांच्यावर काव्य करण्यासाठी त्याने त्यांचीच रोजची भाषा वापरली. साहित्याचा विषय आणि त्याचे मापिक स्वरूप यांतली सुसंबद्धता ती ही.

या पद्धतीने लेखन करणारा पहिला प्रमुख अमेरिकन कादंबरीकार म्हणजे सॅम्युएल् क्लेमेन्स ऊर्फ 'मार्क ट्वेन'. हे टोपणनावच त्याने नदीतल्या होड्यांच्या वाहतुकीवरून घेतले होते. त्यानंतर या परंपरेचा विकास केला तो अर्नेस्ट हेमिंग्वे, विल्यम फॉकनर, टॉमस वुल्फ आणि जॉन स्टीनबेक यांनी. आणि आता तिची जोपासना करणारे प्रमुख लेखक म्हणजे डॉस पॅसॉस, नॉर्मन मेलर, सॉल बेलो आणि सॅलिंगर. हे लेखक 'अँटी–हीरो' म्हणजे असामान्यता–विरोधी विचार प्रवाहाचे पुरस्कर्ते असून आपल्या साहित्यात सामान्य माणसाचे चित्रण करीत असतात.

अमेरिकेत आशय आणि स्वरूप यातली सुसंगतता केवळ साहित्यापुरती मर्यादित

राहिलेली नसून आधुनिक वास्तुशास्त्रातही प्रकट झाली आहे असे डॉ. कार यांनी सांगितले. ही परंपरा प्रथम लुई सलिव्हन या वास्तुकाराने निर्माण केली व ती ल कॉर्बुजिए आणि फ्रँक लॉइड राइट यांनी फार चांगल्या रीतीने पुढे चालविली. चित्रकलेतही ही परंपरा प्रतिबिंबित झालेली दिसते. उदाहरणार्थ, आजच्या अमेरिकन चित्रकाराने न्यूयॉर्क शहरातल्या जीवनाचे चित्र काढले तर तो तेथल्या जीवनाची अनाकर्षक बाजू लपवीत नाही. चित्रकारांचा हा संप्रदाय 'अॅश कॅन स्कूल' म्हणजे 'राखेच्या भांड्याचा संप्रदाय' म्हणून ओळखला जातो. हे चित्रकार 'शिष्टाचारा'च्या भानगडीत पडत नाहीत. त्यांच्या कलाकृती वास्तव आणि धक्का देणाऱ्या असतात– जीनवाप्रमाणे.

## □ "आमची" वार्ताहर

प्रत्येक वर्तमानपत्राला "आमचा वार्ताहर" असतोच. हिंदुस्थानात तरी "आमची" वार्ताहर विरळा. हिंदुस्थानचे कशाला, पुढारलेल्या अमेरिकेतही परिस्थिती फारशी निराळी नाही. तेथल्या 'मिनिआपोलीस स्टार' या वर्तमानपत्राची वर्ताहर कॅरॉल अॅन हॉन्सा ही दिल्लीला येऊन गेली. तिचा वृत्त-व्यवसायातला अनुभवच पाहा.

"अमेरिकेतदेखील वार्ताहराचे काम हे अजून बव्हंशी पुरुषाचे क्षेत्र समजले जाते. एखादी स्त्री या व्यवसायात शिरलीच तर बहुधा लग्ने, पार्ट्या आणि फॅशन असल्या बातम्यांच्या मागे धावणे तिच्या नशिबी येते आणि तिने या चाकोरीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर तो तिला संपादकाच्या 'हिला काय जमणार आहे कपाळ!' या भावनेला तोंड द्यावे लागते. अमेरिकन समाजातली इतर मंडळीही बाईने काही कर्तृत्व दाखविण्याचा प्रयत्न केला तर विरोध करतात. समजा, मी एखाद्या राजकीय नेत्याची मुलाखत घ्यायला गेले तर तो मला स्त्री या नात्याने आदराने व मानाने वागवील – पण महत्त्वाचे असे काहीच बोलणार नाही. कारण त्याला स्त्री-वार्ताहरांशी बोलण्याची सवय नसते, आणि स्त्रियांनाही राजकारणात रस असू शकेल हे त्याला पटतच नाही...

स्त्री वार्ताहराला पहिली गोष्ट करावी लागते ती म्हणजे आपण कोठलीही 'स्टोरी' हाताळू शकतो हे संपादक महाशयांना पटवून देणे. म्हणजे आपण स्त्री आहोत याचा तिने संपादकाला विसर पाडला पाहिजे. त्यासाठी पुरुष वार्ताहर ज्या प्रसंगी संपादकाच्या शिव्या खातात तशा तिने खाण्याची तयारी ठेवली पाहिजे. पुरुष-वार्ताहरांप्रमाणेच 'डेडलाइन' सांभाळण्यासाठी जिवाचे रान केले पाहिजे, आणि शारीरिक धावपळही केली पाहिजे. मुख्य म्हणजे स्त्री म्हणून तिला समाजात जो विशेष मान मिळतो तो न मिळाला तरी चालवून घ्यायला तिने शिकले पाहिजे. हा उमेदवारीचा काळ निःसंशय कठीण असतो. पण एकदा तो संपला की पुढचे सगळे सुरळीत असते."

स्वत: कॅरॉल हॉन्सा या दिव्यांतून तावून सुलाखून निघाली आहे. कारण आता ती विधानसभेतली वार्ताहर म्हणून काम करते.—आणि हे काम बरेच जोखमीचे असते.

## □ 'समग्र' शिक्षण

डार्विनच्या उत्क्रांति-तत्त्वावर विश्वास ठेवला तर माणूस हा विश्वात घडलेला एक अपघात आहे असे म्हणावे लागेल. पण "विश्व इतके निर्दय आहे काय?" डॉ. कुंझ हे अमेरिकन तत्त्वज्ञ-शिक्षण-शास्त्रज्ञ म्हणतात, मुळीच नाही. म्हणजे मानवी अस्तित्वाला काही अर्थ आहे. हा संदेश प्रसारित करण्यासाठी त्यांनी न्यूयॉर्कला "समग्र शिक्षण प्रतिष्ठान" ('फाउंडेशन ऑफ इंटिग्रेटिव्ह एज्युकेशन') नावाची संस्था स्थापन केली आहे, व समग्र शिक्षणाची ही कल्पना समजावण्यासाठी ते नुकतेच भारत-भेट देऊन गेले. दिल्लीच्या वास्तव्यात या कल्पनेवर बोलताना ते म्हणाले, 'घटित' व सत्य यांत फरक आहे, व मानवाला घटिताकडून सत्याकडे नेणे हे आमचे ध्येय आहे. या प्रयत्नात शिक्षणाचा फार मोठा वाटा आहे. कला व विज्ञानाच्या क्षेत्रात अगदी प्राथमिक पण तितक्याच अर्थगर्भ अनुभवांच्या आधारे घटिताकडून—म्हणजे गोचर सत्याकडून—एकदम तात्त्विक सत्याकडे जाणे योग्य होते. उदाहरणार्थ, 'गायरोस्कोपिक' भवऱ्याच्या मदतीने एकदम सापेक्षतावादाचे ज्ञान होऊ शकते. "जीवनातला नष्ट होऊ पाहणारा अर्थ" पुन्हा प्रस्थापित करण्याचा हा प्रयत्न आहे. त्याला भारतीय तत्त्वज्ञानाचा आधार नसला तरी "जगात हे एकच पुरातन तत्त्वज्ञान सुसंगत, समृद्ध आणि सुबद्ध आहे."

## □ 'यूनो'ची आवश्यकता

गेल्या काही वर्षांत आंतरराष्ट्रीय परिस्थिती अधिकच बिघडत चालली आहे व जागतिक शांततेला धोका निर्माण करू शकणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय समस्या अनिर्णित राहिल्या आहेत. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय सुरक्षा, जागतिक स्थैर्य आणि शांतता यांचे जतन करण्याचा मार्ग म्हणजे यूनो संघटना अधिक मजबूत व अधिक प्रभावी करणे हा होय, असे मत काही दिवसांपूर्वी युनायटेड नेशन्स इन्फर्मेशन सर्व्हिसचे प्रमुख रुडॉल्फ स्टायडुहर यांनी दिल्लीत एका भाषणात प्रकट केले. यूनो हे मानवी समाजाच्या प्रगतीसाठी घडविलेले साधन आहे, तेव्हा ते 'शून्यावकाशा'त कार्य करू शकणार नाही. यूनोत असणारे दोष हे त्या संस्थेच्या वैधानिक उद्दिष्टामुळे किंवा कार्यप्रणालीमुळे निर्माण झालेले नसून सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळे निर्माण झालेले आहेत. युनायटेड नेशन्ससारखी संस्था जगात आवश्यक आहे यात संदेह नाही. यूनो नसती तर अशीच एखादी दुसरी संस्था काढावी लागली असती. सध्या मानवी संस्कृती एका आणीबाणीच्या टप्प्यावर पोचली आहे व प्रगतीचा मार्ग संकटाच्या काट्याकुट्यांनी भरलेला आहे. या परिस्थितीवर मात करायची असेल तर आशावाद बाळगला पाहिजे म्हणूनच यूनोला सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे. ○

## □ वेडा कुठला !

खूप वर्षांपूर्वी मुंबईत एक वेडा राहत होता. वेडसर असूनही वक्तृत्व चांगले असल्याने त्याच्या सभांना गर्दी होत असे. त्याच्या एका व्याख्यानाला तुफान गर्दी लोटली होती. वेडा सांगत होता.

"नुसत्या संख्याबळात काय आहे असे म्हणणाऱ्या धूर्तांना एकदाखड सावून सांगणे भाग आहे की, संख्याबळ हेही बळच आहे! मुंगीला शारीरिक आणि मानसिक वाटेल तितका खुराक चारला तरी ती हत्ती होऊ शकणार नाही. हे जिना पाहा, ते अबदुल रहीम पाहा, ते गझनवी पाहा. हा कारागृहांतून चोरीच्या दहा शिक्षा भोगून अकरावी चोरी करण्याची संधी साधता येईतो वावरणारा गावगुंड पाहा. जो तो मुसलमान 'संख्या', 'संख्या' म्हणून गर्जत आहे! आमची संख्या अधिक म्हणून आम्हांला इतक्या जागा द्या! गावात आम्ही इतके म्हणून आम्हांला लोकल-बोर्डात इतक्या जागा द्या, शहरांत आम्ही इतके म्हणून नगर-पालिकेत इतक्या जागा द्या. प्रांतात आम्ही इतके म्हणून प्रांतात आम्हांला इतक्या जागा द्या! गव्हर्नरच्या जागेपासून पट्टेवाल्या-पर्यंत आमची संख्या इतकी म्हणून इतक्या जागा राखून ठेवा! संख्याबळाच्या वेडाने पिसाळलेल्या या भुतांकडे, धूर्तांनो तुमच्या कृपेचा फेरा का वळवीत नाही? संख्याबळाच्या नावावर हिंदूंचीच मुले आणि कुमारिका गुंडांनी पळवून नेल्याच्या बातम्या प्रत्येक पत्रात आणि न्यायालयात येत असताना तुमच्या पत्रातून आणि तोंडातून त्याचा उल्लेखदेखील का होत नाही! थोडी दया करा आणि हिंदूंच्याच बोकांडी असे येता जाता न बसता त्या संख्या-बळाच्या वेडाने जर्जर झालेल्या तंझीम तघलीघकडे आपले कटाक्ष टाका. नुसत्या संख्याबळात काय आहे हे शहाणपण आम्हांला शिकवण्याची तसदी आपण घेऊ नये. अगदी राहवत नसेल तर ते शहाणपण मुसलमान आदी भाईबंदांना जुम्मा मशिदीत जाऊन

शिकवा. अर्थात जुम्मा मशिदीची पायरी हे शहाणपण शिकवण्यासाठी चढण्याचे धैर्य तुम्हांला होत असेल तर ! ! "

बरे झाले, वेडा आता ह्यात नाही ! ऐन जोमात असता तर लूपभूषण चंद्रशेखरच्या चिंध्या करून टाकता. परंतु देशाच्या संबंधात हिंदूंच्या संख्येचा प्रश्न, असा जातीय विचार बाजूस टाकला तरी महाराष्ट्र, लूपयोजना आणि कुटुंबनियोजन यांत आघाडीवर असल्याची बातमी गेली काही वर्षे वाचून भित्र्या मूर्खांचा प्रश्न येई की—आपण असेच आघाडीवर राहिलो तर लोकसभेत महाराष्ट्राच्या सदस्यांची संख्या चाळीसची पस्तीस, पस्तीसची तीस अशी होत जाणार आणि केरळ, बंगाल, दिल्ली, उत्तर प्रदेश यांची लोकसभा सदस्यांची संख्या सतत वाढत जाणार.

कालांतराने दिल्लीश्वरांच्या हिशेबात—मणिपूर आणि महाराष्ट्र ही सारखीच ठरणार ! परंतु ही भीती व्यर्थ आहे. कॉंग्रेसच्या नेतृत्वात जी एकाहून एक सुपीक रत्ने आहेत त्यांतले निदान एक यासंबंधी आतापासून विचार करू लागले आहेत. डॉ. रफिक झकारिया—अरेच्या, पुन: हे मुसलमानच—असू द्या ! तर डॉ. झकारिया म्हणाले — " लोकसभेतल्या जागा आम्ही गोठवू म्हणजे कुटुंब नियोजनात आघाडीवर राहूनही प्रांताचे लोकसभेतील वलाबल अबाधित राहील ! "

घ्या ! आता काय पाहिजे ? परंतु बलाबल म्हणता म्हणजे संख्येत वल असते की काय ? हे बल म्हणजे राजकीय सत्ता की काय ? जाऊ द्या. डॉ. मियांनी उपाय शोधला याचा आम्हांला आनंद आहे. लोकसभेतील लोक पाटलांनी मजुरीचे दर गोठवावे, किंमती गोठवाव्या, सभासदसंख्या गोठवावी, सोने गोठवावे; बँका गोठवाव्या..., असे सारखे काही काही सतत गोठवत राहिले की भारताची सौभाग्यलक्ष्मी जेव्हा या गोठपाटल्या घालून ठुमकत ठुमकत चालू लागेल तेव्हा जग आश्चर्याने तोंडात बोट घातल्याशिवाय राहील की काय ?

रफिकमियाँ केव्हा गोठवता लोकसभा ? या आशेवर मराठी माणसे लूप बसवत आहेत हे विसरू नका ! —ग्यानबा

बर्मन संगीतातच दर्दी असतो अशी माझी समजूत होती, पण मध्यंतरी चित्रकलेतला बर्मन अचानक सापडला आणि एखादा शोध लागल्याचा आनंद झाला.

मुंबईचा फ्लोरा फौंटनचा भाग आहे ना, त्याच्याइतका गजबजलेला भाग दुर्मिळ. अशा या अखंड बजबजाटाच्या अति बकाल टापूत एका कडेलाच काचेचे एक दार ढकलले, की एका अत्यंत निवांत स्थळी आपण पोचतो. हे स्थळ नुसतेच निवांत नाही तर शीतल आणि रम्य देखील आहे. इथे येण्याला, इथल्या शांततेत आणि रम्यतेत घटकाभर उभ्या उभ्याच अवगाहन करण्याला कोणाचीही परवानगी लागत नाही किंवा चार्जही पडत नाही. काचेचे दार आतली शांतता आणि शीतल हवामान यांच्या रक्षणार्थ बंद असले तरी वस्तुतः इथे मुक्तद्वार आहे. उजाड घाटमाथीवरच्या थंडगार सावलीच्या देवळासारखे असलेले हे स्थळ, पुंडोले आर्ट गॅलरी या नावाने कलाजगतात सर्वतोमुखी झाले आहे. याचे धनी व्यापारी आहेत पण कलेच्या प्रामाणिक व्यापाऱ्याने जसे सुसंस्कृत, उदार असावे तसे ते आहेत. कला पाहण्याचे, तिचा आस्वाद घेण्याचे ते पैसे घेत नाहीत. त्यांच्या गॅलरीत चित्रावर

# रा त रा णी

मालकी हवी तरच पैसे पडतात. एरवी या, पाहा, आनंदित व्हा आणि खुशाल आपल्या वाटेने जा. आनंद येथे विनामूल्य वाटला जातो. या गॅलरीतच असा गोंगाट–उकाड्याचा वैताग जरा मनाबाहेर करण्यासाठी शिरलो तर चित्ररूपाने चित्रकार बर्मन भेटले. समोरच लावलेली त्यांची चित्रे नजर खेचून राहिली. पाय खिळले. या चित्रांचे आकार स्तिमित करणारे नव्हते. शैली नाजूक होती. रंगयोजना गहिरी होती. रंगांशी कागदाची कोरी पांढरीफेक पार्श्वभूमी कशी एकरूप झाली होती. जणू तोही एक प्रभावी रंगच ! प्रत्येक चित्र लोभस आणि देखणे होते.

दर्शनीच एक पारवळ आणि स्त्रीचा एक चेहरा असलेले चित्र होते. पारवळ पांढरे शुभ्र, गोजिरवाणे आणि स्त्री व्यथित, डागळलेली होती. चित्राचा अर्थ काय? ज्यात त्यात अर्थ शोधण्याची सवय झालेल्या माझ्या मनाने मलाच हटकले. मनाला मी म्हणालो, अर्थ कुणास ठाऊक ! तो न कळला तरी आता फिकीर नाही; पण पारवळ काय गहिरे काढून ठेवले आहे बेट्याने ! वाटत होते नजर जरा जास्त टेकली

*विजय तेंडुलकर*

तरी दुखावून भुर्रदिशी उडून जाईल – एखाद्या स्वप्नासारखे ! तसे तरल, तसे वेड लावणारे. बाईवर चित्रकाराचा जरासा रागच दिसत होता. तिचे सगळे सौंदर्य त्याने हिरावून जणू त्या पारवळाला दान केले असावे तशी ती सौंदर्यहीन, जून, वातड होती. त्यात तिच्या डोळ्यांपासून पार गालाखालपर्यंत रंग चरला होता. अ–सुंदर, भुकेल्या मुद्रेच्या स्त्रीमुळे पारवळ आणखीनच सुंदर वाटत होते; किंवा त्या सुंदर पारवळामुळे स्त्रीचा तो चेहरा अधिकच जून, अ–सुंदर आणि भुकेला वाटत होता. दोघांनी जणू एकमेकांना उठाव देत परस्परांना तोलून धरले होते. एकाविना दुसरे अपूर्णच ठरले असते असे वाटू लागले. दोन्ही मिळूनच एक शब्दातीत संवाद निर्माण होऊन ते चित्र परिपूर्ण झाले आहे असे वाटले. मनात आले की गंमतच आहे ! जास्त पाहावे तेवढे हे चित्र जास्त पटते आहे. त्याची पहिली ओढ ओसरत नाही. हा चित्रकार साधासुधा दिसत नाही. साध्या रंगरेषांनी आणि मांडणीने हा बघणाऱ्याला पक्का पकडून धरतो – तोही ढोबळसा अर्थबिर्थ न सांगता.

मग पुढच्या चित्रांकडे निघालो, तर आणखीच गंमत. सगळेच आकार साधे,

# शक्ती बर्मनची झपाटलेली चित्रे

सोपे, अगदी खेळातले; आणि सारे चेहरे कमालीचे निरागस – इतके की या व्यवहारी जगाबाहेरचे वाटावेत. जणू अर्भकेच प्रौढ केलेली. किंवा बाहुल्या सजीव झालेल्या. कुठे चुकूनही व्यवहाराचा रोकडेपणा उमटलेला नव्हता. आणि कागदाकागदावर, चौकटीचौकटीत आल्हाददायक रंगांनी जणू रेषांभोवती रेशमी, हळुवार, तलम कोष गुंफले होते आणि रेषा अतिनाजूक वेलींसारख्या रंगाभवती गुंफण करून धावत, मुरडत, लवत, तुटत, टवकारून बघत इतस्तत: पसरल्या होत्या. रंग जणू सशाच्या काळजासारखे जागोजाग स्पंदन पावत होते आणि रेषा अशा नजरेसमोर वाढत होत्या. जवळजवळ प्रत्येक चित्र चैतन्याचा असा मजेशीर अंश बाळगून होते. त्या मर्यादित आकाराच्या आटोपशीर चित्रांनी आपल्याला कैदच केले.

एक अंडाकृती चेहरा – त्या साऱ्या प्रदर्शनात हा मोठ्या आकाराने प्रथम नजर वेधून घेत होता – मोठ्ठ्या मोठ्ठ्या विस्फारल्या डोळ्यांनी जणू खूप रागावल्यासारखा आपल्याकडे पाहत होता. राग आपल्याविषयीचाच नसावा. किंवा नक्की कशाविषयीचाच नसावा. पण फाटेस्तोवर ताणलेले भले बटबटीत डोळे, टरटरून फुगलेले गाल, एकावर एक घट्ट बसलेले जाडे जाडे ओठ, बसके नाक यांनी तो भलताच उग्र झाला होता आणि जणू आपल्याकडे चाल करून येत होता. पण चाल करण्याला त्याला माणसासारखे पाय पुरवलेले नव्हते, त्याला धडही नव्हते. फक्त

चेहरा आणि त्याला काहीसे कोळिष्टक विणणाऱ्या एकाद्या थोराड कोळयाच्या पायांसारखे चार पाय. कदाचित ते त्याचे पाय नसतीलही. पण ते जे काही होते ते टेकीत तो झपाटलेला नि विलक्षण चेहरा जणू आपल्या दिशेने चाल करीत होता. पुढे पुढे येण्याच्या भासात तो वाढत असल्याचाही भास होत होता आणि तो मुळी आपल्यापर्यंत पोचेस्तोवर उधाण समुद्राच्या पावसाळी लाटेसारखा भला मोठा वाढून आपल्याला गिळून टाकणार असे वाटत होते. तो चेहरा वास्तव नव्हता. तो कुरूप होता पण तसा भयावह नव्हता. तो उबगलेला होता पण किळसवाणा नव्हता. रौद्र होता पण भडक नव्हता. त्यापासून पळावे असे वाटत नव्हते; गिळले जाणे अपरिहार्य वाटत होते. असा चेहरा युगे युगे निद्रेचा, शांतीचा कणही वाट्याला न आल्यासारखा, बिन पायांनी चालणारा – केवळ स्वप्नसृष्टीतच दिसू शकत होता. चित्रकाराच्या सृष्टीत त्याला प्रतिभेच्या एका स्पर्शाने जन्म लाभत होता आणि त्या प्रदर्शनात तो येऊन बसला होता. शीर्षक होते 'द हेड' – मस्तक. शीर्षकाने फारसे काही समजत नव्हते पण समजण्यासारखे काही त्या साध्या, गरगरीत, किरमिजी चेहऱ्यात नव्हतेच. होते ते जाणवण्यासारखे. ते मात्र फार होते.

## 'लास्ट सपर'

तिसऱ्या चित्रात छोटे छोटे, अंगठ्यांच्या रंगीत ठशात घाईने कोरावेत तसे काही नुसते चेहरे मांडले होते. त्यात एकच चेहरा बदामाकृती, मोठा होता. स्वतःचे व्यक्तिमत्त्व इतर सपाट चेहऱ्यांत उठून दाखविणारा होता. देखणाही होता. पण त्याची एक बाजू उद्ध्वस्त वाटत होती. त्या बाजूवर व्यथाच व्यथा साकळली होती आणि दुसऱ्या बाजूकडला एकच एक टपोरा डोळा असा काही आपल्यावर लागलेला होता म्हणता ! कणवेने, उदासपणे त्या डोळयांत तेज होते, सौंदर्य होते, आर्तता होती. ह्या डोळयाने आपल्याला बेचैन केले. कुठेही गेले तरी तो एकच डोळा जणू तसा आपल्या दिशेने फिरत होता. दुसरे काही पाहणेच त्याने अशक्य करून टाकले! एवढी ही सुंदर व्यथा कोठली म्हणून सहज शीर्षक शोधले तर ते होते 'लास्ट सपर'–दगाफटका होऊन क्रुसावर चढण्याआधीचा बायबलमधला येशू ख्रिस्ताचा प्रसंग ! तो जिवंत डोळा एकूण येशूचा होता. पण तो कुणाचा होता हे न कळताही त्यातली व्यथित स्वर्गीय करुणरम्यता पोचलीच होती. तो जिवंत डोळा त्या चित्रात इतर सपाट चेहऱ्यांच्या मांडणीमधून आणि दुसऱ्या उद्ध्वस्त, कोंदटलेल्या डोळयाच्या मदतीने इतका प्रभावी करणाऱ्या चित्रकाराला–शक्ती बर्मनला– आपण सलामच करून टाकला. असा नुसता एक डोळा नि एक चित्र काढता आले तरी आपले उभे आयुष्य धन्य झालेसे वाटेल असे वाटले– खोटे नाही !

'रोप वॉकर' म्हणून एक चित्र होते. त्यात ब्रशाच्या फटकाऱ्यातून उंच तंग दोरखंडांवरचे कसरतबाजांचे एक जोडपे बर्मननी ब्रशाच्या फटकाऱ्यांनी दाखवले

होते. दोघांचेही चेहरे दोरखंडावरच्या चालीत हरवले होते. त्यांना उरला होता फक्त शर्थीने सावरून धरलेला तोल आणि दोघांनी अलग राहूनहीं जणू एकमेकांच्या मदतीने तो सावरल्यासारखा वाटत होता. दोघांचे एक तोल-रूप नाते झाले होते आणि त्यामुळेच ते चित्र कसलीही चौकटबिकट न आखताच एकजीव, बंदिस्त वाटत होते. 'मॅन वुइथ सेव्हरल हेड्स' म्हणून एक चित्र होते. त्यात एक स्त्री– सत्यसृष्टीतली नव्हे, बर्मन यांच्या वेगळ्या प्रतिभासृष्टीतली– आडवळून राहिली होती आणि एक बाटचा उभा होता त्याला चौदा मस्तकांचे पर्याय बर्मननी दिले होते. सगळे चौदाही चेहरे जवळ जवळ सारखेच. आडवळलेली स्त्री त्या अजब बाटचाकडे न पाहता आपल्याकडेच पाहत होती. जणू म्हणत होती– काय ते समजत नव्हते, पण म्हणत मात्र होती. हा रावण महाराजांचा चार मस्तकांनी वाढवलेला अवतार कोण ? मनाने विचारले. आपण म्हणालो, कुणी का असेना. चौदा मस्तकांचे हे चित्र लक्ष वेधून घेणारे आहे एवढे खरे. स्त्रीच्या संदर्भात पुरुषाचे हे विविध मुखवटे असू शकतील. चौदाही मुखवटेच; अस्सल आणि अंगचे असे त्याला काही नाहीच... 'कलर' म्हणून एक चित्र होते. त्यात एका घरावर अद्भुतरम्य स्वप्निल रंगांचा हलका वर्षाव चित्रकाराने चालवला होता. पाहून नजर त्या वर्षावाच्या किमयेत चिंब होऊन निघते आहेसे वाटत होते. पटत होते की हे केवळ सफाईचे, हुशारीचे किंवा कसबाचे काम नव्हे, इथे प्रतिभेचा अव्वल स्पर्श आहे. रंगरेषांत तो ओथंबला आहे.

दहा–पाच मिनिटांसाठी शिरलो नि जवळ जवळ दीड तास एका चित्रकाराला पांढऱ्या कागदांच्या मैहिरपीत पडलेल्या त्या रंगरेषांच्या बावीस स्वप्नांत गुंगून गेलो. बाहेर पडलो तो ख्रिस्ताचा एक अविस्मरणीय करुणार्त डोळा नि तो झपाटलेल्या बिनधडाचा गरगरीत सरपटता चेहरा बरोबर घऊन. किंबहुना मी बरोबर घेण्याचा प्रश्नच नव्हता. ते माझ्यामागून येत राहिले.

तेव्हापासून बर्मन हे आडनाव आता चित्रकलेतही आपण मानू लागलो आहोत. हे शक्ती बर्मन वयाच्या तिशीतले; कलकत्त्याचे. १९५६ पासून फ्रान्सच्या पॅरिस शहरी त्यांनी वास्तव्य केले. इटली, स्पेन, ग्रीस, मोरोक्को, ईजिप्त, सिलोन आणि जर्मनी त्यांनी हिंडून पाहिले आहेत. प्रदर्शनानिमित्ताने ते मुंबईत होते.

देशोदेशी भटकून या तरुण माणसाने देशांचा तपशील नाही चितारला– चित्ररूप प्रवासवर्णन नाही मांडले. सर्व देशांत स्वतःला वाटू न टाकून जणू त्याने एक वेगळीच सृष्टी शोधून काढली– आपल्या प्रतिभेची दिव्य अद्भुत सृष्टी आणि तिथेच तो रमला आहे.

○



"आमच्या धर्माला आणि आमच्या शिवाजीराजाला दुनियेत तोड नाही ! अरे, या शिवाजीच्या महाराष्ट्रात जन्माला यायला पूर्वजन्मीचं पुण्य पाहिजे !"

# स्मारक

सौ. शकुंतला फडणीस

छताचं झुंबर हेलकावतच होतं अन् बाबासाहेब येरझारा घालीतच होते. बाहेर जोराचा वारा सुटला होता. पाऊस नुसता पिसाळला होता. विजा चमकत होत्या. वीज चमकली की पेशवाई थाटाचा तो दिवाणखाना लखकन् उजळायचा अन् भिंतीवर लटकवलेला सिंहाचा मुखडा जास्तच विक्राळ दिसायचा. बाबासाहेब चालताना मध्येच थबकत. हाताची घडी घालत, मधूनच त्या सिंहाकडे बघत. त्याच्याजवळच भिंतीवर टांगल्या होत्या दोन समशेरी; आणि एक भली मोठी ढाल. ती ढाल, त्या समशेरी, तो सिंहाचा जबडा अन् सिंहाच्याच छातीचे बाबासाहेब–

या वीस वर्षांत दुनिया इकडची तिकडे झाली, पण या चार वस्तू अजून घट्ट होत्या. मजबूत होत्या. शरण येईल त्याला अभय देणाऱ्या होत्या. पासष्ट वर्षांच्या बाबासाहेबांचे बाहू अजून कणखर होते. शे-सव्वाशे वर्षांच्या त्या समशेरी अजून धारदार होत्या, आणि दीडशे वर्षांपूर्वीची ती ढाल तर अजून इतकी दणकट होती, की बघणाऱ्याला वाटावं, आपलं संरक्षण करायलाच ही आता सज्ज झाली आहे. या सगळ्यांचा रुबाबच असा पाणीदार की बघणारा क्षणभर अवाक् होई ! त्याला मनोमन वाटे इथं साक्षात् इतिहास जिवंत झालाय. फक्त समोरच्या तसविरीतून शिवाजीराजेच बाहेर यायला हवेत !

तो जुना पण भक्कम वाडा, त्यातल्या ऐसपैस माड्या, भलीथोरली जाजमं, हंड्या, झुंबरं, एखाद्या खुंटीवर अडकवलेला फेटा, एखाद्या कोपऱ्यातला लखलखीत भाला, देवघरातली परातीएवढी चांदीची छत्री. बाबासाहेबांची सरदारकी पावलोपावली जाणवत होती. त्या सरदारकीचा त्यांना अभिमान दांडगा. आणि त्यांच्या लढवय्या, बाणेदार घराण्याचं कर्तृत्व असं, की त्या वाड्यात गेल्या गेल्या पाच मिनिटांतच कुणालाही पटावं.

पण ते पटलं नव्हतं राजाभाऊला ! चाळीशीत झालेल्या त्यांच्या एकुलत्या एक लेकाला ! राजाभाऊ मुळी सरदाराच्या वंशजाला शोभण्यासारखं कधी वागलाच

नाही. कळू लागल्यापासून त्यानं कधी अंगाला सोनं लागू दिलं नव्हतं. वडिलांसारखं रोज चांदीच्या ताटात जेवणं त्याला मुळीच पसंत नव्हतं. चौदा वर्षांच्या वयाला यानं आपल्या खोलीतली खापरपणजोबांची सोनेरी चौकटीची मोठी तसबीर हट्टानं काढून टाकली होती.

मात्र एवढी एकच गोष्ट सोडली तर राजाभाऊ तसा फार गुणी होता. हुशार अभ्यासू अन् स्वभावानंसुद्धा मनमिळाऊ. शाळेत अन् कॉलेजमध्ये तो सर्वांचा आवडता होता. एम्. एस्सी. झाल्यावर बाबासाहेबांच्या या एकुलत्या एक पोराने खुशाल परभारे नोकरीसाठी अर्ज ठोकून दिले. त्यांच्या घराण्यात आजवर असलं बदनामीचं कृत्य कुणीही केलं नव्हतं. लहरीला येईल तेवढं शिक्षण घेतल्यावर राजाभाऊचे चुलत, आणि चुलतचुलत भाऊ, घरचं बघू लागले होते. पण त्या साऱ्यांचं 'घरचं बघणं' पाहून राजाभाऊनं सरळ नोकरी धरायचं ठरवलं. ज्या कॉलेजात तो शिकला, त्याच कॉलेजात तो गणिताचा लेक्चरर झाला.

बाबासाहेबांना हे मुळीच आवडलं नाही. त्यांनी स्वत: असलं काही केलं असतं तर त्यांच्या वडिलांनी आकाश-पाताळ एक केलं असतं. पण स्वत: बाबासाहेबांनी मात्र तसलं काही केलं नाही ! मुलानं नोकरी धरल्याचं त्यांना आवडलं नव्हतं तरी ते त्यांनी मनातच ठेवलं. मुलाला अद्वातद्वा बोलून वाडा डोक्यावर घेणं त्यांना आणि त्यांच्या तापट स्वभावाला सहज शक्य होतं. पण त्यांनी तसलं काहीएक केलं नाही. फक्त ते मुलाला एवढंच म्हणाले—

" राजाभाऊ, आपण पिढीजाद वतनदार. अजून तीन पिढ्या पुरेल एवढा पैसा आपल्या घरी आहे. कशाला तुला नोकरीची दगदग हवी ?"

तो गणिताचा लेक्चरर इतकंच म्हणाला— " ते सगळं खरं आहे, पण जरा चालू काळाचाही विचार करायला हवा, बाबासाहेब." मग बाबासाहेब काहीच बोलले नाहीत. बाहेर इतर लोकांशी बोलताना मात्र ते म्हणाले— " अहो, इतके हुशार आहेत आमचे राजाभाऊ, तर त्यांच्या हुशारीचं, त्यांच्या शिक्षणाचं चीज नको का व्हायला ? इथं, या आडगावात, काय त्यांनी गंजत पडायचं ? शहरात राहतात, विद्यादानाचं पुण्यकर्म करतात, चांगलं आहे, चांगलं आहे ! "

राजाभाऊचं चांगलं चाललं होतं हे तर खरंच, पण तो तिकडे एकटा राही. बाबासाहेब एवढ्या मोठ्या वाड्यात एकटे राहत. एकटे म्हटलं तरी दहा माणसं होती. जुना पिढीजाद गडी, स्वयंपाकी, कारकून, माळी, पूजेचा ब्राह्मण, कुणीतरी आश्रित, वाराचा मुलगा, एक–दोन अतिथी. सगळा सरंजाम तसाच होता अन् या सरंजामासकट एखाद्या राजाच्या रुबाबात बाबासाहेब त्या वाड्यात राहायचे. वाड्याला मालक होता, पण मालकीण मात्र फार लौकर निघून गेली होती.

कदाचित म्हणूनच, राजाभाऊ वरचेवर वडिलांना भेटायला येई. दोन दिवसांची जरी सुटी असली तरी तो गावी येई. शिवाय प्रत्येक सणावाराला. घरी गणपती

वसायचे त्या वेळी तर तो कधी चुकायचा नाही. आपण यायचा. बरोबर एखाद-दुसरा मित्र, कधी तरी एखादा विद्यार्थी! प्रत्येक ठळक सणाला राजाभाऊ कुणी-तरी पाहुणा घेऊन येई. या वेळी तो गावातल्या दोघा कार्यकर्त्यांना घेऊन आला. काळे आणि कीर्तिकर. कार्यकर्ते म्हणजे काय, त्याच्याहून जरासे मोठे – तरुण मुल-गेच होते. मोठे उत्साही. गणपतीचं निमित्त करून बाबाबाहेबांकडे दुसऱ्याच कामाला आले होते. बाबासाहेबांची श्रीमंती जशी आसपास प्रसिद्ध होती, तशी त्यांची दातृत्वबुद्धिदेखील! देवधर्म, मदत किंवा आहेर करावेत तशा सहजपणे बाबासाहेब देणग्या देऊन टाकायचे. शे-पाचशे, म्हणजे कमीत कमी. कधी कधी हजार–अकराशे, पंधराशे. कधी कधी दोन हजारसुद्धा. कुठलाही निधी असो. टिळक, गांधींपासून नेहरू स्मारक निधी, संरक्षण निधी, बिहार दुष्काळ निधी – प्रत्येकाला बाबासाहेबांची देणगी असे. मागे एकदा त्यांच्या गावी शिवाजीचा पुतळा बसवायचं ठरलं त्या वेळी तर त्यांनी अकरा हजार रुपये दिले होते. खरं म्हणजे त्यांनी आधी दोन हजारच दिले होते. पण मग केवळ आठ–नऊ हजारांसाठी पुतळ्याची योजनाच फिसकटायची वेळ आली. बाबासाहेबांच्या कानी ही कुणकूण लागली मात्र – दोन हजार रोख जाकिटाच्या आतल्या खिशात बांधून, चेकबुक घेऊन, ते भर दुपारी दोनच्या उन्हात तरातरा समितीच्या अध्यक्षांकडे गेले. गेले अन् म्हणाले–

"काय रे देशपांड्या, पुतळ्याचं कुठवर आलंय?" देशपांड्यानं चाचरत पैशाची अडचण सांगितली. अन् त्या वेळी बाबासाहेब म्हणाले होते–

"अरे मूर्खांनो! हा बाबासाहेब तुमच्या गावात जिवंत असताना तुम्ही पैशाची अडचण सांगता? कुणाला? कशासाठी? हे घे पैसे – आजच्या आज मुंबईला जा आपली ऑर्डर पक्की करून ये. आणि हा चेक – नऊ हजारांचा – परवाच्या दिवशी पाडवा आहे. पाडव्याला करार पक्का करा. पुढच्या वर्षी शिवजयंतीला आपल्या गावात पुतळा उभा राहिला पाहिजे! अरे, शिवाजी महाराजांची चाकरी करता करता आमचे बापजादे धन्य झाले, आम्हांला निदान महाराजांच्या पुतळ्याची तरी सेवा करायला मिळू दे!"

बाबासाहेबांचा स्वर एकदम भिजून गेला. शिवाजीबद्दल त्यांचा आदर तसाच अपरंपार होता. देवाच्या खालोखाल ते मानीत फक्त दोनच गोष्टी. एक म्हणजे आपला धर्म आणि दुसरी म्हणजे तो धर्म राखणारे छत्रपती शिवाजी! ते म्हणत, "आमच्या धर्माला आणि आमच्या शिवाजी राजाला – त्यांच्या थोरवीला – दुनि-येत तोड नाही! अरे, या शिवाजीच्या महाराष्ट्रात आणि आमच्या हिंदुधर्मात जन्माला यायला पूर्वजन्मीचं पुण्य पाहिजे, पुण्य!"

बाबासाहेब असं बोलत ते इतकं आदरानं, इतकं भक्तिभावानं, इतकं अभि-मानानं, की ऐकणाऱ्यालासुद्धा निदान त्या क्षणी असंच वाटावं, "खरंच, या शिवाजीच्या महाराष्ट्रात आणि आमच्या हिंदुधर्मात जन्माला यायला पूर्वजन्मीचं

पुण्य पाहिजे, पुण्य !

आणि हे सगळं माहीत असल्यामुळेच राजाभाऊचे हे दोन स्नेही – काळे आणि कीर्तिकर – बाबासाहेबांकडे मुद्दाम आले होते. देणगीच्या आशेनं. देणगी ज्यासाठी मागायची ते कारणसुद्धा तसंच जबरदस्त होतं. हे दोघेजण युवक संघटनेचे कार्य-कर्ते होते. आणि त्यांच्या संघटनेमार्फत विवेकानंद स्मारकनिधी जमवणार होते ते जास्तीत जास्त निधी जमवण्याचा त्यांनी संकल्प केला होता. घरोघर जाऊन निधी जमवायचा, स्वत: कामं करून पैसे मिळवून ते निधीत जमा करायचे, महत्त्वाच्या पत्रांचा किंवा छायाचित्रांचा लिलाव करायचा अन् ते पैसे पण निधीत मिळवायचे– त्यांचे प्रयत्न अखंड चालले होते. यश येत होतं. रक्कम थोडी थोडी वाढत होती. आणि ती एकदम वाढावी या अपेक्षेनं ती तरुण पोरं बाबासाहेबांच्याकडे समक्ष आली होती.

त्यांची खेप वाया गेली नाही. बाबासाहेबांनी खिशात हात घालून पाचशे रुपये बाहेर काढले आणि ते म्हणाले, " तुम्हांला आनंद वाटेल इतकी रक्कम मी निश्चित देईन. आज तुम्हांला विन्मुख पाठवत नाही. हे पाचशे एक घेऊन जा. बाकीच्या रकमेची एका आठवड्यात व्यवस्था करतो. तुम्ही निश्चित असा." बाबासाहेबांचा शब्द म्हणजे शब्द. तरीसुद्धा काळेने धीर करून म्हटलं, " आपले आभार मानावेत तेवढे थोडे. पण आपण कितीची देणगी देणार याचा अदमास कळला तर–"

बाबासाहेबांना हसू आलं. ते मोठमोठ्यानं हसत म्हणाले– " अदमास ? काय हो, तुमची काय अपेक्षा आहे ? "

" अं – म्हणजे – मला वाटतं – दोन – नाही पाच हजार– "

" पंचवीस हजार देणार आहे मी ! असं माझ्या तोंडाकड बघताय काय ? तुमच्यासारख्या पोरासोरांजवळ पंचवीस हजार देऊन टाकायला मला काही खूळ लागलं नाही. हे बघा, तुम्हा हल्लीच्या पोरांना आपल्या धर्माचं महत्त्व कळलं याचाच मला इतका आनंद झालाय की. बस ! तेवढ्यासाठी मी चार पैसे जास्तच द्यायला निघालोय."

बाबासाहेबांनी त्या दोघांना जरी असं सांगितलं तरी अंदर की बात थोडी निराळी होती. युवक संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब सामंत हे स्वत: थेट बाबा-साहेबांचे प्रिय मित्र होते. युवकसंघटनेला द्यावयाचे पैसे बाबासाहेब स्वत: आप्पा-साहेबांकडे पोचते करणार होते. आणि एकदम एवढी मोठी देणगी द्यायचं खरं कारण–बाबासाहेबांना असं मनोमन वाटलं की–

" आता आपलं वय होत चाललं. आपल्याला शक्य आहे तोवरच हे सत्कृत्य एकदाचं करून टाकावं... उद्याचं कुणी पाहिलंय ? शिकागोला आमच्या धर्माचा यशोध्वज फडफडवणाऱ्या त्या महाभागाचं – विवेकानंदांचं – एवढं मोठं स्मारक होणार, त्यासाठीच आपल्या पैशाचा विनियोग व्हावा – त्यापरतं भाग्य नाही !

देवाच्या दयेनं मला काही कमी नाही. माझ्या थोर धर्माचं माहात्म्य वाढवणाऱ्याचं हे स्मारक, त्याला मी जास्तीत जास्त दिलं पाहिजे !" आणि ही जाणीव इतकी प्रभावी झाली की बाबासाहेबांनी त्या निधीला पंचवीस हजार द्यायचं पक्क ठरवून टाकलं.

गणपतीसाठी आलेले ते पाहुणे, दीडच दिवसांसाठी आलेला बाबासाहेबांचा गणपती पोचवून मगच परतले. ८–१० दिवसांनी काळे–कीर्तिकरांची दुक्कल पुनः येणार होती आप्पासाहेबांसह. पंचवीस हजारांची देणगी घ्यायला.

दरम्यान बाबासाहेब एक–दोन दिवस शहरात चक्कर टाकायला गेले. शहरातले गणपती बघायचं निमित्त केलं. पण खरं म्हणजे त्यांची दोन बडी कुळं तिथं होती. त्यांच्याकडून काही वसुलीची, पैशाची व्यवस्था करायलाच ते गेले होते. ती व्यवस्था मनासारखी झाली. गणपतीची अमृतमहोत्सवी आरास पाहिली अन् तृप्त अंत:करणाने बाबासाहेब गावी परतले.

पण ते परतेपर्यंत त्यांच्या घरी चाळीस हजारांची चोरी झाली होती ! बाबासाहेब हादरून गेले. सात पिढयांत कधी न घडलेली गोष्ट घडली होती. बाबासाहेबांच्या वाड्यात चोरी झाली – तीही थोडीथोडकी नव्हे, चाळीस हजारांची ! बाबासाहेबांना धक्काच बसला अन् चाळीस हजार गेल्यापेक्षाही त्यांना चोराच्या मस्तीखोरपणाची चिरड आली. आणि आजवर त्यांच्या नावाचा दबदबा असा की विचारल्याशिवाय त्यांच्या बागेतलं फूलसुद्धा कुणी तोडलं नव्हतं. बाबासाहेबांच्या नावाचा दरारा जणू त्या चोरानं एका रात्रीत पुसून टाकला !

त्या पाठोपाठ दुसरा धक्का ! हे सारं ज्यापुढं तुच्छ वाटावं अशीच घटना त्यांच्या गावात घडली होती. त्यानं बाबासाहेब ढवळून निघाले. रागानं नखशिखान्त लाल झाले. संतापानं थरथरू लागले. त्यांचं ग्रामदैवत असलेल्या श्री गजाननाच्या मूर्तीचा एक हातच कुणीतरी तोडला होता ! सारं गाव भदरून गेलं. कुणी केलं हे पाप? कुणाचं वाडस असेल हे? आमच्या दैवताची अशी विटंबना? बाबासाहेब खवळले होते नुसते.

आणि दुसऱ्या दिवशी, तिसऱ्या दिवशी, चौथ्या दिवशी वर्तमानपत्रांत तशाच बातम्या. तसल्याच प्रकारांची पुनरावृत्ती. नगर, सातारा, पंढरपूर, बीड, मालेगाव, सोलापूर–रोज पेपर उघडला की असलीच बातमी ! बाबासाहेब भडकून गेले होते. त्यांचे हात नुसते शिवशिवत होते. जेवणखाण, तहानभूक, झोप – काही त्यांना सुचत नव्हतं ! रात्रंदिवस एकच विचार.

शेलारमामाच्या आवेशात ते ओरडले– "शासन ! त्या हरामखोराला शासन केलं पाहिजे. त्याचं मुंडकं छाटून टाकलं पाहिजे !" त्या विचारानं बाबासाहेबांच्या नसा नुसत्या तटतटल्या होत्या.

चोरीची बातमी कळताच राजाभाऊ तातडीनं, स्पेशल मोटार करून वडिलांना

भेटायला गेला. चोरी कशी झाली, केव्हा झाली, काय काय गेलं, पोलिस काय म्हणाले, ठसे वगैरे पुसले नाहीत ना – त्यानं सगळी चौकशी केली. त्याच्या मागोमाग आले आप्त, इष्टमित्र, भाऊबंद – सगळ्यांच्या त्याच चौकशा. तेच प्रश्न – एवढी मोठी चाळीस हजारांची चोरी झाली, कशी झाली, केव्हा झाली, काय काय गेलं – सगळी माणसं चोरीच्या आणि चोराच्या विषयातच बुडून गेली होती.

"आणि बाबासाहेब, वहिनी साहेबांची नथसुद्धा गेली म्हणे ?"

"वहिनीसाहेबांची नथ ? बापरे, अगदी अस्सल जातिवंत नग हं तो !"

"अहो, अशी हिरेजडित नथ आता बघायला मिळायची नाही. दोन हजारांची असेल ! मला आठवतं, ती नथ घातली म्हणजे वहिनीसाहेब कशा महालक्ष्मीसारख्या दिसायच्या ! !

अन् बाबासाहेब मध्येच म्हणायचे– "काय हो, तुमच्या गावी लक्ष्मीनारायणाच्या मंदिरात काय प्रकार झाला ? – लक्ष्मीच्या मूर्तीचं काय ? नाकाचा टवका उडवला म्हणे कुणी–"

"बघा ना, कसली भीती म्हणून राहिली नाही लोकांना, माजलेत नुसते."

"म्हणून तर असल्या चोऱ्या करतात ! काय हो राजाभाऊ, अन् कपडेही गेले म्हणे !"

"तर ! अहो ते जुने शालूशेले अन् पैठण्या – काय जड एकाहून एक. अगदी खरी जर ती !"

बाबासाहेब मध्येच बोलायचे– "परवा म्हणे मालेगावला शंकराच्या पिंडीवर हिरवं फडकंच कुणी टाकलं होतं ! काय धाडस आहे पण करणाऱ्याचं. आपले लोक एकजात बुळे. इतकं गावोगाव चाललंय पण नुसते मेल्यासारखे पडून राहिलेत. एकाला स्वाभिमान नाही !"

बाबासाहेब पुनः पुनः तेच बोलत होते. आलेल्या माणसांनाही आश्चर्य वाटलं. चाळीस हजारांसाठी दुसरेच हळहळत होते. मधूनच नव्या चित्रपटाबद्दल किंवा टेरिकॉटबद्दल सांगत होते – अन् स्वतः बाबासाहेब मात्र राहून राहून बोलत होते– काश्मीरकन्येबद्दल, गणपतीच्या तोडलेल्या हाताबद्दल, हिरव्या फडक्याबद्दल ! राजाभाऊ मात्र स्थितप्रज्ञ. तो फारसा बोलतच नव्हता.

इतरांप्रमाणे काळे आणि कीर्तिकरसुद्धा आवर्जून बाबासाहेबांची भेट घ्यायला गेले. त्यांचं सांत्वन करायला, त्यांना धीर द्यायला ! या देणगीची एवढी गडबड नाही, सवडीनं दिले किंवा कमी दिले तरीही हरकत नाही, असं सांगायला काळे आणि कीर्तिकर मुद्दाम भाडं खर्चून बाबासाहेबांना भेटायला गेले. गेल्यावर रीतसर त्यांनी चार धीराचे शब्द सांगितले. आणि मग देणगीची काही गडबड नाही इत्यादी सांगण्यासाठी कीर्तिकरनं सुरुवात केली.

"बाबासाहेब, मध्यंतरी आम्ही आलो होतो – विवेकानंदांच्या स्मारक-

निधीबाबत-"

त्याचं बोलणं मध्येच तोडून बाबासाहेब जोरात ओरडले- "चूप! विवेकानंदांचं नाव घेऊ नका!" बाबासाहेब इतक्या जोरात ओरडले की बैठकीतली माणसं एकमेकांकडे बघतच राहिली.

"विवेकानंदांचं स्मारक म्हणे! नालायक, हरामखोर कुठले. ढोंगी, मतलबी-अरे, त्या विवेकानंदांचं नावसुद्धा उच्चारायची लायकी नाही तुमची!"

आता खुद्द राजाभाऊ चक्रावून गेला. बाबासाहेबांचा राग त्यांनी पाहिला होता. कारणाकारणानं, किंवा एकेकदा कारणाशिवायसुद्धा, जुन्या पिढीतल्या कर्त्या पुरुषाला शोभेल इतपत तापट होतेच बाबासाहेब. पण आलेल्या पैगाहुण्यांशी ते असं कधीही बोलले नव्हते. आता मात्र ते कुणाचा मुलाहिजा न बाळगता संतापानं खवळून ओरडत होते-

"नामर्दांनो! बांगड्या भरा हातांत! तुम्हांला आपल्या धर्माचं रक्षण करता येत नाही-कशाला विवेकानंदांचं स्मारक बांधता? कशाला शिवाजीचे पुतळे उभारता? चोरांनो. विवेकानंदांचं नुसतं स्मारक बांधून धर्माचं ऋण फिटतं काय? गावोगाव शिवाजीचे पुतळे उभे करायचे-कशाला? त्या पुतळ्यानं हे अनाचार अन् भ्रष्टाचार बघायला? तुमच्या देवांचा अपमान होतो, मूर्तींची विटंबना होते, तुमच्या गाई कापल्या जातात-तुमच्या बायकामुलींची इज्जत लुटली जाते-त्याची तुम्हांला शरम वाटत नाही? भ्याड, पुळचट कुठले!"

त्या पोरांची तोंडं गोरीमोरी झाली. बाबासाहेबांच्या तोफखान्यापुढे काळे-कीर्तिकर गारद व्हायची वेळ आली. राजाभाऊ हळूच उठून त्यांच्याजवळ गेला अन् म्हणाला- "बाबासाहेब, शांत व्हा. शांत व्हा!"

"शांत होऊ? अन् तू मला सांगतोस? अरे, इकडं आग लागली आहे-अंगाचा भडका उडाला आहे. अन् तू म्हणतोस शांत व्हा? अरे, तूही तसलाच! तुम्ही सारेच कसे असे थंड गोळे? नादान-बवकूफ! अरे, आमच्या स्वातंत्र्यातसुद्धा आमचा धर्म इतका पोरका, इतका अनाथ झाला? कशाला बडेजाव मिरवता विवेकानंदांच्या नावाचा?" बाबासाहेबांचा आवाज टिपेला चढला होता. डोळे इतके लाल झाले होते की आणखी काही ते बोलले तर जणू त्यांच्या डोळ्यांतून रक्त ठिबकलं असतं.

"एक नवा पैसा देणार नाही तुम्हांला! चालते व्हा! फंड जमवतात म्हणे!"

"बाबासाहेब, तुम्हांला काही द्यायचं नसेल तर देऊ नका, पण त्या पाहुण्यांवर कशाला ओरडता उगीच?" लहान मुलाला सांगावं तसा समजुतीनं राजाभाऊ बोलला.

"उगीच? मी उगीच ओरडतोय? उगीच ओरडायला मला वेडबीड लागलंय की काय? अरे, यांच्या फंडाला देणगी देऊन काही उपयोग आहे का? ज्यासाठी

लोक देणग्या देणार, त्या धर्माची यांना चाड नाही – अभिमान नाही ! मग स्मारकाचे पैसे फुकटच पाण्यात जायचे ना ? त्यापेक्षा भिकाऱ्यांना वाटलेले बरे ! मी सांगून ठेवतो – एक छदाम देणार नाही त्यांच्या फंडाला – माझे पैसे एवढे वर आले नाहीत !" बाबासाहेब अजून बेभानच होते.

राजाभाऊनं पाहुण्यांना खूण केली अन् तो बाबासाहेबांना म्हणाला– "बाबासाहेब, तुम्ही जरा स्वस्थ पडून राहा बरं. या सगळ्याचा त्रास होईल तुम्हांला ! चोरीचं एवढं लावून घेऊ नका मनाला."

"चोरीचं ? अरे, चोरीचं काय एवढं ! चोरांनी चाळीस हजार नेले, पण त्यांनी मला तर नेलं नाही ना ? मला चाळीस हजारांची पर्वा नाही – पण आमच्या देवाधर्माची विटंबना मी सहन करणार नाही ! – या नालायकांना मी एक दिडकी देणार नाही, बजावून ठेवतो !"

राजाभाऊनं बाबासाहेबांना अगदी जबरदस्तीनं बिछान्यावर झोपवलं. जवळ कारकुनाला बसवलं अन् तो पाहुण्यांच्या कानात कुजबुजला– "माफ करा हं, तुम्हांला फारच मानसिक त्रास झाला. पण – मला वाटतं, त्यांना या चोरीचा फारच धक्का बसला आहे."

"नाही, नाही !" कारकुनाचे हात हिसडून टाकीत बाबासाहेब उठले, "मला चोरीचं काही वाटत नाही. माझ्या मनगटात अजून जोर आहे. पण तुम्ही सारे भ्याड – नादान लोक आहात. ढोंगी – पापी – तुमच्या फंडाला मी एक कवडीसुद्धा देणार नाही – मुळीच देणार नाही !"

–बाबासाहेबांना द्रव्यशोक झालाय – म्हातारपणी त्यांना हा धक्का सहन झाला नाही – त्यांच्या डोक्यावर परिणाम झालाय – असं वाटून राजाभाऊ हळहळत होता आणि आपल्या पोटच्या पोराला – एकुलत्या एक लेकालासुद्धा– आपली नेमकी व्यथा समजली नाही म्हणून बाबासाहेब जास्तच तडफडत होते.

●

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.




# अनवट राग !

अंतरीच्या वादळाला
कधी कधी येते जाग
गात्रागात्रांत फुलून उठतो
धुंदावलेला अनवट राग !

तडा जातो चाकोरीला
विलग होतात क्षितिजरेषा
जाणिवेच्या उजाड कक्षेत
विरून जातात दाही दिशा !

डोळयांपुढची वाट नेते
स्वप्नामधल्या गोपुराला
बाधा होते भरतीची
वीजवेडया पापणीला !

सारा भवताल मिटून जातो
घोट घेता असीमतेचा
कोसळताना हसत असतो
सात्त्व तट संकेताचा !

हसता हसता स्वरांना त्या
मधेच येतो अश्रुपूर
स्वप्नामधले गोपूर जाते
वहात वहात दूरच दूर !

रित्या डोळयांत निजून जाते
वादळाची मंथर जाग
चाकोरीला शरण जातो
थिजलेला तो अनवट राग !

—वन्दना विटणकर



# श्रद्धांजली

डॉ. कार्ल मार्क्सच्या 'दस् कापिताल' नामक जगज्जेत्या ग्रंथाची प्रकाशन शताब्दी या वर्षी साजरी होत आहे. तरी पण हे सांगायला हवे की, या ग्रंथाचा पहिला भागच फक्त मार्क्सच्या हातून मुद्रणप्रत तयार होऊन १६-८-१८६७ रोजी प्रकाशित झाला. या महान ग्रंथाचे पुढील तीन भाग संपादित करून, १८८५ साली दुसरा, १८९३ साली तिसरा आणि १९१० साली चौथा भाग प्रकाशित करण्याचे कार्य ज्या गृहस्थाने केले, त्याचे नाव फ्रेड्रिक एन्जल्स.

डॉ. मार्क्सचा हा सच्चा मित्र आणि भक्त. स्वतः अत्यंत विद्वान् माणूस होता, पण मार्क्सची अचाट बुद्धिमत्ता, सर्व विषयांत अप्रतिहत-पणे चालणारी प्रतिभा आणि अथक उद्योग पाहून, दोन विद्वान् माण-सांत सहसा प्रत्ययाला न येणारी अतूट मैत्री मार्क्स-एन्जल्समध्ये निर्माण झाली. याला कारण एन्जल्सच. जन्मभर निरपेक्ष मैत्रीची साथ त्याने मार्क्सला दिली.

स्वतःच्या मनाला पटत नसतानाही मार्क्सची आर्थिक ओढगस्त स्थिति दूर करता यावी म्हणून एन्जल्स अनेक वर्षे आपल्या वडिलांच्या मॅन्चेस्टर येथील गिरणीत नोकर म्हणून राबला. स्वतः लग्न न करता मार्क्सचा संसार त्याने सांभाळला. एन्जल्स म्हणजे साम्यवादी विचारसरणीची

व्यक्ती होती तर मार्क्स म्हणजे त्या विचारसरणीची खोली होती. या दोघांचा पत्रव्यवहार साम्यवादी चर्चांनी जसा भरून वाहतो आहे तद्वत् प्रत्येक पत्रात आपल्या हलाखीच्या स्थितीचे वर्णन करून मार्क्सने एन्जलसला त्वरित पैसे पाठविण्याबद्दल तगादाही लावलेला त्यात दिसतो. पण अशा तगाद्यांनी एन्जल्स कधी ' रागावला ' नाही. मार्क्सला चांगले इंग्रजी लिहिता येत नसे. १८५२ ते १८६१ या काळात ' न्यू-यॉर्क ट्रिब्यून ' मध्ये मार्क्सने जे लेखन केले त्याचा इंग्रजी अनुवाद आणि संपादन एन्जल्स करीत असे. तो भाषाप्रभू होता. इतकेच नव्हे तर, निरनिराळ्या वीस भाषा तो बोलू शकत असे. दोघांमध्ये पराकोटीची स्वभावभिन्नता असूनही एन्जलसने मार्क्सला जन्मभर साथ दिली. १८४८ सालच्या सुमारास प्रसिद्ध झालेला ' कम्युनिस्ट जाहीरनामा ' जरी मार्क्सने लिहिला होता तरी त्याचे अंतरंग मार्क्स–एन्जलस या जोडीचे अंतरंग होते.

असामान्य बुद्धीचा एक प्रज्ञावान् विचारवंत म्हणून मार्क्स जगाला दिसला याचे कारण फ्रेड्रिक एन्जल्ससारखा त्याचा मित्र आणि जेनी-सारखी त्याची प्रिय पत्नी. अमीर-उमरावाच्या या मुलीने भणंग फकि-राला वरले होते आणि जन्मभर सुख-दुःखाच्या हिंदोळ्यावर त्याला साथ दिली होती. पण ही जेनीही १८८१ साली दारिद्र्याखाली पिचली आणि हे जग सोडून गेली. एन्जल्सने मात्र मार्क्सला पुरी साथ दिली. या एन्जलसने हायगेट स्मशानभूमीवर मार्क्सला १८८३ साली वाहिलेली श्रद्धांजली म्हणजे मार्क्सच्या आयुष्यभराच्या कार्याचा आढावा होता.

**तो त्याच्याच शब्दांत ......**

" दिनांक १४ मार्च १८८३ या दिवशी दुपारी पावणेतीन वाजता चालू पिढी-तील सर्वांत मोठ्या विचारवंताने आपले विचारचक्र थांबविले. दोनच मिनिटे त्याच्या खोलीत कोणी नसेल पण दोन मिनिटांनीच जेव्हा आम्ही त्याच्या खोलीत प्रवेश केला तेव्हा आपल्या खुर्चीत तो शांतपणे झोपी गेलेला आढळला. नित्याकरता. पुन्हा कधीही न उठण्याकरता.

त्याच्या मरणामुळे, युरोप आणि अमेरिकेतील लढा देणाऱ्या कामगारवर्गाचे आणि इतिहासशास्त्राचे अमाप नुकसान झाले आहे. या महापुरुषाच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी लवकरच जाणवेल.

डार्विनने ज्याप्रमाणे निसर्गातील उत्क्रांतीचा सिद्धान्त शोधून काढला, त्याचप्रमाण मानवी इतिहासातील उत्क्रांतीची उपपत्ती मार्क्सने लावली. आजपर्यंत मतप्रणालींच्या अनैसर्गिकपणे वाढलेल्या जुल्माखाली दडलेल्या एका साध्या पण सत्य गोष्टीचा त्याने शोध लावला. राजकारण, विज्ञान, कला, धर्म आणि अशाच अनेक गोष्टींत रस घेण्याअगोदर मानवांना सर्वप्रथम कुठल्या गोष्टींची गरज असेल तर ती अन्न व पाणी, वस्त्रे आणि निवारा या गोष्टींची. याचा अर्थ असा की, जीवनावश्यक अशा भौतिक निर्वाह साधनांचे उत्पादन आणि त्या अनुरोधाने अस्तित्वात असलेली राष्ट्राची आर्थिक-विकासातील अवस्था अगर काल या गोष्टींच्या पायावरच देशातील लोकांच्या राष्ट्रीय संस्था, न्यायदृष्टी आणि कलेसंबंधी अगर धर्मासंबंधीच्याही कल्पना बांधलेल्या असतात. म्हणजे या पूर्वनिर्देशित गोष्टींवरूनच या उत्तरनिर्देशित गोष्टींचे स्पष्टीकरण करायला हवे. पण साधारणतः या दुसऱ्या गोष्टीतूनच पहिल्या गोष्टी निर्माण होतात, असे स्पष्टीकरण केले जात असे.

मार्क्स एवढेच सांगून थांबला नाही. त्याने गतीचा एक विशेष सिद्धांत शोधून काढला. समकालीन भांडवलशाही उत्पादनव्यवस्थेला आणि तिने जन्माला घातलेल्या धनिकांच्या वर्गाला तो चपखलपणे लागू पडणारा होता. साम्यवादाचे टीकाकार धनिकवर्गीय अर्थशास्त्रज्ञही जिथे अंधारात चाचपडत होते, तिथे मूल्याधिक्य सिद्धान्ताने प्रकाशझोत टाकला.

अशा दोनच शोधांकरता माणसाला आयुष्य अपुरे पडावे, असा एखादाच विशेष शोध लावणाऱ्यानेही स्वतःला भाग्यवंता समजावे. पण ज्या ज्या क्षेत्रांचा त्याने अभ्यास केला, (अशी क्षेत्रे अनेक होती आणि प्रत्येक क्षेत्रातील त्याचा अभ्यास सखोल होता) त्या त्या क्षेत्रांत मार्क्सने स्वतंत्र शोध लावले. अगदी गणितशास्त्रातही.

मी विज्ञानप्रेमी माणसाचे चित्र चितारले. पण विज्ञानप्रेम हा या माणसाचा अर्धा भाग होता. मार्क्सच्या दृष्टीने विज्ञान ही इतिहासाला चालना देणारी शक्ती होती; क्रांतिकारी शक्ती होती. ज्याचा व्यावहारिक उपयोग नाही, किंवा जे व्यवहारात उतरविणे कधीच शक्य नाही. ' असे शुद्ध औपपत्तिक शोध लावण्यात त्याला विशुद्ध आनंद वाटत असे. तरीपण, ज्या शोधांचा उद्योगजगतात क्रांतिकारी परिणाम लगेच संभवत असे अगर ज्यांचा सर्वसाधारणपणे ऐतिहासिक उत्क्रांतीवर विशेष परिणाम जाणवत असे, असे शोध लावताना एक निराळ्याच प्रकारचा आनंद त्याला गवसत असे. उदाहरणार्थ, विजेच्या शोधाकडे त्याने बारीक लक्ष दिले होते, किंवा अलीकडे मार्सेल डेपरेझच्या (Marcel Deprez) शोधांकडे त्याचे लक्ष लागून राहिले होते.

कारण, मार्क्स हा सर्वप्रथम क्रांतिकारक होता. भांडवलशाही समाजरचना आणि त्या समाजरचनेने जन्माला घातलेल्या राष्ट्रीय संस्था यांचा निःपात करण्याच्या कामी या नाही तर त्या मार्गाने सहभागी होणे; आधुनिक कामगार वर्गाच्या मुक्ती-

प्रीत्यर्थ आवश्यक असलेल्या परिस्थितीचे सम्यक् ज्ञान करून घेऊन, त्यांना त्यांच्या गरजांची जाणीव करून देऊन, चेतवून, त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणे, हे त्याच्या आयुष्याचे ध्येय होते. लढा हे तर त्याच्या स्वभावाचे व्यवच्छेदक लक्षण होते. अशा जिद्दीने, अशा चिकाटीने आणि इतक्या यशस्वीपणे लढा देणे आतापर्यंत फार थोड्या माणसांनाच जमले आहे. १८४२ सालातील 'हायनिश् त्सायटुंग'-मधील त्याचे लेखन, १८४४ सालातील पॅरिसच्या 'व्होरव्हार्टस्' Vorwärts-मधील लेख, १८४७ साली केलेले Deutsche Brüsseler Zeitung मधील लिखाण, १८४८ आणि ४९ साली केलेले 'नेवे हायनिश् त्सायटुंग' (Neve Reinische Zeitung) मधील त्याचे लेख, १८५२ ते १८६१ या वर्षांत केलेले 'न्युयॉर्क ट्रिब्यून' मधील त्याचे लेखन, अनेक पत्रके तयार करण्याचे केलेले काम, पॅरिस, ब्रुसेल्स् आणि लंडनमध्ये केलेल्या विविध चळवळी आणि शेवटी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची त्याने केलेली स्थापना म्हणजे त्याच्या अथक परिश्रमांचे सारच आहे. त्याने केलेल्या कार्याचा हा आढावाच आहे. दुसरे काहीही न करता, मार्क्सने केवळ आंतरराष्ट्रीय कामगार संघटनाच फक्त स्थापिली असती, तरीही हे एवढे मोठे कार्य होते की त्याचा सार्थ गर्व त्याला वाहता आला असता.

मार्क्स कार्यकर्ता–क्रांतिकारक–असल्यामुळे आयुष्यभर जास्तीत जास्त मत्सर आणि निंदानालस्तीचा तो धनी झाला. प्रजातंत्री आणि अनियंत्री अशा सर्व प्रकारच्या सरकारांनी त्याला आपल्या सीमांचा रस्ता दाखविला. त्याची निंदानालस्ती करण्यात आणि त्याच्याविषयी कंड्या पिकविण्यात धनिक वर्ग, अत्याधुनिक लोकशाहीवाले आणि सनातनी मंडळी यांनी एकमेकांत चढाओढच लावली होती. पण कोळ्याच्या जाळ्यांनी माजलेली जळमटे दूर करावीत त्याप्रमाणे या गोष्टी दूर फेकून त्याने या मंडळींकडे दुर्लक्ष केले. अगदी जरूरच पडली तर त्यांना उत्तरे देण्याचे श्रम त्याने घेतले. आणि तरीही युरोपमधील, आशिया खंडातील पार पूर्वेच्या सैबेरियातील खाणींच्या प्रदेशातील, आणि अमेरिकेतील पश्चिमेच्या कॅलिफोर्नियापर्यंत पसरलेल्या प्रदेशातील नव्हे सर्व जगभर पसरलेल्या लाखो क्रांतिकारी कार्यकर्त्यांनी मरेपर्यंत त्याचा मान राखला. त्याला प्रेम दिले आणि आज त्याच्या निधनाने ते सारे शोकविव्हल झाले आहेत. मी ठासून म्हणेन की, अजूनही त्याला अनेक विरोधक असले, तरी त्याला व्यक्तिगत असा एकही शत्रू असणार नाही.

त्याचे नाव आणि त्याचे कार्य शतकानुशतके जिवंत राहील.

[हायगेट स्मशानभूमी–१७ मार्च १८८३]

[ऑटो रूर यांच्या 'कार्ल मार्क्स: जीवन आणि कार्य' या मूळ जर्मन भाषेत लिहिलेल्या ग्रंथाच्या ईडन आणि सेडर पॉल यांनी केलेल्या इंग्रजी अनुवादाच्या आधारे.]

O

कार्ल मार्क्सचा 'दास कॅपिटल'
विष्णुबुवांचा 'सुखदायक
राज्यप्रकरणी निबंध'
हे दोन्ही ग्रंथ, शंभर वर्षांपूर्वी
एकाच वर्षी प्रसिद्ध व्हावेत
हा इतिहासातील एक विलक्षण
योगायोगच म्हटला पाहिजे.

# महाराष्ट्रातील स्वप्नरम्य समाजवादाचा आद्य द्रष्टा

"खासगी संपत्ती ही जगातील सर्व दुःखांचे मूळ आहे, सर्व गुन्ह्यांचे उत्पत्तिस्थान आहे. सर्व प्रजा हे एक कुटुंब मानून देशातील सर्व जमीन व संपत्ती यांवर सामायिक मालकी स्थापन करणे हाच यावर एकमेव तोडगा आहे. प्रजेने व राज्यकर्त्यांनी सारखेच कष्ट करून एकसारखे खाणे खावे व तेही एकाच कोठारातून नेऊन खावे. या तत्त्वावर उभारलेली समाजरचना अस्तित्वात आल्यास चोरी, मारामारी, तर्कट व खून इत्यादी गुन्हे समाजातून नाहीसे होतील व न्यायालयांची गरज राहणार नाही; राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष इतिहासजमा होतील व भूतलावर शांतता व समाधान यांचे राज्य अवतरेल," अशा आशयाची स्वप्नरम्य भविष्यवाणी आजपासून बरोबर



# विष्णुबुवा ब्रह्मचारी

शंभर वर्षांपूर्वी म्हणजे इ. स. १८६७ साली मुंबई शहरात एका संन्याशाने केली.

'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' या मथळ्याखाली मुंबई येथील 'इंदु प्रकाश' छापखान्यातून बाहेर पडलेल्या एका अकरा कलमी जाहीरनाम्यात ही स्वप्नरम्य भविष्यवाणी मुद्रांकित झाली व या लिखिताचे कर्तृत्व विष्णुबुवा ब्रह्मचारी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका संन्याशाकडे होते.

'प्रत्येक व्यक्तीकडून त्याच्या क्षमतेनुसार काम करून घेऊन त्याच्या सर्व आवश्यकतांची पूर्ती होईल एवढे त्यास देण्यात यावे,' या कार्ल मार्क्सप्रणीत आदर्शाचीच स्वच्छ प्रतिमा विष्णुबुवांच्या 'सुखदायक राज्यप्रकरणी' या निबंधात बघावयास मिळते. कार्ल मार्क्सचा त्रिखंडात गाजलेला ग्रंथ 'Das Capital' आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' हे दोन्ही ग्रंथ एकाच वर्षी म्हणजे इ. स. १८६७ सालीच अनुक्रमे फ्रँकफुर्ट आणि मुंबई या शहरांत प्रसिद्ध

— — — — —

लेखक : प्रा. पंढरीनाथ रानडे

— — —

व्हावेत, हा इतिहासातील एक विलक्षण योगायोग आहे !

कार्ल मार्क्स आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी, 'कॅपिटल' आणि 'सुखदायक राज्य-प्रकरणी निबंध, या उभयतांची तुलना करणे हे नगाधिराज हिमालय आणि पर्वतीची टेकडी यांची तुलनात्मक उंची मोजण्याचा प्रकार होईल. हे खरे असले तरी उत्पादनाच्या साधनांवर सामाजिक स्वामित्व निर्माण केल्याने, "दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो । जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणीजात ।।" अशी सृष्टी आकाराला येईल. या ध्येयवादाचा दोघांनीही सारख्याच प्रकर्षाने ठाव घेतला होता हे कुणालाही मान्य करावे लागेल. मानव्यासंबंधी प्रगाढ अनुकंपा आणि उद्या होऊ घातलेल्या साम्ययुगाचे स्वप्नरम्य दृश्य बघण्याची हाक आपल्या समकालीनांना देण्याचा अट्टाहास या दोन्ही बाबतींत कार्ल मार्क्स आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी या दोघांचीही कुळी एकच होती हे निस्संशय !

जागतिक तत्त्वज्ञानाच्या मंथनातून गत्यात्मक भौतिकवादाचे नवनीत निर्माण करण्याचे व विश्वइतिहासाला गवसणी घालून विश्व-परिवर्तनासाठी जगड्व्याळ चळवळ उभारण्याचे कार्ल मार्क्सचे बौद्धिक सामर्थ्य विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्याजवळ शतांशानेही नसले तरी एकोणविसाव्या शतकाच्या मध्यावर महाराष्ट्राच्या गतानुगतिक वैचारिक जीवनाला धक्का देणारे बंडखोरीचे विचार 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंधा'च्या रूपाने उद्‌भवले एवढे श्रेय मात्र विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्या झोळीत कुणालाही टाकावे लागेल.

कार्ल मार्क्सच्या मागे प्लेटो, हिराक्लटस, डेमाक्रटस या प्राचीन व रॉबर्ट ओवेन, सेंट सायमन, अॅडम स्मिथ, रिकार्डो, कांट, हेगेल, फेवरबाक या अर्वाचीन विचारवंतांची परंपरा होती. तसल्या कुठल्याही वैचारिक परंपरांचा वारसा विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांना लाभला नव्हता. इंग्रजी विद्येचा गंध नाही, धड संस्कृतही येत नाही, पण मराठी प्राकृत ग्रंथांचे मात्र अफाट वाचन व पारायण ही विष्णुबुवांची बौद्धिक शिदोरी होती.

ज्या काळात भारतीय मनामध्ये मालकी हक्कासंबंधी फारसा संशय उत्पन्न झाला नव्हता, समाजाच्या आर्थिक रचनेसंबंधी बहुतेक विचारवंत उदास होते, श्रम आणि भांडवल यांचा संघर्ष भारतात कुठे सुरू झाला होता–नव्हता, अशा पार्श्वभूमीत विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांनी १८६७ साली मालकी हक्कावर आधारलेल्या समाजरचनेचा धिक्कार करावा ही एक लोकविलक्षण गोष्ट घडली हे खरे !

## अव्वल इंग्रजीतील धामधूम

अंगावर भगवी वस्त्रे, हातात दंड व तुंबा, काखोटीला एखाद-दुसरा ग्रंथ, बांधा उंच व धडधाकट, प्रकृती निकोप आणि अंगकांती गोरी या अवतारात वावरणाऱ्या विष्णुबुवा ब्रह्मचारी या संन्याशाने सन १८५६ ते १८७१ या पंधरा वर्षांत मुंबई शहरातील सार्वजनिक जीवनावर विलक्षण मोहिनी घातली होती.

१८५६ साली विष्णुबुवा ब्रह्मचारी मुंबईत येऊन दाखल झाले. वैदिक धर्माचा प्रचार करण्यासाठी आपणांस साक्षात भगवंताने प्रेरित केले असून ख्रिस्ती धर्माचे खंडन करण्यासाठी आपण या शहरात दाखल झालो असल्याची त्यांनी घोषणा केली.

उत्तर हिंदुस्थानात ज्या वेळी शिपायांच्या बंडाच्या धामधुमीचा रंग भरला जाऊ बघत होता त्या वेळी, खुद्द मुंबई शहरात ठाकुरद्वारच्या समुद्रकिनाऱ्यावर, १८५७ साली १५ जानेवारीपासून जूनच्या मध्यापर्यंत विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांशी जाहीर वादविवाद करून वैदिक संस्कृतीच्या श्रेष्ठतेची ग्वाही फिरवली. ख्रिश्चन मिशनरी आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्यामधील वादविवाद ऐकण्यासाठी ठाकुरद्वारच्या समुद्रकिनारी सहस्रावधी मुंबईकरांची गर्दी लोटत असे.

शिपायांच्या बंडाच्या ऐन धामधुमीत विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांनी मुंबई शहरात चालविलेला प्रक्षोभक विचारयज्ञ अखेर इंग्रज सत्ताधिकाऱ्यांच्या सूचनेवरून आवरता घेतला गेला. पण या समुद्रकिनाऱ्यावरील वादविवादाने विष्णुबुवांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप मुंबई नगरवासीयांवर कायमची पडली.

विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे मूळनाव विष्णू भिकाजी गोखले.

कुलाबा जिल्ह्यात माणगाव तालुक्यात निजामपूर पेट्यात शिरवली नावाच्या गावी शके १७४७ (इ. स. १८२५) श्रावण शुद्ध पंचमीस विष्णू भिकाजी गोखले यांचा जन्म झाला. विष्णुबुवा आपल्या वडिलांचे दहावे अपत्य. जन्मानंतर पाचच वर्षांनी वडिलांचे छत्र त्यांच्या डोक्यावरून नाहीसे झाले. शेती, बागाइत, गुरे चारणे, लाकडे फोडणे या कामांमध्ये विष्णूला लवकरच तरबेज व्हावे लागले. वयाच्या नवव्या वर्षापासून त्याला असली कष्टाची कामे उपसण्याची सवय लागली. पुढे बाराव्या वर्षी महाड या गावी किराणा दुकानात तो पुडे बांधू लागला. दोन वर्षांत महाडला रामराम ठोकून विष्णू रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर बंदरावर कस्टम खात्यात उमेदवारी करू लागला. चार वर्षे उमेदवारी केल्यानंतर साष्टी तालुक्यात कस्टम खात्यात त्याला स्थैर्य प्राप्त झाले. वसई, कल्याण, भिवंडी, उरण इत्यादी ठिकाणी कस्टम खात्यात विष्णू काम करीत होता. ऐन तारुण्यातील सात वर्षे त्याने कस्टम नाक्यावर घालवली.

स्वराज्य जाऊन आता ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य महाराष्ट्रात नुकतेच सुरू झाले होते. हे युग संक्रमणाचे युग होते. सातासमुद्रापलीकडून आलेल्या मूठभर व्यापारी मंडळीने मोगल आणि मराठे यांच्यासारख्या प्रबल व जुन्या राज्यसत्ता उलथवून टाकून इंग्रजी राजवट भारतासारख्या खंडप्राय देशात कायम करण्याची अद्भुत किमया नुकतीच घडवली होती. जुने राज्य गेले. प्रतिष्ठा गेली, जुन्या वतनांची आणि इनामांची शाश्वती नाहीशी झाली; आकाशातून पडलो आणि धरणीने सावरले अशी या काळातील लोकांच्या मनाची स्थिती होती असे समकालीन लेखांतून दिसते.

जुने जीवन लयाला जात असल्याचे बघून एकीकडे मराठी मन उद्विग्न होत होते तर दुसरीकडे त्याच क्षणी एक दुसरीही भावोर्मी मराठी मनात उसळत होती. पूर्वी कधी बघितले नव्हते असे महाप्रतापी विज्ञानाचे चमत्कार आता मराठी माणसाला बघावयास मिळू लागले. राज्यकारभाराचे नवीन नियम, कवायती फौजेची शिस्त, टांकसाळ, गोदी, वाफेची जहाजे, घड्याळे इत्यादी नाना तऱ्हेचे जिन्नस, ज पूर्वी कधी ऐकलेही नव्हते ते आता नेहमी नजरेखालून जाऊ लागले. छापखान्यांतून बाहेर पडणारी वर्तमानपत्रे वाचावयास मिळू लागली. मुंबई, पुणे, सोलापूर या शहरांना जोडणाऱ्या रस्त्यांना प्रशस्त कळा आली. मुंबई बेटातील बंदरात 'प्रचंड तारवांनी समुद्र आच्छादित होऊ लागला.' जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा निघू लागल्या.

बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, जगन्नाथ शंकरशेठ, गोपाळ हरी देशमुख, दादोबा पांडुरंग, बापू छत्रे, हरी केशव पाठारे, गोविंद नारायण माडगावकर ही अव्वल इंग्रजी अंमलातील कर्तबगार मराठी माणसांची पिढी महाराष्ट्रात पुढे येत होती. इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनात एक नवीन सृष्टी अवतरली होती. स्वराज्य गमावले म्हणून एकीकडे हळहळ तर दुसरीकडे नव्या युगातील विस्मयकारक प्रगतीबद्दल कुतूहलमिश्रित आदर या संमिश्र भावनांचा कल्लोळ मराठी मनात या काळात माजला होता.

विष्णू भिकाजी गोखले नावाच्या कोकणातील एका संवेदनशील तरुणाने ह्या पार्श्वभूमीत सामाजिक जागृतीची पहिली लाट आपल्या अंगावरून घेतली.

## ब्रम्हजिज्ञासेचा वेध

पुण्या–मुंबईपासून बाजूला पडलेल्या सह्याद्रीच्या कुशीतील शिरवलीसारख्या गावी इंग्रजी शिक्षणाची संधी विष्णुबुवांना लहानपणी मिळणे अशक्यच होते. घरच्या गरिबीमुळे मराठी किंवा संस्कृत शिक्षणाचीही आबाळच झालेली. त्यांत वयाच्या नवव्या वर्षापासून कष्टार्जित जीवन जगण्याची त्यांच्यावर पाळी आलेली. कस्टम खात्यातील नोकरीच्या निमित्ताने मुंबई बेटातील विविध बंदरांतून त्यांना वावरावे लागले. कथा, कीर्तने, पुराणे ऐकण्याचा त्यांना लहानपणापासूनच नाद होता. त्यातूनच विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, दासबोध आदी ग्रंथ वाचण्याचा त्यांना छंद लागला. ज्या वयात सर्वसाधारण मुले हुडेलहप्पी आणि हौसमौज ह्यात वेळ घालवतात त्या वयात विष्णुबुवा ब्रह्मजिज्ञासेच्या मागे लागले होते.

वयाच्या तेविसाव्या वर्षी विष्णुबुवांनी कस्टम खात्यातील नोकरी सोडून देऊन आध्यात्मिक प्रवासाला सुरुवात केली. अनेक संत–महंत आणि साधुपुरुष ह्यांचे मठ त्यांनी धुंडाळले. पण या संत–महंतांचे जीवन जवळून बघितल्यावर त्यांना उबग आला. संत–महंतांचा कोणताच मुक्काम त्यांच्या मनात भरला नाही; कुणाचाही

गंडा बांधण्यास त्यांचे मन आतुरले नाही; अखेर ते सप्तश्रृंगीच्या डोंगरात तपश्चर्या करावयास निघून गेले. विष्णुबुवांनी स्वहस्ते लिहिलेल्या हकीकतीनुसार त्यांना तिथेच अरण्यात साक्षात्कार झाला. 'वेदोक्त धर्म प्रकाश 'त ते लिहितात, "हे ईश्वरा, बापा, तू दत्तात्रेय अवतार रूपाने दर्शन देऊन बोललास की तू जगात तारक उपदेश कर. पण त्या वेळी मी बोललो की, मला संस्कृत भाषा येत नाही. मग तू हास्यवदन करून बोललास की जा विष्णू, तू सहज भाषण बोलशील, तोच वेदधर्माचा परम सिद्धांत होईल."

सप्तशृंगी येथे साक्षात्कार झाल्यावर विष्णुबुवा पंढरपूरला गेले. १८५३ ते ५६ अशी तीन वर्षे विष्णुबुवांनी पंढरपुरात घालवली. तेथेच त्यांनी एकनाथांच्या भावार्थरामायणाचे तीन वेळा पारायण केले. पंढरपूर मुक्कामीच लोक त्यांना 'ब्रह्मचारी बावा' म्हणू लागले. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास आदींच्या वाङ्मयाच्या वाचनाने व मननाने विष्णुबुवांना अमोघ वक्तृत्व प्राप्त झाले. पंढरपूर येथे असतानाच त्यांनी 'भावार्थ सिंधू' या नावाचा पंचप्रकरणार्थ ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. मराठी संतवाङ्मयाचा अभ्यास व अंत:स्फूर्ती या बळावर त्यांनी हिंदुधर्माची फेरतपासणी करून 'वेदोक्त धर्मा 'चे तत्त्व शोधून काढले. वेदकाळातील भारतीयांच्या धर्माचे स्वरूप हे स्मृती आणि पुराणे यांतील हिंदुधर्मापेक्षा वेगळे होते, ही गोष्ट विष्णुबुवांना प्रकर्षाने जाणवली. वेदोक्त धर्म हा गतिमान, विज्ञाननिष्ठ व मानवतावादी धर्म आहे अशी बैठक विष्णुबुवांच्या विचारांनी धारण केली.

'भावार्थ सिंधू' या ग्रंथात विष्णुबुवांनी प्रथम आपल्या विचारांचा चौथरा समाजासमोर मांडला. ज्ञान हे विश्वात्मक आहे, अक्षांश रेखांशांनी किंवा जातीय धार्मिक कुंपणांनी ज्ञानाला बद्ध करता येत नाही आणि करू नये व वेदांमधील खऱ्या ज्ञानाचे अधिकारी म्लेच्छांसकट सर्व मनुष्यमात्र आहेत, अशी धारणा त्यांनी 'भावार्थ सिंधू' या ग्रंथात मांडली.

> **पृथ्वीवरील मनुष्यमात्र । म्लेंच्छादिक सकल जात**
> **उपदेशास अधिकारी निश्चित । हीच माझी आज्ञा असे ।।**
> **मनुष्यजाती असे एक । हेच ज्ञान सम्यक**
> **ऐसा जाणोनी विवेक । भुवते उपदेश करावा ।।**
> **सकल द्वीपे सकलखंडे । मुकते फिरावो उदंडें**
> **मोडूनि मतवादांची बंडे । उपदेश ज्ञानाचा करावा ।।**
> **या भावार्थ सिंधूचे बोलणे । सकल जनांच्या हिताकारणे**
> **तरी याचे पुस्तक बाळगणे । स्त्रिया पुरुषांनी वाचावया ।।**
> **याचे भाषांतर करावे । द्वीपद्वीपांतरी न्यावे**
> **स्त्रिया पुरुषांनी पाहावे । संसारी वर्तता सर्वदा ।।**

महाराष्ट्रातील संतांनी ज्या मानवतावादाचा पुरस्कार केला त्याचाच उद्घोष

विष्णुबुवांनी ' भावार्थ सिंधू 'मध्ये केला. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी आदी महाराष्ट्रातील विचारवंतांनी ज्या पुरोगामी सामाजिक मूल्यांचे प्रतिपादन केले तीच प्रागतिक मूल्ये विष्णुबुवांनी स्वीकारली होती.

**परंतु आपल्या तत्वज्ञानाचे मूळ वेदांत आहे असा विष्णुबुवांचा आग्रह होता.**

' भावार्थ सिंधू 'च्या लेखनपूर्तीनंतर विष्णुबुवांनी सांगली, मिरज, वाई, सातारा, पुणे, अहमदनगर या शहरी जाऊन आपल्या प्रासादिक वाणीने व वक्तृत्वाने अनेक सभा गाजवल्या.

इ. स. १८५७ साली ब्रह्मचारीबाबांनी द्वारकेच्या यात्रेला जावयासाठी म्हणून मुंबई शहरी प्रस्थान ठेवले. विष्णुबुवांच्या कर्तृत्वाची ख्याती एव्हाना मुंबई शहरात येऊन पोहोचली होती. २० सप्टेंबरपासून दर शनिवारी प्रभू लोकांच्या शाळेतील पटांगणात विष्णुबुवांची भाषणे होऊ लागली.

या काळात ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या चळवळीमुळे हिंदुधर्मावर मोठेच संकट उद्‌भवले होते. हिंदू समाजातील महार, मांग, चांभार आदी जमातींमध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मांतराचे यशस्वी प्रयोग केले होते. हर्णै, दापोली, बाणकोट, जुन्नर, पुणे, शिरूर या ठिकाणी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मिशन केंद्रे उघडून ख्रिस्ती धर्मप्रचाराचे कार्य जोरात चालविले होते. खुद्द मुंबई शहरही ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हालचालींपासून मोकळे नव्हते. केवळ पीडित समाजापुरतेच ख्रिस्ती धर्माचे आकर्षण मर्यादित राहिले नाही. करमरकर, मोडक, पदमनजी, शेषाद्री आदी उच्चभ्रू समाजातील मंडळींनीही ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता.

ख्रिश्चन धर्मप्रचाराची वाढती लाट परतवून लावण्याचे कार्य हे वैदिक धर्माच्या प्रचाराचे एक महत्त्वाचे कलम ठरावे हे ओघानेच आले. विष्णुबुवांनी मुंबई शहरात ख्रिस्ती धर्मप्रचारकांवर तोफा डागल्या.

मुंबई येथील मुक्कामात श्री. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी आपल्या वक्तृत्वाने व विक्षिप्त वागणुकीने जी धमाल उडवून दिली त्याचे मोठे मार्मिक व वेधक वर्णन श्री. गोविंद नारायण माडगावकर ह्यांनी ' मुंबई वर्णन ' या ग्रंथात केले आहे. या वर्णनात विष्णुबुवांच्या कार्याचे मूल्यमापन त्यांच्याच एका समकालीनाने केले असल्यामुळे ते जसेच्या तसे उद्‌धृत करणे योग्य ठरेल.

"सन १८५६ त विष्णू भिकाजी गोखले या नावाचा कोकणस्थ ब्राह्मण या शहरात आला होता. हा भगवी वस्त्रे परिधान करून कौपीन लावी व हातांत तुंबा घेऊन पादुका घाली. हा आपणास ' ब्रह्मचारी ' असे म्हणवीत असे; परंतु वास्तविक ब्रह्मचाऱ्याचे जे धर्म, ते तो पाळीत नसे. प्रथम ह्यास सोवळ्या-ओवळ्याचा काही प्रतिबंध नसे. सर्वकाळ तांबूल भक्षण करी व मनास येईल तेव्हा शुभ्र वस्त्रेही नेसून पायात जोडा घाली. हा स्पष्टवक्ता असून समयसूचक असे.

महाराष्ट्र भाषेत याला वादविवाद चांगले करता येत. एखाद्या प्रश्नाचे उत्तर समर्पक नसले तरी समयास सुचेल ते देऊन आपली बाजू राखी. अडून राहत नसे. यास वेदांताविषयी व दुसऱ्या गोष्टीत बरीच माहिती होती; परंतु संस्कृतात गम्य नव्हते. त्याच्या बोलकेपणावरूनच लोक त्यास लुब्ध होते. तो वेदांतमती होता खरा, परंतु जसा मनुष्याचा कल असेल त्या मताकडे तो फिरे. कधी कधी मूर्तिपूजेचा अव्हेर करी व कधी कधी तिची आवश्यकताही प्रतिपादी. ह्याचा सर्व हेतू बहुतकरून ख्रिस्ती मतखंडन करण्याकडे असे. याविषयी सरासरी एक वर्षभर एकसारखी वर्तमानपत्रात चर्चा चालली होती. एका वेळी मुंबईतील शास्त्र्यांची व याची सभा ठाकुरद्वारात भरली होती. तीमध्ये पुनर्विवाहप्रकरणी काही वादविवाद होऊन शास्त्र्यांचा आणि याचा तंटा झाला. याचे मत ब्राह्मण इत्यादी जातींतील विधवांचा पुनर्विवाह करावा असे होते. आणि शास्त्रीमजकूर त्याविरुद्ध होते.

हा विद्वान नव्हता परंतु स्वभावतः बुद्धिमान असून भित्रा नसे. कोणी देवी प्रसन्न होऊन आपणांवर तिने वरदहस्त ठेवून अनुग्रह केला तेणेकरून ज्ञानप्राप्ती झाली असे तो सांगे !

हा जेव्हा प्रथमच आला तेव्हा मयत धाकजी दादाजींच्या वाड्यात दोन-चार सभा भरल्या. ह्या सभांत तो हिंदुधर्माचे प्रतिपादन करी. ह्या सभेत सर्व जातींच्या लोकांस येण्यास मोकळीक होती. मिशनरी ख्रिस्ती व सर्व जातींचे लोक येऊन यास प्रश्न करीत व त्या सर्वांस तो कोणत्यातरी प्रकारचे उत्तर देऊन मोकळा होई. मग हळू हळू पाच-सहा ठिकाणी सभा होऊ लागल्या. ह्या सभांत एखादे समयी चार-पाचशेपर्यंत लोक जमत. समयविशेषी हजार बाराशेदेखील जमत. ह्या सभा कोठे कोठे रात्रीच्या अकरा तासपर्यंत चालत. मग त्या काही दिवस ठाकुरद्वारासमोर समुद्रकाठी होऊ लागल्या. त्या वेळी तर कधी कधी दोन हजारपर्यंत लोक जमत. या ठिकाणी फक्त पाद्री लोकांचे आणि याचे धर्मप्रकरणी वादविवाद होत. दर सभेत एक-दोन पाद्री व चार-पाच एतद्देशीय ख्रिस्ती जमत. ह्या सभांचे माहात्म्य आठ-दहा महिन्यांपर्यंत चालले होते."

## समुद्रकिनारीचा वादविवाद

इ. स. १८५७ च्या १५ जानेवारीला विष्णुबुवांनी ठाकुरद्वारच्या समुद्रकिनाऱ्यावर ख्रिश्चन मिशनऱ्यांशी जाहीर वादविवाद करायला सुरुवात केली. हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती वगैरे सर्व संप्रदायांचे लोक हा जाहीर वादविवाद ऐकायला येत असत. विष्णुबुवा आणि ख्रिस्ती मिशनरी यांच्यांतील झालेल्या वादविवादाची हकीकत एक ख्रिश्चन मिशनरी श्री. जी. बोएन यांनी 'समुद्रकिनारीचा वादविवाद' या पुस्तकात दिलेली आहे. ख्रिश्चन मिशनऱ्याने लिहिलेली हकीकत एकांगी व पक्षपाती असणे स्वाभाविक आहे. पण एवढे असूनही त्यात विष्णुबुवा ब्रह्मचारींचे व्यक्तित्व, त्यांचे वादकौशल्य प्रकटल्याखेरीज राहत नाही. श्री.

बोएन आपल्या पुस्तकात लिहितात—

" विष्णु भिकाजी गोखले या नावाचे ब्राह्मण ब्रह्मचारी बावा १८५७ या वर्षी मुंबईस येऊन दाखल झाले आणि आपण हिंदू धर्माचे मोठे रक्षक व ख्रिस्ती धर्माचे खंडण करणारे आहोत असा बराच लौकिक मिळविला. त्यांच्या सभेस लोकांचा मोठा मेळा मिळत असे आणि त्यांच्या भाषणाच्या सरळपणाविषयी व तर्कबुद्धी-विषयी मोठी प्रशंसा करीत असत. हिंदू धर्म व ख्रिस्ती धर्म यांच्यामध्ये कोणता परस्पर दोष आहे याविषयी प्रसिद्धपणे त्यांच्याशी वादविवाद करण्यास सर्व जगास व विशेषेकरून पाद्री लोकांस आमंत्रण केले. १८५६ या वर्षी सप्टेंबर महिन्यात प्रभू लोकांच्या विद्यालयात मी त्यांशी वादविवाद करण्यास पुष्कळ वेळा गेलो. १८५७ या वर्षी मुंबई बेटाच्या पश्चिमेस समुद्रकिनारी बावाने सभा चालू केल्या. ज्यानुआरीच्या १५ व्या तारखेपासून पाऊसकाळ लागेपर्यंत मी त्या सर्व सभांस गेलो.

तारीख १५ जानेवारी सन १८५७ या तारखेस सायंकाळी पाच वाजता समुद्राचे काठी मी व दुसरे मिशनरी लोक ब्रह्मचारी बावांशी वादविवाद करण्यास गेलो. त्या ठिकाणी लोकांचा मोठा समुदाय मिळाला होता. त्याचा व आमचा बराच वादविवाद झाला. बावांची स्वारी संकेताप्रमाणे आली. लोकांनी त्यास खुरची बसायास दिली. मिशनरी लोकांसाठीही खुरच्या ठेविल्या होत्या. बावांचे संग्रहास मराठी भाषेत जुना व नवा करार यांची पुस्तके होती. ती त्यांनी बरीच वाचून ठेवली होती असे दिसले. हिंदू धर्माचा पूर्वपक्ष एकीकडे ठेवून त्यांनी या प्रसंगी ख्रिस्ती धर्माचा मोड करण्यास कंबर बांधिली. परंतु जसे ते हिंदु धर्माचे रक्षण करण्यास कुशल होते तसे ख्रिस्ती धर्माचे मोड करण्यास अगदी शक्तिमान नव्हते. असे तेव्हाच दिसून आले. युरोपियन नास्तिक लोकांनी ज्या शंका ख्रिस्ती धर्माविरुद्ध काढल्या आहेत त्यांची जसी बावांना माहिती होती तसी त्या सभेतील लोकांसही होती व निसंशय वाटले असेल. परंतु हिंदु धर्माचा पक्ष धरून वादविवाद करण्यास जसे बावा मोठ चतुर व दक्ष होते तसे लोक थोडेच निघतील म्हणून कदाचित कोणी त्यास हा क्रम चालविण्यास सांगितले असेल.

ज्या सर्व सभा झाल्या त्यांमध्ये अव्यवस्था किंवा दांडगाई नव्हती. वादविवाद होत असता सभेस आलेल्या हिंदु, पारशी, मुसलमान लोकांनी बहुत सभ्य रीतीने वर्तणूक केली. कदाचित पोलिसांचे शिपायी होते म्हणून असेल तरी ही गोष्ट तारीफ करण्याजोगी आहे. "

१८५९ साली विष्णुबुवांनी ' वेदोक्तधर्मप्रकाश ' हा सातशेहून अधिक पृष्ठे असलेला ग्रंथराज प्रकाशित केला. पंढरपूर, नगर, पुणे, सांगली, मिरज, मुंबई या शहरांतून विष्णुबुवांनी जी व्याख्याने दिली होती त्या व्याख्यानांचेच साररूप या ग्रंथाद्वारे प्रकट झाले आहे.

वेदोक्त धर्माचा विचार सामाजिक नीती, वेदांतील सृष्टीचे नियम व त्यांची

प्रमाणे, वेदोक्त धर्माचा श्रेष्ठपणा ज्योतिषशास्त्रातील सिद्धांत, हठयोग व राजयोग आणि राजनीती इत्यादी विषयांवर स्वतंत्र प्रकरणे या ग्रंथात विष्णुबवांनी लिहिली आहेत.

या ग्रंथातील पंधरावे प्रकरण राजनीतिसंबंधी असून विष्णुबुवांच्या राजकीय तत्त्वज्ञानाची छबी या प्रकरणात स्पष्टपणे उमटली आहे.

विष्णुबुवांच्या 'वेदोक्त धर्मप्रकाशा'तील राजनीतीचा विचार ऐतिहासिक दृष्टीने केला असता ते बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन व लोकहितवादी ह्यांच्या परंपरेतील असल्याचे दिसते.

सार्वत्रिक शिक्षणाचा आग्रह, प्रातिनिधिक लोकशाही, सामाजिक समता, बालाजरठविवाहाचा निषेध, पुनर्विवाह व स्वयंवर यांचा पुरस्कार, औद्योगिक प्रगतीची श्रेयस्करता, राजकीय पातळीवरून संपूर्ण भारताचा विचार ही 'वेदोक्त धर्मप्रकाशांतील' राजनीतीची वैशिष्टये आहेत.

## विष्णुबुवाकृत 'राजनीती'

विष्णुबुवाकृत 'राजनीती'मधील काही महत्त्वाची कलमे अशी आहेत :

(अ) 'राज्यकारभार चालविणारे कामगार वंशपरंपरेने नेमू नयेत (आ) राजाने सर्व मनुष्यांस मजुरी व अन्न-वस्त्र मिळावे अशासाठी देशोदेशी जगाला सुखोपयोगी असे नवीन नवीन कारखाने काढावे व जुने कारखाने सुधारावे व मंडळ्या नेमून त्या कारखान्यांचा बंदोबस्त राखीत जावा व हरएक मजुराला किंवा कामगारांना दररोज किंवा दरमहिन्याचे महिन्यास ठरविलेला मजुरीचा पैका देत जावा......मजुराचा पैका कोणी बुडवू नये म्हणून अधिक जपत जावे.

(इ) 'वृद्धाने लहान मुलीबरोबर लग्न केले असता ती मुलगी परत घेऊन, तिचे लग्न तिच्या वयाच्या व गुणाच्या नियमाने, जो तिच्या शरीधर्माप्रमाणे व चार वर्णाप्रमाणे पुरुष असेल त्याजबरोबर लावून द्यावे आणि ज्या वृद्धाने असे काम केले असेल त्याला त्याच्या गुन्ह्याप्रमाणे शासन करावे.

(ई) देवळात किंवा तीर्थक्षेत्रात पुजारी किंवा कारभारी इत्यादी वतनदार ठेवू नयेत, कारण तसे केल्यास द्रव्यलोभाने भक्तीचा नाश होतो.

(उ) शेतकीच्या वगैरे जमिनीवर किंवा खुराकी सामानावर किंवा लाकडावर, किंवा गवतावर, पानांवर किंवा प्यावयाच्या पाण्यावर इत्यादिकांवर राजाचा कर मुळीच नसावा; कारण ते पदार्थ ईश्वरी देणगीचे आहेत. परंतु मनुष्यमात्राचे रक्षणार्थ प्रत्येक मनुष्यापासून दरवर्षास एक रुपया राजाने कर घ्यावा.

(ऊ) हिंदुस्थान देशातील राजकीय लेखन किंवा व्यावहारिक लेखन, बालबोध जी देवनागरी पूर्ण लिपी, तिच्यात असावे, अथवा ... मोडी लिपी, तिच्यात असावे, आणि युधिष्ठिर, शालिवाहन, विक्रम हे शक व चैत्र, वैशाख इत्यादी महिने... या प्रमाणे पुस्तकात लिहीत जावे.

(ए) विशिष्ट काळात स्वयंवर पद्धतीने पत्नीने पती निवडावा. विवाहाचे नियम कालपरत्वे चालवावे.

(ऐ) न्यायाधिशाने अन्यायी ब्राह्मण आणि अन्यायी महार या दोघांस सारख्या मानाने उभे करून अथवा बसवून न्याय करावा. परंतु महार दरवाजाबाहेर आणि ब्राह्मण आत असा पक्षपात करू नये.

(ओ) राजाच्या पोटी उत्पन्न झाला तोच राजा आहे असे नाही. जो लहान हुद्यापासून मोठ्या हुद्यापर्यंत कामे करून योग्यतेस चढला तोच राजा असावा, मग तो प्रजेतील कोणी का माणूस असेना.

(औ) सेना अथवा लेखनकामादिक कामातील माणसे अमूकच वर्णापैकी अमकच जातीची असावीत असे नाही.

(अं) शासनयंत्रणेतील माणसे सर्व साक्षर असावीत.

(अ:) राजा मेला अथवा वृद्ध वगैरे कारणाने ठरावाप्रमाणे वेतन घेऊन बसला, तर त्याच्या हाताखालचे जे मुख्य दहा कामदार त्यातून एक राजा नेमावा. तो नेमण्याचा अधिकार प्रजेतील लोकांचा या प्रकारचा असावा. म्हणजे एक जाहिरात छापून राज्यातील सर्व प्रजेस विनंती लिहावी की...हे राज्याभिषेकास योग्य आहेत. पैकी अमुक गादीवर बसवावा अशी इच्छा असेल त्याने त्याचे नावाखाली आपली सही करावी.

(क) जर कोणी म्हणेल की अमक्याने चेटूक विद्या किंवा जादू करून अमक्याला किंवा मला इजा दिली तर त्या म्हणणाऱ्यास राजाने बांधून फटके मारावे आणि त्याने पुन: तसे बोलू नये याविषयी बंदोबस्त ठेवावा. कारण जादू किंवा चेटूक मुळीच नाही.

जे कोणी आपल्या मुलींना व मुलांना लेखन-वाचन ज्ञान नीतिमानाकडून किंवा स्वत: देणार नाही किंवा नीतिमानास प्रतिबंध करतील, तर तसल्या कर्माच्या कर्त्यास राजाने बांधून फटके मारावे आणि पुन्हा तसे ते करणार नाहीत असा बंदोबस्त करावा.

'वेदोक्त धर्मप्रकाश' हा विष्णुबुवांचा ग्रंथ स्वामी दयानंदकृत 'सत्यार्थ प्रकाशा'चा अग्रगामी दूतच आहे असे म्हणावे लागेल. स्वामी दयानंदांनी आर्य समाजाची स्थापना करण्यापूर्वी सुमारे सोळा वर्षांपूर्वीच विष्णुबुवा ब्रह्मचारी ह्यांनी 'आर्य-समाज' चळवळीच्या बुडाशी असलेल्या मूलभूत कल्पनेचा 'वेदोक्त धर्म प्रकाश' या ग्रंथात पुरस्कार केला. सर्व यथार्थ ज्ञानाचा उगम वेदात असून वेदकाळातील समाजरचना मूलत: निर्दोष होती. कालांतराने भारतीय समाजरचनेत जडता आली अशी विचारसरणी विष्णुबुवांनी आपल्या ग्रंथात मांडली होती. गुणकर्मावर आधारलेली वर्णव्यवस्था पुढे वंशपरंरागत झाल्यामुळे भारतीय समाजात बिघाड निर्माण झाला, असे त्यांचे म्हणणे होते.

**गुणकर्मावर आधारलेली वर्णव्यवस्था भारतीय समाजाने पुन: प्रस्थापित करावी**

व त्यात हिंदु, मुसलमान, शीख, पारसिक, ख्रिश्चन, ज्यू सर्व जमातींचा समावेश व्हावा, अशी कल्पना विष्णुबुवांनी मांडली.

भारतातील सर्व जाती जमातींनी वेदोक्त धर्माचे ग्रहण करावे या संबंधीचे आवाहन करताना ' वेदोक्त धर्मप्रकाशा 'त विष्णुबुवा म्हणतात, " हल्ली जे हिंदुस्थान देशात मुसलमान आहेत त्यांचे पूर्वज सुमारे पाचशे वर्षांपूर्वी हिंदू होते, म्हणजे वेदोक्त धर्मातील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ह्या चार वर्णांचे होते.... हे प्रकरण जे हल्ली हिंदुस्थान देशात मुसलमान आहेत त्यांनी समजावे आणि खुषी असल्यास पुन्हा वेदोक्त धर्माचे ग्रहण करून मनुष्यमात्राचे गुणकर्म विभाग पाडून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र ह्या चार प्रकारचे वर्ग म्हणजे वर्ण बांधण्याची चाल सर्वकाळ चालू ठेवावी; कुटुंबावर वर्णव्यवस्था नाही.

" हल्ली जे हिन्दुस्थानात रोमन कॅथॉलिक ख्रिस्ती आहेत... प्रॉटेस्टंट पंथाचे ख्रिस्ती आहेत त्यांनीही पुन्हा वेदोक्त धर्माचे ग्रहण करावे. "

" हल्ली जे हिन्दुस्थान देशात महार व मांग, रामोशी व भिल्ल, कोळी व काटक, वडारी व कैकाडी, फासेपारधी व डोंबारी, मांगगारुडी व कोल्हारी, कुंभार व वेलदार, घिसाडी व कातकरी, ठाकुर व वारली, दुबळे व मेणा, डोंब व गोंड, वाघरी व मार्द, चांभार व बुरूड, परीट व जिनलग व सांथालिक आहेत ते सर्व लोक हिंदू आहेत... परंतु त्यांजकडे वेदोक्त धर्माच्या क्रिया करण्याचा संप्रदाय यथास्थित राहिला नाही. यास्तव ह्या वरील लिहिलेल्या सर्व लोकांनी असे समजावे की आमचे पूर्वज प्राचीन काळी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णांचे होते. परंतु व्यवहारधंद्याच्या व राज्यक्रांतीच्या झपाट्यात सापडल्यामुळे वेदोक्त धर्माच्या क्रिया जशा कराव्या तशा करणे विसरले आणि भ्रष्ट क्रिया अथवा ज्या वेदोक्तधर्म विरुद्ध क्रिया त्या करू लागले; परंतु आम्ही सर्व लोक वेदोक्त धर्माचे आहोत असे वर लिहिलेल्या सर्व लोकांनी समजावे आणि...पुन्हा वेदोक्त धर्माचे ग्रहण करावे."

" हल्ली जे हिन्दुस्थानात जैन, बौद्ध, लिंगायत, मानभाव, गोसावी, गोरखनाथ, कानफाटे, नाथपंथी, दादूपंथीय, नानकशाही, कबीरपंथी, बैरागी, गोरखा, नेपाळी, शीख ह्यांनी पुन्हा वेदोक्त धर्माचे ग्रहण करावे.

" हल्ली जे रशिया व युरोप आणि आफ्रिका व अमेरिका ह्या चार खंडांत बुद्धिस्ट, याहुदी, ख्रिस्ती, महंमदी आहेत त्यांचे पूर्वज साडेतीन हजार वर्षांपूर्वी वेदोक्त धर्माचे होते त्यांनीही पुन्हा वेदोक्त धर्माचे ग्रहण करावे."

" भूमंडळावरील स्त्रिया पुरुषहो, वेदोक्त धर्म तुमचा धर्म आहे."

' वेदोक्त धर्मप्रकाशा 'च्या प्रकाशनानंतर विष्णुबुवांनी पूर्व भारताचा प्रवास केला. ते जलमार्गाने प्रथम मद्रासला व तेथून कलकत्त्याला गेले. कलकत्ता मुक्कामी त्यांनी हिन्दी भाषेतून काही व्याख्याने देऊन कलकत्ता शहरही गाजविले. कलकत्त्या-

हून ते काशीला गेले व तेथेच त्यांनी परमहंस दीक्षा घेतली. काशीहून ते कलकत्त्याला परत गेले. कलकत्त्याला त्यांनी एक वर्ष मुक्काम केला. या मुक्कामात त्यांनी खातू नावाच्या एका मुसलमानाला आपला स्वयंपाकी म्हणून बाळगले होते. कलकत्त्याहून मुंबईला बोटीने परत येताना खिस्ताव-बबर्जीच्या हातचा शिजलेला भात व बटाटे त्यांनी बिनदिक्कत खाल्ले. या दोन्ही गोष्टींचा उल्लेख विष्णुबुवा अभिमानाने करीत असत. तत्कालीन लोकांच्या दृष्टीने धर्मबाह्य वाटणारी कृत्ये करताना त्यांना काहीएक क्षिती वाटत नसे व ती कृत्ये आपण केल्याचे ते प्रौढीने सांगत.

सल्ला विचारण्यास अथवा त्यांचे एखाद्या विषयावरील मत अजमाविण्यास आलेल्याला ते कधी कधी फार मासलेवाईक उत्तर देत असत. पुनर्विवाहासंबंधी त्यांचे मत विचारण्यास आलेल्या इसमास ते एकदा म्हणाले, " हल्ली जसा सप्त-पद्यंत विवाह आहे तो यथाशास्त्र नाही, रूढीला अनुसरून आहे.... हल्लीचे नवरे-बायकांत अनेक कारणांस्तव किती वैमनस्य असते ते प्रथम दूर करण्याचा आमचा विचार आहे. तेव्हा विधवा विवाहाची खटपट यापुढे काय ? अस्तु. चापून विधवा विवाह लावीत जा. जेवावयास येतील त्यांना वाढा. न येतील त्यांचे आर्जवे करू नका. मुकाट्याने हे प्रकरण चालू द्या, म्हणजे मजा येईल—तुम्ही तुमचे काम करा, आम्ही आमचे करतो. "

वैदिक धर्मावर असलेल्या प्रखर श्रद्धेतून ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचारावर तुटून पडणाऱ्या, पाश्चात्त्य संस्कृतीसंबंधी कोणत्याही प्रकारची जवळीक न वाटणाऱ्या अध्यात्मप्रवण विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांनीच पुढे १८६७ साली ' सुखदायक राज्य-प्रकरणी निबंध ' प्रकाशित करून खाजगी संपत्तीच्या वैचारिक गडावर तोफा डागा-व्यात ही खरोखरीच एक लोकविलक्षण गोष्ट आहे !

एकोणविसावे शतक हे मानवी इतिहासातील एक सृजनात्मक शतक आहे. या शतकात जगाच्या भिन्न भिन्न भागांत मानवी प्रतिभा नवनव्या जागृतीच्या लहरींनी हिंदळून निघाली. वैचारिक क्षेत्रात प्रचंड उलथापालथी झाल्या व त्यातून सामाजिक चळवळींचे सामर्थ्यशाली प्रवाह वाहू लागले.

१८१८ साली शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकताच भारताचे सार्वभौमत्व इंग्रजांकडे गेले व हिंदुस्थान हा जागतिक राजकारणाच्या व विचारविश्वाच्या रिंगणात कायमचा ओढला गेला. युरोपीय वैचारिक जीवनातील लाटा भारताच्या काठावर आदळू लागल्या.

महाराष्ट्रात माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन ह्याने पाश्चात्त्य शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. १८२१ मध्ये पुणे पाठशाळा व १८२२ मध्ये ' हैंद शिक्षक व पुस्तक मंडळी ' निघाली. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर ह्यांनी ' दर्पण ' साप्ताहिक काढले. १८४१ मध्ये भाऊ महाजनांचा ' प्रभाकर ' अवतरला.

इंग्रजी विद्येने प्रभावित झालेल्या पहिल्या पिढीने स्टुडंटस लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी, कल्याणोन्नायक मंडळी, परमहंस मंडळी, बॉम्बे असोसिएशन आदी संस्था उभ्या करून महाराष्ट्रातील नव्या वैचारिक वळणाला रस्ता करून दिला. महाराष्ट्रातील नव्या प्रबोधनाच्या या संस्था म्हणजे खुणाच होत. याच काळात भारतात जुन्या संस्कृत वाङमयाचा पुनरुद्धार झाला. पाश्चात्त्य विद्वानांनी प्राचीन भारतीय संस्कृतीच्या काही अज्ञात दालनांचा शोध लावण्यामुळे न्यूनगंडाने पछाडलेल्या भारताला नवी जागृती आली. मुंबई येथील एशियाटिक सोसायटीने या बाबतीत केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. प्राचीन शिलालेख, शिल्प, वास्तू आणि वाङमय यांच्या अभ्यासामुळे प्राचीन भारतीय संस्कृतीविषयीचा अभिमान जागा होऊन नव्या राष्ट्रीयतेची ज्वाला त्यामधून प्रज्वलित झाली. पाश्चात्त्य संस्कृतीच्या झगमगाटामुळे ज्यांचे डोळे दिपून गेले होते त्यांना पाश्चात्त्यांच्या अंधानुकरणापासून परावृत्त करण्यासाठी प्राचीन भारतीय संस्कृतीचा वारसा उपयोगी पडला. त्यांमधूनच बंगालमध्ये ब्राह्मो समाज व महाराष्ट्रात प्रार्थना समाज अवतरले.

राजकीय विचारांच्या क्षेत्रात महाराष्ट्राने या काळात उदारमतवादी तत्त्वज्ञानाची दीक्षा घेतली. १८३२ साली इंग्लंडमधील राजकीय सुधारणेचे बाळशास्त्री जांभेकरांनी पुढील शब्दांत स्वागत केले. " If the fountain head is purified, the stream that follows from it, will run clear." १८४८ मध्ये युरोपमधील क्रांतिकारक चळवळींचे लोकहितवादींनी मुक्तकंठाने स्वागत केले. सरंजामदारी दडपणातून व्यक्ती आणि समाज ह्यांची मुक्तता आणि आर्थिक समानता या तत्त्वांचा पुरस्कार लोकहितवादींनी शतपत्रांमधून केला. जातिनिरपेक्ष, वर्गनिरपेक्ष सांसदीय लोकशाही भारतात येणे श्रेयस्कर आहे; जे इंग्लंडात आणि अमेरिकेत झाले तेच उद्या भारतात झाल्याखेरीज राहणार नाही, असे भाकित लोकहितवादींनी शतपत्रात केले होते. आर्थिक क्षेत्रात राजसत्तेने लोककल्याणाचा कार्यक्रम हाती घ्यावा असेही लोकहितवादींनी सुचविले होते.

राजकीय जागृतीच्या या लाटेवर आरूढ होऊन विष्णुबुवांनी आपली विचारनौका हाकारली.

१८६७ साली विष्णुबुवांनी 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' प्रसिद्ध करून समकालीन विचारवंतांमध्ये खळबळ माजवून दिली. या निवेदनाचे इंग्रजीत भाषांतर करून त्याच्या छापील प्रती इंग्लंडमधील राणीकडे, पार्लमेंटकडे व महत्त्वाच्या अधिकाऱ्यांकडे पाठवून दिल्या. एवढेच नव्हे तर चीन, अमेरिका आदी राष्ट्रांतील धुरिणांकडेही विष्णुबुवांनी या निबंधाच्या प्रती पाठवल्या.

'सुखदायक राज्यप्रकरणी निबंधां'त विष्णुबुवांनी मानवाच्या सुखासाठी समाजाच्या आमूलाग्र फेररचनेचा कार्यक्रम जगातील सत्ताधिकाऱ्यांपुढे ठेवला.

सर्व प्रजा ही एक कुटुंब व सर्व जमीन ही एक बाग व त्यातून जे जे निघेल ते ते

सर्वांचे एक. अन्नधान्याची कोठारे गावोगाव भरून ठेवावीत. आणि गरीब व श्रीमंतांनी त्याच कोठारातून सारखेच अन्न घेऊन खावे, तऱ्हेतऱ्हेच्या कापडाचे खजिने गावोगावी ठेवून त्यातून लोकांनी जो कपडा हवा तो घ्यावा, सोन्यारुप्याचे, मोती-हिरे यांनी जडलेले अलंकारही तयार करून गावोगावी ठेवावे व ते सर्व स्त्री-पुरुषांनी वापरावे व मोडले म्हणजे राज्याच्या खजिन्यात परत ठेवावे. तारायंत्र, आगगाड्या गावोगावी असाव्यात. शेतकऱ्यांनी, कारखानदारांनी व राज्यकर्त्यांनी एकसारखेच अन्न खावे, पतिपत्नींची निवड स्वयंवर पद्धतीने व्हावी. मुले व मुली पाच वर्षांची झाल्यावर त्यांना राज्याच्या ताब्यात द्यावे व राज्याने त्यांना वेगवेगळ्या विद्या शिकवून उद्योगास लावावे व स्त्रिया, पुरुष वृद्ध झाले म्हणजे त्यांनी स्वस्थ बसून खावे व विभिन्न खात्यांच्या पार्लमेंटचे समासद असावे, ही राज्याची नीती असावी हा मूलभूत विचार विष्णुबुवांनी 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंधा'त मांडला आहे.

हे राज्यप्रकरण ११ कलमी असून त्यातून विष्णुबुवांची वैचारिक तडफ, त्यांचे युक्तिवाद, चातुर्य, त्यांचा आग्रहीपणा व समकालीन राज्यकर्त्यांना खणखणीत शब्दांत आवाहन करणारे त्यांचे वक्तृत्व हे त्यांचे सर्व गुण पानोपानी प्रकटले आहेत.

आजच्या मराठी वाचकांनाही त्यांच्या विचारांतील मौलिकता व तजेलता पूर्णांशाने अनुभवता यावा म्हणून शंभर वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला हा निबंध जसाच्या तसा उद्धृत करणे अप्रस्तुत ठरणार नाही म्हणून तो येथे सादर करीत आहे.

## राज्यप्रकरणी निबंध

राजा कसा असावा व त्याने काय करावे व प्रजेने कसे चालावे व त्यापासून फल काय या विषयी हा निबंध ब्रह्मचारी बाबा यांनी लिहून सर्व लोकांस नजर केला आहे याची अवतरणिका खाली लिहिलेली वाचावी.

" हल्ली या भूलोकावर अनेक राज्ये आहेत, परंतु ती चालविणाऱ्या राजांना खरी राज्यनीती काय हे माहीत नाही व प्रजा कोणत्या उपायाने गुन्हे करणार नाही हे माहीत नाही. यामुळे सर्व राजे व सर्व प्रजा इत्यादी मनुष्यमात्र सर्वकाळ चिंताग्रस्त व हायहाय करीत फिरत आहेत. म्हणजे कोणीच दुःखी नाही असे नाही. यास्तव या लहानशा निबंधात लिहिलेली राज्य करण्याची रीत राजांनी पकडावी व प्रजेने त्या रीतीप्रमाणे वागण्याची रीत पकडावी म्हणजे सर्व प्रापंचिक संकटे दूर होऊन निरिच्छतेने ईश्वराची भक्ती त्यांना घडेल आणि वेदांत शास्त्राचे पूर्ण विचार व योगशास्त्राचा पूर्ण अनुभव घेण्यास त्यांच्या वृत्तीला स्वच्छता व अवकाश मिळेल आणि परस्पर मनुष्यांत अत्यंत निरीच्छ सत्य व मैत्री राहील व दया, क्षमा, शांती ही लक्षणे मनुष्यमात्राच्या अंगी सहज राहतील या हेतूने हा निबंध मी विष्णुबुवा ब्रह्मचारी याने केला यात जितका विचार लिहून दाखवायचा तितका लिहिला नाही. परंतु त्या सर्व विचारांची मूळ कारणे सूत्ररीतिप्रमाणे कळतील अशी लिहिली

आहेत. ह्याचा कृपा करून सर्वांनी अंगिकार करावा, म्हणजे सर्वांच्या अंगी दस्युत्व उत्पन्न होण्याची कारणे नष्ट होऊन राज्य उत्पन्न होईल व दस्यू कोण हे कळेल व ईश्वराची सर्व सृष्टी एक आहे व तिचा नियमही एक आहे. तसेच ईश्वराकडील राज्यनीतीही एक आहे व ती सर्वांस सुखरूप आहे हे कळेल व तशा राज्य-नीतीच्या राज्याचे दर्शन तेच सर्व सुखाचे कारण आहे हे अनुभवास येईल. यास्तव कृपा करून मी आपल्या वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी म्हणजे उतार अवस्थेत लिहि-लेली राज्यनीती वाचून तिचे सर्वांनी मनन करावे ही सर्व लोकांस मी हात जोडून विनंती करीत आहे.

### कलम १

" अहो लोकहो, ऐका, जितक्या प्रदेशाचा जो राजा असेल तितक्या प्रदेशातील प्रजेला राजाने असे समजावे की ही सर्व प्रजा माझे एक कुटुंब आहे व मी ह्या सर्व प्रजारूपी कुटुंबाचा मालक आहे. जेवढी माझे ताब्यात जमीन आहे तेवढी जमीन माझा एक बागच आहे यास्तव या सर्व प्रजारूपी कुटुंबाचा तेवढ्या बागात म्हणजे जमिनीत निर्वाह होऊन प्रजारूपी कुटुंब सर्वकाळ सुखी राहील अशी तजवीज मला केलीच पाहिजे. या प्रमाणे राजाचा विचार प्रथम राज्य हेच एक घर व प्रजा हेच एक कुटुंब असा भाव असावा.

### कलम २

" याप्रमाणे सर्व प्रजा एक कुटुंब आहे यास्तव त्या सर्व कुटुंबाला सुख व्हावे या विषयी उद्योग करणाऱ्या राजाला प्रजेने विनंती करावी की जो हुकूम होईल त्याप्रमाणे वागण्यास आम्ही सर्व प्रजा सिद्ध आहो.

### कलम ३

" नंतर सर्व प्रजेकडून सर्व जमीन लागवड करवावी व ती अशी की ज्या ठिकाणी जी वनस्पती चांगली पिकेल त्या ठिकाणी तिची लागवड करवावी व नद्यांना धरणे बांधून सर्व जमिनीला बारा महिने पाणी पुरेल इतके पाण्याचे तलाव व कोंडी तयार कराव्या आणि अनेक प्रकारची फळे व कंद, भाज्या व अन्ने व लाकडे व गाई, म्हशी, शेरडे, घोडी, गाढवे, उंट यांच्या निर्वाहार्थ गवत उत्पन्न करून गावोगाव कोठारे भरून ठेवावी व त्यांतून सर्व गावकऱ्यांनी पोटास लागेल तितके अन्न न्यावे व जनावरांस चारा न्यावा. याप्रमाणे शीतकाळ व उष्णकाळ व पर्जन्यकाळ या बारा महिन्यांत एकसारखे सर्व जमिनींतून उत्पन्न करावे आणि ते सर्वांचे उत्पन्न एकच आहे व एकाच्या ताब्यात राहून सर्वांनी यातून खाव-यास विपुल न्यावे व राजाने लोकरीचे व तागाचे व रेशमाचे व कापसाचे याप्रमाणे अनेक तऱ्हेचे कपडे तयार करण्याचे कारखाने तयार करून अनेक तऱ्हेचे कापड तयार करावे व गावोगाव खजिन्यात ठेवावे. त्यातून ज्याला जो कपडा पाहिजे तो त्याने न्यावा व बारा वर्षे पर्जन्य पडला नाही तरीही पाण्याच्या पुरवठ्यामुळे जमीन सुपीकच

राहावी असा पाण्याचा घरणे बांधून पुरवठा ठेवावा व सोन्या–रुप्याचे, मोती हिरे, यांनी जडलेले अलंकार तयार करून गावोगाव ठेवावे व ते सर्व स्त्री–पुरुषांनी वापरावे आणि पुन: राजाच्या खजिन्यात ठेवावे. तशीच शस्त्रे, यंत्रे तयार करून गावोगाव ठेवावी व सर्व प्रकारचे खेळ गावोगाव ठेवावे व आगगाड्या व तारायंत्रे गावोगाव असावी व सर्वप्रकारच्या कारखानदारांनी व शेतकऱ्यांनी व राजाने एकसारखे खाणे खावे व ते सर्वांनी एका कोठारातून नेऊन खावे व सर्वांची लग्ने राजाने करावी व ज्याला जी स्त्री नको त्याला दुसरी करून द्यावी व तिला दुसरा पती करून द्यावा व सर्वांची पाच वर्षांची पोरे झाली म्हणजे मुली व मुलगे राजाच्या ताब्यात द्यावे. नंतर त्याने सर्वांना विद्या शिकवून ज्याला ज्या कामात जास्ती उद्योग करण्याची सवय असेल त्याला त्या कामाकडे लावून द्यावा, व स्त्रिया व पुरुष वृद्ध झाली म्हणजे त्यांच्याकडून कामधंदा न करविता त्यांनी स्वस्थ बसून खावे आणि जगत बनणाराचे उपकार आठवीत बसावे व मेल्यावर सर्वांच्या शरीराचे तत्काळ पृथकरण व्हावे यासाठी राजाने सर्वांची शरीरे दहन करावी या प्रमाणेच एकच कुटुंब व प्रजा आहे. या वागण्याची रीत वर लिहिल्याप्रमाणे असावी, म्हणजे चोरी, मारामारी व तरकट व खून इत्यादी गुन्हे कशाला म्हणतात हे माहीत नाहीसे होते व इन्साफाच्या कोर्टाची मुळीच गरज राहत नाही व दुष्काळ काय हे ठाऊकही होत नाही व सर्वांच्या इच्छा पूर्ण होतात. यास्तव या कलमात लिहिल्याप्रमाणे राजा आणि प्रजा यांचा खरोखर संबंध असावा.

### कलम ४

" राजाने सर्व जीवात्म्यांकडून जगत होणाराची दररोज अशी प्रार्थना करावी की, हे जगत होणाऱ्या ज्ञानवान ज्ञात्या ईश्वरा, हे सर्व विश्वच तू झालेला आहेस व ज्या शरीराच्या आधाराने तुझी आठवण शरीराच्या हृदयात तू आहेस, अशी मी करतो–

### कलम ५

" याप्रमाणे सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन हाच एक बाग व त्यांतून जे जे निघेल ते ते सर्वांचे एक याप्रमाणे राज्यव्यवस्था असली म्हणजे सर्वांना सर्व उपभोग मिळतात व सर्वांना उत्तम खावयास मिळते व सर्वांना विपुल वस्त्रे व अलंकार भूषणे मिळतात व सर्वांना नाच, तमाशे, बैठकी पाहवयास सापडतात व पालख्या व रथ, घोडे, हत्ती यांजवर सर्वांना बसावयास मिळते. यामुळे कोणाला काही प्राप्त नाही असे होतच नाही; म्हणून सर्व लोक पूर्णकाम होतात. यामुळे माणसाच्या अपूर्णतेने क्रोध येणे हे शिल्लक राहत नाही आणि क्रोध नसल्यामुळे गुन्हा करणे किंवा गुन्हा करण्यास्तव मत्सर धरून बसणे यांचा लवलेशही राहत नाही. यामुळे हाच प्रजेचा व राजाचा खरोखर असावा तसा संबंध आहे:

## कलम ६

"आता कितीएक लोक अशी कल्पना करतील की अशी व्यवस्था झाली तर संडास कोण झाडील व पालखी कोण उचलील व गुडगुडी कोण भरून देईल व पिकदाणी धुवून कोण आणून देईल व हात–पाय कोण दाबील व हातात जोडा घेऊन कोण उभा राहील व घोड्याला खरारा करणे व घोड्यावरून उतरल्याबरोबर घोडा हातात धरणे हे कोण करील ? तर त्या कल्पना करणारांनी असे समजावे की, मनुष्यांची अक्कल एकसारखी नसते व प्रीतीही एकसारखी नसते. यामुळे त्यांना कर्मे करण्याची प्रीतीही एकसारखी नसते; यास्तव त्या सर्वांच्या प्रकृतीचे तानमान पाहून त्यांना ते धंदे शिकविणे हे पाच वर्षांच्या मुली व मुलगे राजाच्या ताब्यात दिल्यापासून सर्वांच्या परीक्षा त्या ठिकाणी होऊनच त्यांना विद्या शिकविल्या जातील. त्यांत कितिएक स्त्रिया, पुरुषांना संडास झाडण्याची विद्या राजा शिकवील व तितके त्यांनी बरोबर काम केले म्हणजे त्यांना आयते शिजवलेले अन्न व उत्तम कपडे व अलंकार व स्त्रिया व स्त्रियांना पुरुष याप्रमाणे सर्व सुखोपभोग्य पदार्थ मिळतात. ह्या लालचेने तितके संडास झाडण्याचे काम ते चांगल्या मेहनतीने करतील व त्यांची पोरे पाच वर्षांची झाली म्हणजे त्यांना राजा नेऊन जो धंदा शिकवील तोच ती मोठी झाल्यावर करतील. याप्रमाणे व्यवस्था असली म्हणजे सर्व कामे होतील व गुडगुडी व पिकदाणी धुवून 'आणून देण्याचे व पाय दाबण्याचे काम शिकलेली स्त्री-पुरुष ते हलके समजत नाहीत, कारण ती असे समजतात की मुख्य अन्न हे धन आहे व वस्त्र इत्यादी सर्व सुखोपभोग्य पदार्थ हे त्या धनाच्या सामर्थ्याने भोगावयाचे विलास आहेत. या सर्वांची प्राप्ती आम्ही पाय दाबणे व गुडगुडी भरून देणे व पिकदाणी धुणे इत्यादी आम्हांस येतात ती कामे आम्ही केली म्हणजे या सर्व धनादिकांची प्राप्ती आम्हांस सहज होते यास्तव हे काम विनदिक्कत करावे. याप्रमाणे विचार होऊन सर्व कामे चालतात व स्त्री पुरुष हे उभयता राजाने बांधविलेल्या एक एक गृहात एक एक जोडा अशी राहून त्या ठिकाणी त्यांना सर्व पदार्थांची प्राप्ती त्यांनी शिकविलेले काम केले म्हणजे होते, यामुळे सर्व कामे ती मनुष्ये चालवितात यामुळे कोणतीच अडचण पडत नाही.

## कलम ७

"राजाने अनेक धंद्यांची खाती काढावी म्हणजे एक शेते करण्याचे खाते काढावे त्यातच शेते करण्याच्या मुख्य विद्येत हुशार असे कित्येक कामदार जागोजाग नेमावे व त्यांच्या शिकवणीप्रमाणे काम करणारे कित्येक त्यांच्या हाताखाली नेमावे व कितिएक पिकलेले धान्य कापून नेऊन दाणे काढून देणारे नेमावे व कितिएक संग्रह ठेवण्याच्या कामगार नेमावे व कितिएक जिकडे जो माल जितका पाहिजे तितका नेऊन पोहोचवणारे नेमावे व कितिएक वस्त्रे तयार करणारे व कितिएक शिवणारे व कितिएक लोखंडाचे काम करणारे व कितिएक सोने, रूपे, तांबे इत्यादी धातूंची कामे

करणारे व कितिएक लाकडाची व मातीची व दगडाची व काचेची इत्यादी कामे करणारे व कितिएक चामडयाची कामे करणारे व कितिएक खाणीची कामे करणारे व कितिएक गणित विद्या शिकविणारे कितिएक पाण्यातील जहाजी कामे करणारे व कितिएक घरे व जहाजे बांधणारे व कितिएक औषधी देणारे व कितिएक लोकांस सद्बुद्धी देणारे व कितिएक जे ज्याला पाहिजे ते वस्त्र व अलंकार देणारे व परत घेऊन संग्रह करणारे व कितिएक खुराकी माल व भाज्या व तेल व तूप व गूळ इत्यादी लोकांस देणारे इत्यादी प्रकारचे सर्व ठिकाणी नेमून सर्वांचा बंदोबस्त ठेवावा हेच खरोखर राजा असण्याचे काम आहे.

## कलम ८

"यांप्रमाणे व्यवहार असला म्हणजे चोरी करून त्या मालाचे काय करावे व व्यापार करून मत्सर कसला करावा व पैसा छपवून त्याचा उपयोग काय करावा व दुसऱ्याला मारून काय मिळवावे असे झाल्यामुळे खराब कामे सर्व व्यर्थ आहेत याप्रमाणे मनात विचार होऊन मन स्वस्थ बसते आणि ईश्वराचा उपकार आठवू लागते. यास्तव प्रजेत राज्यकारभार या रीतीचा असावा. पाहा, असा राज्यकारभार एक शतकापर्यंत चालेल तर दुसऱ्या शतकातील प्रजा हल्लीच्या राजांना व न्याया-धीशांना ते मुख्य नवते ते जनावर होते असे म्हणेल.

## कलम ९

"पाहा, सर्व प्रजा एक कुटुंब व सर्वांचे मुख्य धन जे अन्न ते एक व सर्वांचे सुख-भोग्य पदार्थ एक याप्रमाणे राज्यव्यवस्था नसल्यामुळे सर्व प्रजा परस्परांचे गुन्हे करीत आहे व विश्वासघात करीत आहे व एकमेकांचे प्राण घेत आहे व अनेक कपटे करीत आहे व ईश्वराला शिव्या देत आहे व "काय करू कसे करू" या अष्टाक्षरी मंत्राचा जप करीत आहे व कुलुपे-किल्ल्या बाळगीत आहे व कोणाला पुरे खावयास मिळते व कोणाला मिळत नाही अशी दुर्दशा होत आहे व दुष्काळाने प्रजा मरत आहे व आशिया, युरोप, आफ्रिका, अमेरिका या चारी खंडांतील व सर्व द्वीपांतील राजे म्हण-विणारे इंग्रज फ्रेंच, रशियन, अमेरिकन चिनई या. व हिंदुस्थानवासी व मध्य आशिया-निवासी इत्यादी राजांचे कलह उत्पन्न होऊन प्राणघात होत आहेत. ह्या इतक्या अनर्थाचे मुख्य कारण इतकेच की सर्व प्रजा एक कुटुंब ही वर लिहिलेली राज्यव्यवस्था भूगोलावर कोठेच आढळत नाही हेच आहे. यास्तव सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन एक बाग व त्यातील जे जे उत्पन्न ते सर्वांचे एक व त्या सर्व खटल्याचा मालक राजा एक याप्रमाणे राज्यव्यवस्था असावी म्हणजे इंग्लिश, फ्रेंच, रशियन, अमेरिकन, चिनई ह्या राज्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना असे वाटेल की आमची नीती दुष्ट म्हणून आमच्या प्रजेत दुष्ट गुन्हे होतात. यास्तव आपण सर्व प्रजा एक कुटुंब अशी नीती ठेवू तरच सुखी राहू व प्रजा सुखी राहील; कारण प्रजेच्या गुन्ह्याचे पाप राजाच्या मस्तका-वर आहे हे म्हणण्याचे कारण राज्यनीती बरोबर नाही हे ध्यानात ठेवून एक

कुटुंब सर्व प्रजा अशी राज्यनीती ठेवावी.

### कलम १०

पाहा, पुराणात एक गोष्ट लिहिली आहे की कोणी एका मनुष्यास एका राजाने जेवावयास बोलाविले. त्याने जेवून जातेवेळी काहीं चोरून नेले व त्याचा इन्साफ कसा करावा व चोरास काय शिक्षा असावी हे विचारण्यासाठी कोणीएक नीतिमान राजाकडे गेले व त्या वेळेस त्या राजाने सांगितले की ह्याने चोरले याचे कारण चोरीचा क्रयविक्रय तुझ्या राज्यात होतो व त्या धनापासून सुखभोग्य पदार्थ मिळतात, परंतु सुवर्ण–रौप्याशिवाय सुखभोग्य पदार्थ मिळात नाहीत, याचे कारण तुझ्या स्वाधीन सर्वांचे सर्व सुखभोग्य पदार्थ नाहीत. यास्तव असला तू नीतिमान राजा आहेस यामुळे चोरी होते. कारण चोरी वगैरे करणे हे सर्व सुखभोग्य पदार्थ-प्राप्त्यर्थ आहे; परंतु तुझ्या राजनीतीने सर्वांस सारखे सुखभोग्य पदार्थ मिळत नसतील व मिळविण्याची चिंता लोकांस पडत असेल यामुळे अनेक गुन्हे होत असतील यास्तव तू राजा म्हणविणाऱ्या त्या तुझा शिरच्छेद करावा व राजनीती बदलावी ही शिक्षा मला पसंत आहे.

### कलम ११

" पाहा, सर्व प्रजा एक कुटुंब या प्रकारची राजव्यवस्था ह्या भूगोलावर हरएक ठिकाणी चालू होईल त्या दिवशी लोकहो, तुम्ही अशी कल्पना करा की भगवद्-गीतेच्या दहाव्या अध्यायाच्या सत्ताविसाव्या श्लोकाच्या चतुर्थ चरणात सांगितल्या-प्रमाणे ' नराणांच नराधिपं ' म्हणजे मनुष्यांत मनुष्यांचा राजा मी आहे असे ईश्वर म्हणतो. ह्या म्हणण्याप्रमाणे राज्य उत्पन्न झाले यास्तव सार्वभौमपद त्या राजाला मिळेल कारण तो ईश्वरी अंश आहे. असे भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायाच्या सत्ताविसाव्या श्लोकाच्या चतुर्थ चरणात आहे. यास्तव अशा राज्यनीतीपुढे हल्लीच्या चारी खंडांतल्या इंग्लिश, फ्रेंच, रशियन, अमेरिकन इत्यादी राज्यांच्या राजनीती ह्या कशा होतील तर जसा सूर्यापुढे खद्योत किंवा राजापुढे चोर तशा होतील असे समजावे. यास्तव खरोखर सांगतो की सर्व प्रजा एक कुटुंब अशी राजनीती असावी.

या अकरा कलमांत लिहिल्याप्रमाणे राजा आणि प्रजा यांनी वागावे.

एकोणविसाव्या शतकाच्या मध्यावर महाराष्ट्रातील एका संन्याशाच्या तोंडून महाराष्ट्रात सर्वप्रथम ' कम्युनिझम 'चा ओनामा ऐकावयास मिळावा या घटनेबद्दल ' आधुनिक भारत 'कार जावडेकर म्हणतात :

" विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांचे हे कम्युनिझमच्या धर्तीवरचे विचार वाचले म्हणजे ज्याने कार्ल मार्क्स वाचला नाही त्याला हा कम्युनिझम कसा सुचला, असा अचंबा अलीकडील सुशिक्षितांना वाटतो. पण ही गोष्ट इतकी अचंबा वाटण्यासारखी नाही अशी आमची समजूत आहे. ज्या मनुष्याने आपल्या स्वार्थाची होळी केली आहे, वर्गस्वार्थाचाही पगडा ज्या संन्यस्त मनांवर बसलेला नाही, प्राचीन ऋषींच्या प्रति-

मेला आकलन झालेले विश्वकुटुंबाचे ध्येय ज्याने शक्य तो आचरणात आणण्याचे प्रयत्न चालविले आहेत, अशा मनुष्याने आगगाड्या, तारायंत्रे किंवा इतर धनोत्पादक यंत्रे पाहिली किंवा ऐकली, या यंत्रकृत मालाच्या चढाओढीत आपल्या देशांतील लोकांचे हस्तव्यवसाय ठार होऊन ते बेकार बनत आहेत व देशात सर्वत्र दारिद्र्य व दैन्य वाढत आहे याची त्याला जाणीव झाली, म्हणजे ही सर्व यंत्रकला व भौतिक विद्या लोकांचे देश लुबाडण्यासाठी उपयोगात न आणता आणि तिच्या साहाय्यान मूठभर लोकांनी नवकोट नारायण बनून कोट्यवधी जनतेला आपले दास न बनविता ही यंत्रकला व ही भौतिकविद्या यांचा उपयोग प्रजेचे मुलाप्रमाणे प्रतिपालन करणाऱ्या राजसत्तेने करावा आणि प्राचीन ऋषींनी प्रतिभाबलाने पाहिलेल्या विश्वकुटुंबाची स्थापना करण्यासाठी तो करावा, अशी कल्पना सुचण्यास कार्ल मार्क्सच्या ग्रंथाचेच अध्ययन करण्याची गरज नाही."

विष्णुबुवा ब्रह्मचारींचे 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' हा स्वप्नरंजनाचाच एक प्रकार होता हे खरे. त्यांनी प्रतिपादन केलेली राजनीती शासकवर्गाने अंगिकारावी ही शुभेच्छा व्यक्त करण्यापलीकडे ते काहीही करू शकले नाहीत. १८७१ साली त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्यामागून त्यांनी कोणताही संप्रदाय निर्माण करून ठेवला नाही. कोणतीही मठाची गादी त्यांनी कुणाला चालवण्यास दिली नाही हे खरे. परंतु केवळ अंत:प्रेरणेने येऊ घातलेल्या समाजवादी युगाची चाहूल त्यांनी प्रथम ऐकली व त्याचा ठाव लोकांनी घ्यावा म्हणून त्यांनी आपले द्रष्टे विचार निबंधरूपाने समाजासमोर ठेवले.


आगामी प्रकाशन

# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

## २३

लेनिन व्हायबर्ग येथे लॅटुक नावाच्या एका पत्रकाराकडे राहत होता. त्यामुळे सर्व वर्तमानपत्रे वाचावयास मिळण्याची आणि पेट्रोग्राडमधल्या ताज्या घटना समजण्याची त्याची चांगलीच सोय झाली होती. एकदा शॉटमन लेनिनला भेटावयास आलेला असताना लेनिनने त्याला रागाने विचारले, 'मी पेट्रोग्राडमध्ये परतू नये अशी आपल्या पक्षाच्या मध्यवर्ती समितीची इच्छा असल्याची जी बातमी प्रसिद्ध झाली आहे ती खरी आहे का ?'

'नाही. पोलिसांनी तुमचा तपास करण्याचं काम सोडून द्यावं यासाठी मुद्दामच आम्ही तसा ठराव केलाय.'

शॉटमनचे हे उडवाउडवीचे उत्तर ऐकून लेनिन खूप भडकला. तो म्हणाला, 'मध्यवर्ती समितीच्या असल्या भ्याड कारवाया मी मुळीच सहन करणार नाही—मुळीच सहन करणार नाही.'

लेनिन शांत होईपर्यंत त्याच्याशी काहीच न बोलण्याचे शॉटमनने ठरविले होते. त्याची ही युक्ती सफल झाली. काही मिनिटांच्या आतच लेनिनच्या रागाचा पारा खाली आला. त्याने विचारले, 'शॉटमन, मला एक माहिती हवी आहे. पेट्रोग्राडमधले कामगार आणि सैनिक माझ्यासंबंधी काय बोलत आहेत ?' शॉटमनच्या उत्तराची वाट न पाहता लेनिन म्हणाला, 'गेल्या महिन्याभरात आपल्या पक्षाची ताकद खूप वाढली असली पाहिजे अशी माझी खात्री आहे. केवळ कामगारांनाच नव्हे

तर वरच्या वर्गातल्या लोकांनाही आपण हवे आहोत.'

लेनिनच्या आवाजात निर्धार दिसत होता. तो म्हणाला, ' सारा देश आपली वाट पाहत आहे. म्हणून आपण आता त्वरेनं पावलं टाकली पाहिजेत.'

' पण कॉमरेड्, राज्ययंत्र चालवू शकणारे तज्ज्ञ आपल्यापाशी कुठं आहेत ?' शॉटमनने विचारले.

' काय मूर्खासारखा प्रश्न विचारलास रे ?' शॉटमनच्या बावळटपणाची कीव करीत लेनिन म्हणाला, ' अरे, आपला कोणताही कामगार मंत्री होऊ शकेल. राज्ययंत्र चालवायला काही विशेष अक्कल लागते असं तुला कुणी सांगितलं ? मंत्र्यानं फक्त धोरण ठरवायचं असतं. ते अंमलात कसं आणायचं याचा विचार करायला अधिकारी असतातच की. काल हे अधिकारी झारचे ऐकत होते. आज केरेन्स्कीचे ऐकताहेत, उद्या आपलंही ऐकतील.'

लेनिनचा साधा आणि सरळ युक्तिवाद ऐकून शॉटमन थक्क झाला. उलट, राज्ययंत्र चालविणे शॉटमनला एवढे अवघड का वाटत आहे याचा लेनिनला उलगडा होत नव्हता. राज्ययंत्रणा ताब्यात घेण्याच्या कल्पनेने शॉटमन अक्षरशः गोंधळून गेला होता. त्याने लेनिनला विचारले, ' केरेन्स्कीच्या नोटा रद्द ठरविल्यानंतर आपण पैसा कसा उभारायचा ?'

' त्यात काय मोठंसं ? आपण आपल्या छापखान्यातून नव्या नोटा छापून घेऊ.'

' परंतु तशा नोटा काय कुणीही छापून घेईल.'

' तो प्रश्न तज्ज्ञ मंडळी सोडवतील. त्यासाठी आपण उगाच डोकेफोड करण्याची गरज नाही.'

या साऱ्या चर्चेवरून शॉटमनला एवढाच बोध झाला की सरकार चालविण्याचे कार्य आपल्याला जेवढे अवघड वाटत आहे तितकेच ते लेनिनला सोपे वाटत आहे. समाजवादी सरकार कसे प्रस्थापित करायचे एवढाच लेनिनच्या दृष्टीने महत्त्वाचा आणि तितकाच तातडीचा प्रश्न होता. एकदा आपला पक्ष अधिकारावर आला की इतर सर्व प्रश्न व अडचणी आपल्याला सहज सोडविता येतील याबद्दल तो निश्चित होता. त्या प्रश्नांचा विचार करण्याचीदेखील त्याला गरज वाटत नव्हती. राज्ययंत्रणा कशी ताब्यात घेता येईल याच एका ध्यासाने त्यास पछाडले होते. लेनिनला असे वाटत होते की, रशियाने युद्धातून अंग काढून घेतल्याची आपण जनतेच्या वतीने घोषणा करावी. म्हणजे आघाडीवरून परतणारे सैनिक आपल्या मदतीला येतील व त्यांच्या साहाय्याने राज्ययंत्रणेवर आपण आपली पक्कड ठेवू शकू. सत्ता हाती येताच जमीनदारांच्या ताब्यातील जमिनी शेतकऱ्यांना वाटून टाकल्या आणि कारखान्यांची मालकी उद्योगपतींकडून काढून घेऊन ती कामगारांकडे सोपविली तर नवी राजवट आपली आहे, आपल्यासाठी आहे, अशी भावना आपोआपच लोकमानसात निर्माण होईल.

आपला हा विचार शॉटमनला समजावून सांगितल्यानंतर लेनिनने त्याला विचारलं, 'असं जर आपण केलं तर मग आपल्याला कोण विरोध करील ?'

शॉटमन लेनिनकडे नुसता पाहतच राहिला.

लेनिन पुढे म्हणाला, 'हे सारं घडवून आणण्यासाठी आपल्याला अचूक क्षण निवडला पाहिजे. सर्व काही त्यावर अवलंबून आहे.'

लेनिनचा निरोप घेऊन शॉटमन बाहेर पडला. जाताना लेनिनचे शब्द त्याच्या कानांवर आले– 'आणि त्यासाठीच मला लवकर पेट्रोग्राडला परतायला हवं.'

लेनिन व्हायबर्गला तीन आठवडे होता. त्या वेळी तो अचूक क्षण निवडण्याच्या विचाराने बेचैन झालेला असायचा. सत्ता हाती घ्यायला अद्यापही योग्य वेळ आलेली नाही असेच बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे मत होते. त्यामुळे तर लेनिन अधिकच चिडला होता. त्याने पत्र लिहून कळविले– 'तुमचं मत मला बिलकूल मान्य नाही. मी म्हणतो तो क्षण आलेला आहे असा माझा विश्वास आहे. आताच आपण धाडस करायला हवं. आणखी काही काळ थांबणं घातक ठरेल.'

या पत्रालाही जेव्हा मध्यवर्ती समितीकडून नकारार्थी उत्तर आले तेव्हा लेनिनचा संताप अनावर झाला. १२ ऑक्टोबर रोजी मध्यवर्ती समितीच्या सदस्यांना धाडलेल्या पत्रात तो लिहितो, 'तुम्ही सारे क्रांतीचे शत्रू आहात. अमीर-उमराव आणि जमीनदार यांच्या रक्षणाचीच तुम्हांला काळजी लागलेली दिसते. मी काय म्हणतो हे जर तुम्हांला मान्य नसेल तर हे पत्र हा माझा राजीनामा समजावा. तुमच्यासारख्या ढुढ्ढाचार्यांची पर्वा न करता मी पक्ष–कार्यकर्त्यांना आणि सदस्यांना माझी भूमिका समजावून सांगेन आणि त्यांच्याकरवी क्रांती घडवून आणीन.'

मध्यवर्ती समितीच्या निष्क्रियतेमुळे लेनिन इतका वैतागला होता की त्या समितीला बाजूला सारून पक्षाची सूत्रे स्वत:कडे घेण्याचा विचार त्याच्या मनात डोकावत होता. रशियाबरोबरच फिनलंडमधील कामगारवर्गानेही सशस्त्र उठाव करावा असे त्याने स्मिल्गा या फिनिश कामगार-नेत्याला सुचविले. इतकेच नव्हे तर बोल्शेव्हिक पक्षाच्या फिनलंडमधील प्रादेशिक शाखेने कोन्स्टॅन्टिन पेट्रोव्हिच इव्हानोव्ह या नावाने आपल्याला एक शिफारसपत्र द्यावे व सर्व सोविएटसनी इव्हानोव्ह याला मदत करावी असे त्या शिफारसपत्रात आवाहन करावे, असेही लेनिनने स्मिल्गा याला सांगितले होते. मध्यवर्ती समितीची पर्वा न करता आपल्याला सरळ कामगारांचे व सैनिकांचे साहाय्य मागता यावे या उद्देशानेच प्रादेशिक समितीचे शिफारसपत्र घेण्याची कल्पना लेनिनच्या डोक्यात आलेली होती.

व्हायबर्गमधल्या वास्तव्यात लेनिनने 'बोल्शेव्हिक पक्ष सत्ता टिकवू शकेल काय ?' या शीर्षकाची चाळीस पानी पुस्तिका लिहून काढली. आपण सत्ता

ताब्यात घेऊ शकलो तरी ती टिकविणे आपल्याला जमणार नाही असा आक्षेप घेणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांवर त्याने या पुस्तिकेत समर्पक उत्तरे देऊन हल्ला चढविला होता. लेनिनने आपल्या 'दि स्टेट ॲण्ड रेव्होल्युशन' या ग्रंथात विद्यमान शासनयंत्रणा नष्ट करण्यावर भर दिलेला आहे. परंतु या नव्या पुस्तिकेत तो थोडीशी निराळी भाषा बोलतो. समाजवादी राजवटीत श्रीमंतांनाही संरक्षण मिळेल असे त्याने येथे स्पष्ट शब्दांत म्हटले आहे. मात्र धनिकवर्गानेही श्रम केले पाहिजेत अशी त्याने अट घातली असून असे श्रम करणाऱ्यांनाच अन्नधान्य देण्याची व्यवस्था केली जाईल असा इशारा दिला आहे. तो पुढे लिहितो– 'जे धनिक नव्या राजवटीशी सहकार्य करणार नाहीत त्यांची मालमत्ता जप्त करण्यात येऊन त्यांची कारागृहात पाठवणी केली जाईल. समाजवादी राजवटीत सर्व आर्थिक व्यवहारांची सूत्रे शासनसंस्थेच्या हाती राहतील. बँका, कारखाने, महाविद्यालयें या सर्वांचे कारभार सरकारमार्फत चालविला जाईल.' सरकारी अधिकाऱ्यांना चांगला पगार देण्याची हमीही लेनिनने ह्या पुस्तिकेत दिलेली होती. मात्र त्या बरोबरच या अधिकाऱ्यांनी या नव्या राजवटीशी सहकार्य केले नाही तर त्यांना खायलादेखील मिळणार नाही असे बजावले होते. आपल्या नव्या राजवटीचे स्वरूप कसे काय राहील यासंबंधीही लेनिनने या पुस्तिकेत अतिशय सोपी आणि सुटसुटीत उत्तरे दिलेली आहेत.

ही पुस्तिका लिहिल्यानंतर लेनिनने पेट्रोग्राड आणि मॉस्को येथील बोल्शेव्हिकांना सशस्त्र उडाव करण्याचा आदेश दिला. बोल्शेव्हिकांनी पेट्रोग्राडमधील राज्ययंत्रणा हस्तगत करून जागतिक क्रांतीचा शुभारंभ करावा असे त्याने आवाहन केले. 'सर्व सत्ता सोविएटच्या हाती,' 'भुकेलेल्यांना अन्न' आणि 'जागतिक शांतता' या आपल्या तीन घोषणा असल्या पाहिजेत असेही त्याने कळविले होते. पत्राच्या शेवटी त्याने आत्मविश्वासपूर्वक लिहिले होते– 'विजय आपलाच आहे. कदाचित रक्ताचा एक थेंबही न सांडता आपल्याला क्रांती घडविता येईल अशीही मला शक्यता वाटते.'

लेनिनचे हे १४ ऑक्टोबरचे पत्र वाचूनही मध्यवर्ती समिती क्रांतीचे रणशिंग फुंकायला तयार नव्हती.

लेनिनने पेट्रोग्राडमध्ये येऊ नये, या मध्यवर्ती समितीच्या पूर्वीच्या मतात मात्र आता बदल झालेला होता. हा निर्णय कळल्यानंतर २० ऑक्टोबर रोजी लेनिन लपतछपत पेट्रोग्राडमध्ये आला. मार्गारिट फोफानोवा या पक्ष-कार्यकर्तीच्या घरी त्याच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. आपले आगमन गुप्त राहावे यासाठी अद्यापही लेनिनला काळजी घेणे आवश्यक होते अन् म्हणूनच मार्गारिटच्या घरात पाऊल ठेवताच लेनिनने तिला सांगितले– 'मी इव्हानोव्ह आहे हे लक्षात

ठेव बरं का !'

मार्गारेटचे बिऱ्हाड पाचव्या मजल्यावर होते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर लेनिनने प्रथम खिडकीतून भोवतालचा परिसर पाहून घेतला. पळून जाण्याची पाळी आली तर कोठून कसे गेले पाहिजे, याचा विचार करीतच तो ही पाहणी करीत होता. कोणत्याही नव्या घरात राहावयास जाताच तेथील परिसराची अशी बारकाईने पाहणी करण्याची लेनिनला आता सवयच लागली होती. या सवयीमुळेच तो ज्या शिरोकाया रस्त्यावरील इमारतीत राहत होता त्या ठिकाणी पोलिसांनी तीन वेळा छापे घालूनही लेनिन त्यांच्या हाती सापडू शकला नव्हता.

पेट्रोग्राडमध्ये पोचल्यापासून लेनिन क्रांतीसाठी अधिकच अधीर झाला होता 'उशीर करणे म्हणजे मृत्युला निमंत्रण देण्यासारखे आहे' या पीटर दी ग्रेटच्या सूत्राची तो आपल्या सहकाऱ्यांना सारखी आठवण करून द्यायचा. क्रांती यशस्वी व्हावी म्हणून आपल्या सहकाऱ्यांनी कसे वागले पाहिजे यासंबंधीचे पाच नियम त्याने २१ ऑक्टोबरला लिहून काढले.

१. उठाव रेंगाळत राहणार नाही याची काळजी घ्यावी. एकदा उठावाला प्रारंभ केल्यानंतर सत्ता हस्तगत केल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही या निर्धारानेच तडकाफडकी पावले टाकली पाहिजेत.

२. क्रांतीतील निर्णायक क्षण कोणता हे ओळखून तत्पूर्वी आपली सारी शक्ती एकत्रित केली पाहिजे. आपण आपल्या शक्तीचा नीट अंदाज अगोदरच घेतला गेला नाही तर शत्रू एकेका क्रांतिकारकाला गाठून त्याचा नायनाट करील.

३. एकदा सशस्त्र उठाव झाल्यानंतर आपला निर्धार उणा ठरता कामा नये. सतत पुढे जायचे आहे असे ठरवून शत्रूच्या सामर्थ्यावर जबरदस्त आघात केला पाहिजे. एकदा का आपण बचावाचे धोरण स्वीकारले की क्रांतीचा मृत्यू घडून आलाच असे समजावे.

४. शत्रू बेसावध असताना क्रांतिकारकांनी उठाव करावयास हवा म्हणजे शत्रूला आपले सामर्थ्य एकवटण्यास सवड सापडत नाही.

५. आपल्या कार्यावरची नैतिक श्रद्धा अटळ राहावी म्हणून क्रांतिकारकाने दररोज न चुकता, लहानसहान का होईना, विजय मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

क्रांतीची ही पाच सूत्रे लिहून काढल्यानंतर लेनिन प्रत्यक्ष उठावाच्या तयारीला लागला. आरमार, लष्कर आणि कामगार यांच्या मदतीने पेट्रोग्राडला वेढा घालून राजधानीचा देशाबरोबरचा संबंध तोडला, की राज्ययंत्रणा हस्तगत करणे मुळीच अवघड जाणार नाही अशी त्याची खात्री होती. आपला हा बेत केव्हा आणि कसा

कृतीत आणावयाचा एवढेच आता ठरवावयाचे होते. तो आपल्या सहकाऱ्यांना सांगू लागला, 'प्रस्थापित राजवटीविरुद्धचा लढा आपण जर दोन-तीन दिवस चालवू शकलो तर विजय आपलाच आहे याबद्दल मुळीच शंका बाळगू नका. आणि एकदा रशियात क्रांती झाली की साऱ्या जगभर क्रांतीच्या दुंदुभी वाजू लागतील हेही ठरलेलेच आहे.'

२३ ऑक्टोबरची रात्र. कार्पोव्हका रस्त्यावरच्या एका आलीशान इमारतीतील वरच्या मजल्यावरच्या खोलीत लेनिन आणि त्याचे सहकारी अंतिम निर्णयासाठी एकत्र येणार होते. निकोलाय सुखानोव्ह नावाचा गृहस्थ या घरात राहत होता. त्याला त्या रात्री दुसरीकडे झोपण्यासाठी जाण्यास सांगण्यात आले. आपल्या घरी आज रात्री भरणाऱ्या बैठकीत काय ठरणार आहे याची त्याला किंचितही कल्पना नव्हती. नंतर त्याने लिहिले आहे—'इतिहासाने त्या दिवशी माझी जणू चेष्टाच केली. जगाला हादरवून सोडणाऱ्या क्रांतीचा निर्णय माझ्या घरी करण्यात आला ही गोष्ट मला बऱ्याच दिवसांनंतर कळली.'

या गुप्त बैठकीचा निर्णय मध्यवर्ती समितीच्या सदस्यांना कळविण्याची जबाबदारी लेनिनने स्वेर्डलोव्हवर सोपविली होती. दिवसभर धावपळ करून स्वेर्डलोव्हने सर्वांना लेनिनचा निरोप कळविला. रात्री बैठक सुरू झाली तेव्हा मध्यवर्ती समितीच्या एकवीस सदस्यांपैकी बारा सदस्य हजर होते. त्यांची नावे अशी— लेनिन, ट्रॉटस्की, झिनोव्हेव, कामेनेव्ह, स्वेर्डलोव्ह, झेर्झेन्स्की, स्टॅलिन, उरिटस्की, बुबनोव्ह, सोकोलनिकोव्ह, लोमोव्ह आणि ॲलेक्झांड्रा कोलोंटे. बैठकीचा वृत्तांत लिहून घेण्याचे काम व्हॅवोरा याकोलिएव्हाकडे सोपविण्यात आले होते. आणि चहापानाची व्यवस्था सुखानोव्हच्या बायकोने केली होती.

या बैठकीला सर्वांत उशीरा आलेला सदस्य म्हणजे लेनिन. त्याने डोक्यावर केसांच्या झुलपांचा टोप व डोळ्यांवर जाडसर चष्मा चढविला होता. अज्ञातवासात गेल्यापासून त्याने दाढीला रजाच दिलेली होती. लेनिनप्रमाणेच इतर सदस्यही वेषांतर करूनच आले होते. रात्री दहा वाजता सुरू झालेली बैठक सकाळी आठ वाजेपर्यंत चालू होती. बैठकीचे अध्यक्षस्थान स्वेर्डलोव्हने स्वीकारले होते. त्याने प्रारंभी ठिकठिकाणच्या प्रांतिक शाखांकडून आलेले अहवाल वाचून दाखविले. त्याचप्रमाणे सैनिक सध्या कोणत्या मनःस्थितीत आहेत याचेही त्याने निरनिराळ्या आघाड्यांवरचे अहवाल मागविले होते. तेही त्याने वाचून दाखविले. स्वेर्डलोव्हने या बैठकीत काय बोलावे हे लेनिनने त्याला अगोदरच सांगून ठेवलेले होते.

स्वेर्डलोव्हच्या प्रास्ताविक भाषणानंतर लेनिन बोलावयास उठला. तो म्हणाला, 'आता उगाच शब्दांचा घोळ घालत बसण्यात काहीच स्वारस्य नाही. जे काही सांगायचं आहे ते मी आपल्याला स्पष्ट शब्दांत सांगणार आहे. आपल्याला केरेन्स्की

राजवटीविरुद्ध ताबडतोब उठाव करावयाचा आहे. आज, उद्या किंवा उशीरात उशीरा परवा. त्यापेक्षा अधिक उशीर करून चालणार नाही. खरं म्हणजे सप्टेंबर-पासून आपल्या पक्षाच्या कार्याला शैथिल्य आलेलं आहे. आपण गेला महिना-दीड महिना निष्कारण वाया घालविला असं माझं मत आहे. या बैठकीत आपण उठावाचा बारीकसारीक तपशील, ठरविला पाहिजे आणि त्यानुसार ताबडतोब उठाव केला पाहिजे. आता लोकांना आपल्या आश्वासनांचा आणि धोरणांचा कंटाळा आलेला आहे. ते आपल्याकडून कृतीची अपेक्षा करीत आहेत. आजची आंतरराष्ट्रीय परिस्थिती विचारात घेतली तर तीही आपल्याला अनुकूल आहे असेच आढळून येईल. गेल्या जुलैमध्ये आपण सत्ता हस्तगत करू शकलो असतो. परंतु सत्ता राबविण्याचे त्या वेळी आपल्यात सामर्थ्य नव्हते. आता सारा देश आपल्या उठावाची वाट पाहत असल्यामुळे या वेळी आपण जर सत्ता हस्तगत केली तर ती आपल्या हाती राहू शकेल. म्हणून मी पुन्हा सांगतो, क्रांतीचा क्षण येऊन ठेपला आहे. सैनिकही क्रांतीला उत्सुक आहेत. घटना समितीची बैठक भरण्यापूर्वी आपल्याला हा उठाव करणे आवश्यक आहे.'

आपण एवढे आवेशाने बोलत असलो तरी समोर बसलेले सहकारी आपल्य निर्णयाला मंजुरी देतील किंवा नाही यासंबंधी लेनिन साशंक होता. म्हणून उठाव पुढे ढकलला तर कोणते घातुक परिणाम होतील हे वारंवार विशद करण्यावर आपल्या भाषणात तो भर देत होता.

लेनिनचे भाषण संपताच ट्रॉटस्की म्हणाला, 'आपण २५ ऑक्टोबर रोजी उठाव करावा, असं मला वाटतं. कारण त्या दिवशी सर्व सोव्हिएटची परिषद भरणार आहे.

लेनिनने विचारले, 'आपल्याला त्या परिषदेशी काय करायचं आहे ? शिवाय ती परिषद भरेल किंवा नाही हेही सांगता येणार नाही. केरेन्स्कीच्या सामर्थ्याची उपेक्षा करून चालणार नाही हे आपण सर्वांनी नीट ध्यानात धरायला हवं. आपल्या बेताचा जर त्याला सुगावा लागला तर तो हाताशी असलेले सारे सैन्य पेट्रोग्राड-मध्ये घुसवून क्रांतीच्या नरडीला नख लावील. म्हणून मित्रांनो, आपल्याला उशीर करून चालणार नाही.'

'आता वेळ वाया घालविणे परवडणार नाही' हे वाक्य लेनिनने या बैठकीत दहा–बारा वेळ तरी उच्चारले असेल.

उरिटस्की म्हणाला, 'आपल्याजवळ पुरेशी शस्त्रास्त्रं नसताना उठाव करणं हास्यास्पद ठरेल. पेट्रोग्राडमधील कामगारांजवळ अवघ्या चाळिस हजार रायफल्स आहेत. केरेन्स्कीला पराभूत करण्यासाठी हा शस्त्रसाठा अपुरा आहे.'

परंतु त्याचा हा युक्तिवाद कोणालाच मान्य झाला नाही. शक्य तितक्या लव-

कर क्रांती केली पाहिजे हा लेनिनचा आग्रह आपल्याला मान्य असल्याचे बऱ्याच सभासदांनी सांगितल्यानंतर क्रांतिकाळात कामगारांना दैनंदिन मार्गदर्शन करण्यासाठी सात सदस्यांची राजकीय समिती नेमण्याची झेर्झिन्स्कीची सूचना मंजूर झाली. लागलीच लेनिन, झिनोव्हेव, कामेनेव्ह, ट्रॉटस्की, स्टॅलिन, सोकोल्निकोव्ह आणि बुबनोव्ह या सात जणांची त्या समितीवर निवड करण्यात आली. ही सारी चर्चा सुरू असताना 'उठावाचा दिवस निश्चित करा' अशी लेनिन सारखी मागणी करीत होता. आपला हा आग्रह झिनोव्हेव आणि कामेनेव्ह या निकटवर्ती सहकाऱ्यांना मान्य नसल्याचे पाहून लेनिनला आश्चर्य वाटले. क्रांतीचा दिवस आताच निश्चित करण्यात लेनिन अकारण घाई करीत आहे असे त्या दोघांना वाटत होते. त्यांनी आपले हे मत मांडताच लेनिन चवताळून म्हणाला, 'तुम्ही दोघे क्रांतीचे शत्रू आहात.'

बराच वेळ होऊनही मूळ ठरावाबाबत एकमत होईना तेव्हा मतदान घेण्यात आले. 'ताबडतोब क्रांती करावी' या लेनिनचा प्रस्ताव दहा विरुद्ध दोन मतांनी मंजूर झाला. ताबडतोब लेनिनने समोर पडलेला कागदाचा तुकडा घेऊन त्यावर तो पेन्सिलीने उठावाचा आदेश देणारा मसुदा लिहू लागला.

लेनिन क्रांतीची मुहूर्तमेढ करीत होता.

लेनिनने लिहिले– 'पेट्रोग्राड जर्मन सेनेच्या हाती सुपूर्द करण्याची केरेन्स्की आणि कंपनीची कारवाई हाणून पाडण्यासाठी बोल्शेव्हिक पक्षाची मध्यवर्ती समिती श्रमिक जनतेला उठावाचा आदेश देत आहे. जर्मनीतील आरमाराने बंड केल्यामुळे जागतिक समाजवादी क्रांतीसाठी आंतरराष्ट्रीय परिस्थितीही अनुकूल झालेली आहे. शिवाय सर्व सोव्हिएटमध्ये श्रमिक जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांचे बहुमत झालेले आहे. अशा परिस्थितीत सशस्त्र उठाव अपरिहार्य आहे अशी मध्यवर्ती समितीची खात्री झाली असून हा उठाव घडवून आणण्यासाठी यापुढे सर्व शाखांनी मध्यवर्ती समितीच्या आदेशांचे पालन करावे.'

अशा रीतीने दहा तासांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर २४ ऑक्टोबर १९१७ च्या पहाटे लेनिनने आपल्या पक्षाला क्रांतीसाठी सिद्ध केले. आदेशाचा मसुदा तयार करताना लेनिनने आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात ज्या जर्मन आरमारी बंडाचा उल्लेख केला होता ते बंड दोन–तीन जहाजांपुरतेच मर्यादित होते. शिवाय महिन्यापूर्वीच या बंडाचा बीमोड झालेला होता. रशियात क्रांती होऊ नये म्हणून इंग्लंड आणि फ्रान्स जर्मनीशी तह करण्याची घाई करतील हे ओळखून लेनिनने आरमारी बंडाला एवढे महत्व दिले होते.

त्याचप्रमाणे पेट्रोग्राड जर्मनीच्या स्वाधीन करण्यास केरेस्की तयार झाला आहे, हा लेनिनचा आरोपही खरा नव्हता. उलट वस्तुःस्थिती अशी होती की उरल्या

सुरल्या शक्तिनिशी जर्मनीशी झुंज घेण्याचीच केरेन्स्कीची पराकाष्ठा चालली होती. लेनिनलाही हे सारे माहीत होते. परंतु अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती आपल्याला अनुकूल आहे असे सांगितल्याशिवाय लोक क्रांतीला उभे ठाकणार नाहीत हे त्याला माहीत असल्यामुळे त्याने हा सारा मालमसाला भरला होता. पेट्रोग्राड आणि मॉस्को येथील सोविएटमध्ये बोल्शेव्हिकांचे सप्टेंबरमध्ये बहुमत झाले असल्यामुळे जनता आपल्या पक्षाकडे आकर्षित होऊ लागली आहे हा त्याचा दावा मात्र खरा होता.

थोडक्यात लेनिनचा तो मसुदा म्हणजे सत्य आणि असत्य, वास्तव आणि कल्पना यांचा चमत्कारिक मिलाफ होता. नेचॅयेव्ह, बाकुनिन आणि मार्क्स यांच्या शिकवणी-मुळे जन्मभर जागतिक क्रांतीचा ध्यास घेतलेल्या कृतिवीराचा तो एक उत्कट निःश्वास होता. लेनिनने घाईघाईने लिहून काढलेल्या या आदेशातील एक वाक्य मात्र तेवढे शंभर टक्के सत्य होते– ' आता क्रांती अपरिहार्य ठरली असून सशस्त्र उठावाचा क्षण समीप येऊन थडकला आहे.' पेट्रोग्राडला परतल्यापासून गेले कित्येक दिवस हेच एक वाक्य त्याच्या डोळ्यांसमोर तरळत होते, त्याच्या ओठावर नाचत होते.

या बैठकीत लेनिनने लिहून काढलेल्या आदेशात तावडतोब उठाव करण्याचा आग्रह व्यक्त करण्यात आला असला तरी त्यात उठावाच्या दिवसाचा उल्लेख नव्हता. तो दिवस निश्चित करण्याचे काम पुरे झालेले नव्हते. क्रांती आणखी काही काळ तरी पुढे ढकलावी हा झिनोव्हेव आणि कामेनेव्ह यांचा आग्रह कायम होता. ' कामगार आणि सैनिक रस्ता अन रस्ता झुंजवायला उत्सुक आहेत काय या प्रश्नाला 'नाही' हेच उत्तर येते ' असे त्या दोघांनी सांगितले. त्याचप्रमाणे सत्ता कोणत्या उद्दिष्टा-साठी हस्तगत करायची आणि सत्ता हस्तगत केल्यानंतर कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होणार की एका व्यक्तीची या दोन प्रश्नांची उत्तरेही या आदेशात पाहा-वयास मिळत नाहीत.

झिनोव्हेव आणि कामेनेव्ह हे दोघेही कट्टर क्रांतिकारक होते. शत्रूचे हात बळकट व्हावेत असे त्यांनाही वाटत नव्हते. परंतु क्रांती जर यशस्वी करायची असेल तर पूर्वसिद्धतेसाठी आणखी काही काळ थांबणे आवश्यक आहे असे त्या दोघांचे प्रामा-णिक मत होते.

झिनोव्हेव व कामेनेव्ह यांच्या विरोधामुळे २४ ऑक्टोबरच्या बैठकीत उठावाचा दिवस निश्चित होऊ शकला नाही. लेनिन आपले ऐकत नाही हे पाहून झिनोव्हेव व कामेनव्ह यांनी ३१ ऑक्टोबरच्या वृत्तपत्रांत आपली भूमिका विशद कर-णारा लेख प्रसिद्ध केला. तो वाचताच लेनिन इतका भडकला की, ' तुम्हांला पक्षातून हाकलून दिले जाईल ' अशी त्याने झिनोव्हेव व कामेनेव्ह यांना

धमकी दिली. पक्षाच्या गुप्त निर्णयाबद्दल वृत्तपत्रांत चर्चा करण्याशी त्या दोघांची पद्धतही लेनिनला आवडली नाही.

लेनिनने लिहिले– ' अतिशय कठीण वेळ आलेली आहे. केवढा मोठा पेच-प्रसंग. सहकाऱ्यांकडून केवढी महान प्रतारणा ! पण काही हरकत नाही. कामकरी, शेतकरी आणि सैनिक यांच्या एकजुटीच्या आधारावर आपण या पेच-प्रसंगातूनही मार्ग काढू शकू. आपण सारेजण एकदिलाने उभे राहू या. श्रमिक जनतेचा विजय दूर नाही.'

क्रांती जवळ आणण्यासाठी लेनिनला आता धावपळ करण्याची गरज उरलेली नव्हती. ट्रॉटस्कीच्या पुढाकाराने स्थापन झालेली लष्करी क्रांतिकारक समिती उठावाची सिद्धता करण्यात गढून गेली होती.

लेनिनला हवा असलेला क्षण आणखी सहा दिवसांनी उजाडणार होता.

(क्रमशः)

# चित्रपट



## तूच माझी वहिनी

जनार्दन करकेरा नामक गृहस्थाच्या मनात मराठी चित्रपट काढण्याचा सुविचार आला. विचाराला कृतीची जोड मिळाली. आणि यशवंत पेठकरांचे साहाय्य घेऊन ' तूच माझी वहिनी ' नामक चित्र तयार केले गेले.

**कथा** : पेठकरांनी सांगितलेली कथा मोठी विचित्र आहे. माधव नामक तरुण,

मालती नामक तरुणीच्या प्रेमात पडतो. परिस्थितीमुळे प्रेम यशस्वी होत नाही. कऱ्हाडला राहणारा माधव आपल्या धाकट्या भावाला कऱ्हाडला ठेवून पुण्याला पळ काढतो. हे धाकटे बंधू भावाच्या पाऊलावर पाऊल टाकून मालतीच्या धाकट्या बहिणीवर (मीनावर) प्रेम करतात. पुण्याला गेलेला माधव लग्न करत नाही. परंतु एका तमासगिरिणीकडे 'बसाय उठायला' जाऊ लागतो. कऱ्हाडचे धाकटे बंधू हेमंतराव आपण आजारी असल्याची खोटी तार करून माधवला बोलावून घेतात. माधव येतो. माधव-मालतीचे रहस्य हेमंत-मीनाला समजते. वडील-भावाचे व मालतीचे लग्न लावण्याचा हे दोघे प्रयत्न करतात. मध्यंतरीच्या काळात लग्न होऊन मालती विधवा झाली असल्यान तिची आई या पुर्नविवाहाला कसून विरोध करते. साधारणपणे तासाभरात हा विरोध मावळतो. आणि मालती–मीना या बहिणी जावा–जावा होऊन एकाच घरात परत येतात.

**समीक्षण :** अतिशय भोंगळ कथा अत्यंत सामान्यपणे चित्रीत करण्यात आली आहे. कऱ्हाडहून पुण्याला येताना माधव आपल्या धाकट्या भावाला मागे का ठेवतो ते समजू शकत नाही. मालतीच्या पुर्नविवाहाला विरोध करणारी मालतीची आई शेवटच्या क्षणी या विवाहास तयार होते– का ? तर चित्रपट संपत आला म्हणून, एवढे एकच सोईस्कर उत्तर या प्रश्नास देता येईल. मालतीवर जीव टाकणारा माधव पुण्याला तमाशाला जाण्याइतका धीट होतो – याच धीटपणाने तो मालतीच्या बरोबरही का वागत नाही ? कथेतील ही प्रश्नचिन्हे सोडली तरी उरलेली कथा ही प्रभावीपणे पडद्यावर येत नाही.

**तांत्रिक :** तांत्रिकदृष्ट्या इतके भिकार चित्र गेल्या संपूर्ण वर्षात पाहावयास मिळाले नाही. कॅमेरा, सेटस्, एडिटिंग, साऊंड या सर्वांची अधिक भिकारपणाबाबत सतत स्पर्धा चालू असल्यासारखे वाटते. तमाशा दृश्याच्या वेळी वापरलेले स्टॉक शॉटस् अती सामान्य व कमालीचे जुने आहेत. संवाद पूर्णत्वाने ऐकू जाणार नाहीत याची पूर्ण काळजी ध्वनिमुद्रण खात्याने घेतली आहे, तर संवादांतील शब्द व कलावंतांची वाणी यांचा जास्तीत जास्त वियोग घडवून संकलनातील चमत्कार संकलकाने दाखविले आहेत.

यशवंत पेठकर जुने जाणते, पण याची किंचितही प्रचिती येत नाही. एकही शॉट त्यांच्या अनुभवाला साजेसा नाही.

**अभिनय :** इंदिरा चिटणीस यांचा काहीसा अपवाद वगळता कलावंतांनीही दिग्दर्शकाला व अन्य तंत्रज्ञांना एक भिकार चित्रपट तयार करण्यास मनःपूर्वक साहाय्य केले आहे.

**दर्जा :** अति सामान्य.

**–शरद गोखले**

# कर्नल सी. के.

ज्यांनी १९३४ ते ३९ आणि १९४३ ते ४६ पर्यंत सी. कें. च्या सान्निध्यात रणजी ट्रॉफी आणि चौरंगी सामन्यांची आठ वर्षे अद्‌भुतरम्य वातावरणात घालविली ते माझे गुरू श्री. कमलाकर भांडारकर, यांची सी. कें. च्या निधनानंतर मी भेट घेतली असता दोन तास त्यांनी कर्नल सी. कें. चे अलौकिक व्यक्तिमत्त्व माझ्यापुढे उभे केले. श्री. भांडारकर सांगत होते, " सी. के. सच्चे स्नेही होते. त्यांच्याइतका ज्येष्ठ मित्र मला आजपर्यंत लाभलाच नाही. एखाद्यावर जीव बसला की, कर्नल त्याच्यासाठी वाटेल ते करावयास तयार होत. फाटक्या कपड्यातला त्यांचा एक जुना दोस्त त्यांना १९३४ साली नागपुरात भेटला. नायडूंनी त्याला सरळ एम. सी. सी. क्रिकेटपटूंच्या पुढे उभे केले आणि त्या सर्वांची ' हा माझा कॉलेजातील दोस्त ' म्हणून ओळख करून दिली.

" अमरसिंग यांची सी. कें. वर अलोट भक्ती. नायडूंची किट् बॅग ते वाहत. पण जामनगरच्या दोघा खेळाडूंनी अमरसिंगांचे कान भरून सी. कें. चे आणि त्यांचे संबंध बिघडविले, पण नायडूंचा स्वभाव असा होता की कुणी त्यांच्याशी बोलले नाही, किंवा त्यांना विचारले नाही तर नायडू त्याचा खुलासा समजावून घेत नसत. ज्याची त्याची इच्छा, असे ते म्हणत. म्हणून कर्नल नायडूंच्या बाबतीत अनेक गैर-समज पसरले जात, अर्थात त्याची त्यांनी उत्तरेही कधी दिली नाहीत.

" १९४० साली होळकर–जामनगर सामन्यात आम्ही सगळे बसलो असता बॉबी तल्यारखान आमच्या ड्रेसिंग रूममध्ये आले आणि नायडूंना म्हणाले, " तुम्हांला कुणी भेटावयास आले आहे." नायडू म्हणाले, " येऊ द्यात." तेव्हा तल्यारखान उद्‌गारले, " बघा हं. नाहीतर नाही म्हणाल." नायडू म्हणाले, " का !" तेव्हा बॉबी उत्तरले, "अमरसिंग आले आहेत." तेव्हा नायडू स्वतः उठून अमरसिंगांना सामोरे गेले. आणि अमरसिंग Forgive and Forget म्हणत असतानाच दोघांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. पुढच्याच वर्षी अमरसिंग निधन पावले.

मनोहर रेगे

## आणि भांडारकर

श्री. भांडारकरांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ते सांगतच होते, "नायडू साहसी होते हे खरे पण असा एकच क्रिकेटपटू मी पाहिला की पॅव्हिलियनमधून बाहेर पडताना प्रेक्षकांच्या अंगावर रोमांच उभे राहत. बाँबे जिमखान्याचे सेक्रेटरी नायडू मैदानावर आले की, ब्रिटिश अधिकाऱ्यांना धडाधड फोन लावले जात आणि सरकारी कर्मचारी दहा मिनिटांत मैदान भरवून टाकीत. नायडू बाद झाले की, क्रीडांगण पुन्हा रिकामे पडे. तंबूतून नायडू खेळपट्टीकडे निघाले की रसिकांना आता काय होते आणि काय नाही याची उत्कंठा लागून राही आणि यातच नायडूंच्या अमाप लोकप्रियतेचे मर्म होते. त्यांचे मनगट लवचिक आणि सामर्थ्यवान होते. सबंध शरीरात लष्करी बाणा ओतप्रोत भरला होता. त्यांची पायांची हालचाल चपळ आणि चलाख होती. ते जसे साहसी तसेच कल्पक होते. म्हणूनच नायडू भारतीय क्रिकेटमध्ये सर्वश्रेष्ठ ठरले."

"सर, नायडूंच्या कल्पकतेचे एखादे उदाहरण द्याल का?" सर सांगू लागले, "होळकरने बंगालविरुद्ध २६८ धावा केल्या. दिवसअखेर बंगालच्या नाबाद ११५ धावा होत्या. आम्ही सर्व निराश झालो होतो. नायडू म्हणाले, चला, सिनेमाला जाऊ. सर्व सिनेमाला गेलो. रात्री एकला परतलो. त्यांच्या खोलीत सर्वांना बोलाविण्यात आले. नायडू म्हणाले, पंकज रॉयला उद्या बाद केले की आपण सामना जिंकू शकू. हिरू (हिरालाल गायकवाड) तिसरा चेंडू ऑफ स्टंपबाहेर टाकेल. तो शॉर्ट पिच्ड असेल. मग पंकज स्क्वेअर कट मारेल. मी त्याच्यासमोर पांच–सहा फुटांवर राहीन. त्याचा टोला वेगवान असेल. इतक्या जवळ उभे राहिल्यामुळे मला तो दिसणार नाही. पण मी छातीवर घेईन. तिथून तो वर उडेल व मागचा क्षेत्ररक्षक तो झेलेल.

"हिरूने अगदी बरोबर तसा चेंडू टाकला. नायडूंनी छातीचा कोट पुढे केला. चेंडू दाणदिशी नायडूंच्या छातीवर आदळला व वर उडाला. गली क्षेत्ररक्षकाने लगेच तो पकडला. पंकज बाद झाला. बंगालच्या २४० धावा झाल्या. आम्ही तो सामना जिंकला."

मी स्तंभितच झालो. भांडारकर दोन तास बोलत होते. तेथून उठून जावेसे वाटेना. पण रात्रीचे बारा वाजले होते.

●

# हुतुतू आमचा

समाजाच्या सर्व थरांना परवडेल आणि आवडेल असा एकही राष्ट्रीय खेळ आज आमच्याजवळ नाही. क्रिकेट शहरगावांत आणि मध्यमवर्गात लोकप्रिय आहे. खेड्यापाड्यांतले लोक कुस्तीवर फिदा असतात. कामगारवर्ग हुतुतूवर प्रेम करतो. पण यातील एखादा खेळ आपले मर्यादित परीघ सोडून बाहेर पडू शकेल काय ? –समाजाच्या सर्व थरांना परवडेल आणि आवडेल असा एखादा राष्ट्रीय खेळ आपण निर्माण करू शकू काय ?

क्रिकेटच्या गुणावगुणाबद्दल मला चर्चा करावयाची नाही. पण हा खेळ एवढा महागडा आहे की या देशातील बहुजन समाजाच्या दृष्टीने हा खेळ अजून अनेक दशके चैनीचीच बाब राहणार आहे. कुस्तीतील कौशल्य निर्विवाद आहे. पण सांघिक खेळाची गरज तो भागवू शकणार नाही. राहता राहिला हुतुतू. हुतुतू ही पोकळी भरून काढील अशी खूप जणांची कल्पना होती. किंबहुना आपणांला एक राष्ट्रीय खेळ असावा या भावनेनेच चार–पाच दशकांपूर्वी हा खेळ आजच्या स्वरूपात निर्माण करण्यात आला. पन्नास वर्षांपूर्वी खेळाडू चीत म्हणेपर्यंत त्याला धरून ठेवण्याचा हुतुतू पण खेळला जात होता. हुतुतू महर्षी प्रा. गंधे, श्री. शंकरराव गोसावी, साताराचे श्री. गद्रे गुरुजी यांनी अनेक प्रयोग करून या खेळाला आज दिसणारे स्वरूप दिलेले आहे.

पण अनेक वर्षे खूप परिश्रम करूनही हुतुतू आज एका मर्यादित रिंगणातच फिरत आहे. हुतुतू हा खेळ फार स्वस्त असल्याने बहुजन समाजाला तो परवडू शकतो हे त्याचे वैशिष्टच आहे. पण हीच त्याची मर्यादाही आहे का, असा प्रश्न त्यामुळे निर्माण होतो.

खरे बघता या खेळात सांघिक भावनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक क्षणी प्राप्त परिस्थितीचा अंदाज घेऊन नवे निर्णय घेण्याची कुवत असलेला कर्णधार या खेळात लागतो. विजयाचे पारडे कोणत्याही क्षणी बदलण्याची शक्यता असल्याने प्रेक्षकांची उत्सुकता हा खेळ शेवटपर्यंत कायम ठेवतो. या खेळाने खेळांचा राजा बनावे म्हणून पद्धतशीर प्रयत्न – निदान महाराष्ट्रात तरी – करण्यात आले.

या खेळाचे राष्ट्रीय सामने दरवर्षी भरवले जाऊ लागले. रेडिओवरून या खेळाचे धावते समालोचन सांगण्याचा उपक्रमही केला गेला. पण कार्यकर्त्यांनी निराश व्हावे अशी आजची वेळ आहे. अशा वेळी पोशाखी पांढरपेशा समाज हुतुतूकडे दुर्लक्ष

# राष्ट्रीय खेळ होईल काय ?

**दत्तप्रसाद दाभोळकर**

करतो अशी तक्रार करण्यापेक्षा या खेळातच काही दोष आहे काय, याचा विचार करणे अगत्याचे नाही का ?

आजच्या हुतुतूत एक प्रमुख दोष आहे. दोन तुल्यबल संघांचा सामना रंगण्यापेक्षा तो कंटाळवाणा होतो. खेळात अधिक महत्त्व तुम्ही किती गुण अधिक मिळवलेत याला असल्याने शेवटच्या क्षणापर्यंत वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारावे आणि अगदी शेवटच्या क्षणी एखादा गुण मिळवावा अशी खेळाडूंची वृत्ती बनते. त्याचबरोबर एकदा एखाद्या संघाला एक गुण अधिक मिळाला की केवळ बचावात्मक खेळ खेळणे एवढेच त्या संघाचे धोरण राहते.

## अमर हुतुतू

यावर एक उपाय यापूर्वी करण्यात आलेला होता. त्या हुतुतूच्या खेळास 'अमर हुतुतू' असे नाव होते. या खेळात खेळाडू बाद झाला तरी तो बाहेर बसत नसे. त्याबद्दल फक्त गुण मांडले जात असत. याचा फायदा असा होता की उत्कृष्ट चढाई करणारा खेळाडू मनापासून चढाई करत असे. आपण दोनदा बाद झालो तरीही आपण रिंगणात असू व एकदा तीन गडी बाद करून आपले गेलेले गुण भरून काढू असा विश्वास त्याला वाटत असे. खेळातला जोष कायम टिकवत असे. पण यात एक मोठा दोष होता. हुतुतूत खेळाडू बाद होऊन बाहेर बसला की तुम्हांला क्षेत्ररक्षण बदलावे लागते. अक्षरशः बुद्धिबळाच्या पटाप्रमाणे दरवेळी क्रीडांगणाचे स्वरूप बदलते राहते. – अमर हुतुतूत हे घडू शकत नाही.

या दोन्ही गोष्टी– (१) खेळाडूला अभय देणे आणि (२) क्रीडांगणाचे स्वरूप बदलते ठेवणे एकाच वेळी होऊ शकेल असा एक मार्ग मला सुचवावयाचा आहे.

या नव्या खेळात 'अमर पकड' व 'अमर चढाई' असे आपण खेळाचे दोन भाग करू या. समजा, पहिल्या डावात 'अ' संघाने नाणेफेक जिंकून 'अमर चढाई' स्वीकारलेली आहे, व त्यामुळे 'ब' संघाकडे पहिल्या डावात 'अमर पकड' आलेली आहे. आता पहिल्या डावात 'अ' संघाचे खेळाडू चढाई करताना बाद झाले तरी त्यांना बाहेर बसावे लागणार नाही. त्याबद्दल गुण मांडले जातील. मात्र 'अ' संघाचे खेळाडू पकड करताना बाद झाले तर त्यांना बाहेर बसावे लागेल व त्याबद्दल गुणही मांडले जातील. या उलट 'ब' संघाचे खेळाडू पहिल्या डावात चढाई करताना बाद झाले तर त्यांना बाहेर बसावे लागेल व त्याबद्दल

गुणही मांडले जातील. मात्र ' ब ' संघाचे खेळाडू पकड करताना बाद झाले तर त्यांना बाहेर बसावे लागणार नाही त्याबद्दल फक्त गुणच मांडले जातील. म्हणजे पहिल्या डावात ' अ ' संघाचे खेळाडू मनापासून मोकळेपणाने चढाई करू शकतील तर ' ब ' संघाचे खेळाडू मोकळेपणाने पकड करू शकतील. दुसऱ्या डावात याच्या उलट परिस्थिती असेल. ' अ ' संघाकडे ' अमर पकड ' असेल तर ' ब ' संघाकडे ' अमर चढाई ' जाईल.

या खेळात, दोन्हीही संघांच्या पकड व चढाई करणाऱ्या खेळाडूंना काही वेळ निर्धास्तपणे आपला खेळ दाखविता येईल. त्याच वेळी दर वेळी खेळाडू बाद होऊन बाहेर बसत असल्याने दर वेळी क्रीडांगणावरची क्षेत्ररचना पण बदलती ठेवावी लागेल.—हुतुतूत आज नाणेफेकीला काहीही महत्त्व नाही. पण या खेळात नाणेफेक जिंकणारा संघ आपणांला प्रथम ' अमर पकड ' की ' अमर चढाई ' हवी हे ठरवू शकणार असल्याने नाणेफेकीला एवढेच महत्त्व येईल. या खेळाचा आणखीही एक फायदा होईल. एखादा संघ पकडीत अधिक चांगला असेल तर ज्या वेळी त्याला ' अमर पकड ' मिळेल त्या वेळी त्याला अधिकात अधिक गुण मिळवून ठेवावे लागतील.—पहिला डाव व दुसरा डाव त्याच्या दृष्टीने सारख्याच योग्यतेचे नसतील.

प्रत्यक्ष क्रीडांगणावर काही दिवस अशा स्वरूपाचे सामने खेळून पाहिल्यावर यातही काही दोष कदाचित आढळून येतील. हुतुतूत काही क्रांतिकारक बदल करण्यात गैर असे काही नाही. गेल्या चार दशकांत अनेक स्थित्यंतरांतून हा खेळ गेला आहे.

कबड्डी की हुतुतू असल्या निरर्थक आणि खोटया प्रतिष्ठेच्या वादात गुंतून पडण्यापेक्षा हुतुतू अधिक आकर्षक कसा करता येईल याचा आज विचार झाला पाहिजे. पुढील काही वर्षांत हुतुतू कार्यकर्त्यांनी पद्धतशीर प्रयत्न केले तर, समाजाच्या निरनिराळया थरांत उभ्या असलेल्या कृत्रिम भिंती क्रीडांगणांवर दूर करून आमचा समाज अधिक एकसंघ बनविणारा आमचा राष्ट्रीय खेळ हे स्वरूप हुतुतूला देऊ शकतील. ○


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

चवथी सचित्र आवृत्ति

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

पूर्वग्राहकांनी कार्यालयातून आपल्या प्रती
पावती दाखवून घेऊन जाव्यात.

परगावच्या पूर्वग्राहकांना व व्यापारी
ग्राहकांना नोव्हेंबरच्या शेवटच्या
आठवड्यात प्रती मिळू शकतील.

राजहंस प्रकाशन
उंबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रोड,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग.